
# हाकारा



एप्रील - जून १९८८

वर्ष : नववे । अंक : दुसरा ।

## आगामी अकांत
## हाकारा प्रसिद्ध करीत आहे.

* 'आदिवासी - विश्व' : अनेक देशातल्या आदिवासींच्या समान वैशिष्टयांबद्दल आणि समस्यांबद्दल माहिती देणारे लेख.

* आदिवासी संत श्री शंकर महाराज : धुळे जिल्हयातील एका आध्यात्मवादी आदिवासीच्या ग्रंथ कर्तृत्वाचा परिचय.

* आदिवासींकरिता रोजगार - संधी : सुशिक्षित आदिवासींना मार्गदर्शन करणारा महत्वपूर्ण लेख.

* विकासाची योजना आणि योजनेच्रा विकास : विकास योजनांचे परखड मुल्यमापन.

* अनुभवांचा राजरस्ता : ग्रामीण कार्यकर्त्यांचे अनुभवाचे निष्कर्षांचा अभ्यास.

---


## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
## आणि हाकारा
## हार्दिक आभारी आहेत.

* महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

* शिक्षण व युवक कल्याण मंत्रालय, भारत सरकार

* भारतीय सामाजिकशास्त्र अनुसंधान परिषद ; पश्चिम विभागीय केन्द्र

* आदिवासी विकास संचलनालय, महाराष्ट्र शासन.

* वनविकास महामंडळ, महाराष्ट्र.

* कम्युनिटी एड अब्रॉड, ऑस्ट्रेलिया.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक.

# हाकारा

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| | संपादकीय | ३ |
| १) | उपेक्षितांची प्रगल्भ कविता : डॉ. विश्वासराव पाटील | ५ |
| २) | हृदयीचा भाव : सोपानदेव चौधरी | ८ |
| ३) | साहित्य म्हणजे आवेश नव्हे : किसनराव पवार | १० |
| ४) | आदिवासींचे काज : डॉ. भास्कर गिरीधारी | ११ |
| ५) | पावरा व भिल्ल जमातीचा होलिकोत्सव : श्री. दिलीप इंगळे | १४ |
| ६) | माणुसकीच्या जीवनालाही आदिवासी पारखे : म. वि. कुलकर्णी | १६ |
| ७) | कथा कातकरी मनाची : श्री. पं. गो. गांगल | १७ |
| ८) | खरे खोटे आदिवासी कसे ओळखाल ? | २५ |
| ९) | मौखिक-संपदा : डॉ. भास्कर गिरीधारी | २८ |
| १०) | पिली-कनेर : उल्हास राजज्ञ | ३४ |
| ११) | वृत्त-विश्व | ४० |

वर्ष नववे : अंक.दुसरा.
एप्रील-जून १९८८
पत्रव्यवहाराचा पत्ता :
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औन्ध,
पुणे-४११००७

संपादक
रामचंद्र मुटाटकर.
सहसंपादक
उल्हास राजज्ञ.
मुखपृष्ठ
श्री. बोरसे

प्रकाशक
रा.के. मुटाटकर
सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद
यांच्यासाठी
दयाल अँड असोशिएट
ए-३३, एच् ब्लॉक,
एम्. आय. डी. सी.
पिंपरी, पुणे-४११०१८.
येथे छापून प्रसिद्ध केले.

या अकांस महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृतीमंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे.

# प्रत्येक आदिवासी व्यक्तिने घ्यावयाची दक्षता.

१. आपण कोणत्या जमातीचे आहोत हे समजून घ्यावे.

२. आदिवासी जमाती किती व कोणत्या हे लक्षात घ्यावे.

३. नावात थोडाफार सारखेपणा असणाऱ्या जाती आपल्या जमातीच्या नावावर खोटे दाखले मिळवून फायदा घेत नाहीनां याकडे लक्ष द्यावे.

४. एखादी व्यक्ति आदिवासी नाही परंतु ती त्या जमातीसाठीच असलेल्या सवलतीचा फायदा घेत आहे, अशी शंका आल्यास त्याबद्दल नांव, गांव, कामाचे ठीकाण, जात, इ. माहिती जबाबदार आदिवासी संघटना व जिल्हाधिकारी यांस लेखी कळवावी.

५. शाळा-कॉलेजेसमधे आदिवासी म्हणून प्रवेश घेणाऱ्या खोटया आदिवासींचा शोध घ्यावा व ती माहिती जबाबदार आदिवासी संघटना व जिल्हाधिकारी यांना कळवावी.

६. खात्री पटल्याशिवाय व कारण समजल्याशिवाय कोणासही नातेवाईक वा भाऊबंद असल्याचे लिहून देऊ नये.

७. स्वतःचा शाळा सोडल्याचा व जातीचा दाखला दुसऱ्यास देऊ नये.

८. आपल्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराची माहिती जबाबदार आदिवासी संघटनेस व जिल्हाधिकाऱ्यांना लेखी कळवावी.

९. खोटया आदिवासींच्या पैश्याला व धाकदपटशा यास बळी पडू नये.

१०. संघटित होण्याची आवश्यकता सर्वांस पटवून द्यावी.

११. आदिवासींसाठी असलेल्या सोयी-सवलतींचा अभ्यास, प्रसार व प्रचार करावा.

# संपादकीय

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे अध्यक्ष प्रा. गं. बा. सरदार यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त आदिवासी साहित्यिकांचे एक चर्चासत्र पुणे येथे ऑक्टोबर १९८३ त भरविण्यात आले होते. त्याचे नामकरण संमेलन अशा भारदस्त नांवाने केले नव्हते. ब्राम्हणी साहित्यिकांचा अड्डा असलेल्या सदाशिव पेठेत चर्चासत्र भरवूनही ब्राम्हण साहित्यिकांनी आपली हजेरीसुद्धा आदिवासी साहित्य चर्चासत्रात लावली नाही. याची आदिवासी साहित्यिकांना खंत वाटत होती. यानंतर बऱ्याच ठिकाणी आदिवासी साहित्यिक एकत्र आले. दलित साहित्याचे यश बघून आदिवासी साहित्यिकांनाही प्रोत्साहन मिळणे नैसर्गिक आहे.

दलित साहित्यिकांची आत्मचरित्रपर कथने व सत्यस्थितीवर आधारित कथा जगभर गाजल्या. दलितांचे जीवन व त्यांची दुःखे यांचा अनुभव संवेदनाशील सवर्णांना नाही असे नाही. परंतु त्या व्यथा त्यांना बोचणाऱ्या नाहीत. जीवनातील दुःखांचे केवळ प्रदर्शन करून किंवा त्यांची जंत्री करून भागणार नाही. पुढची पायरी म्हणून यांतून मार्ग काढावयास हवा. तसा मार्ग संघर्ष आणि रचनात्मक कार्य यांच्या संगमातूनच निघू शकतो. अलिकडे विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासामुळे रचनात्मक कार्याचे नवनवीन पैलू व संधी उपलब्ध होत आहेत. शिक्षणाच्या वाटा उघडल्यामुळे, लोकशाहीच्या चौकटीत व्यक्तीच्या व समूहाच्या मतांना महत्व प्राप्त झाल्याने व घटनात्मक तरतूदींमुळे विकासाचे मार्ग दिसावयास लागले आहेत. या मार्गांत अडथळे निर्माण करणाऱ्यांशी संघर्ष अटळ आहे. परंतु यश प्राप्त झाल्यानंतर संघर्ष केलेल्यांची संस्कृति आत्मसात करण्याचे केविलवाणे प्रयत्नही दृष्टीस पडतात.

भारतीय ग्रामसंस्थेत सवर्ण व दलित एकमेकांशेजारी कायम राहिले. शोषणाच्या मार्गाने का होईना, दलितांना सवर्णांची जीवनपद्धती जवळून पाहाता येत असे. ती जीवनपद्धती आदर्श वाटणे व ती मिळत नाही म्हणून त्याबद्दलची चीड, संताप होणे स्वाभाविक आहे. शोषणव्यवस्थेतून मुक्तता मिळण्यासाठी संघर्ष करावा लागला व जो आजही चालू आहे. उच्चवर्णीयांनी गोऱ्या राज्यकर्त्यांची संस्कृति आत्मसात करावयाचा प्रयत्न केला. सुशिक्षित ब्राम्हणांनी मद्य व मांसभक्षणाचे पाठ ब्रिटीशांकडून घेतले. शक्तीशालीचे अनुकरण ही एक मानवी प्रक्रिया आहे. या सर्व अनुभवांचे दर्शन भारतीय साहित्यांत पहावयास सापडत नाही.

दलित आणि आदिवासींची तुलना होऊ शकत नाही हा विचार हाकारात वारंवार मांडण्यात आला आहे. भारतीय ग्रामसंस्थेत आदिवासींची स्वतंत्र खेडी असल्याने वेगळे स्थान आहे. सखल प्रदेशात जरी आदिवासी व जातीनिष्ठ समाज यांचा जवळचा संबंध आला तरी डोंगराळ भागात, दऱ्याखोऱ्यात आणि जंगलात राहणारे आदिवासी भारताच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिले. आदिवासींची आर्थिक, सामाजिक, धार्मिक संघटना; त्यांची कला, साहित्य यांत वेगळेपणा आहे. जातीव्यवस्थेतील श्रमविभाजन आदिवासी

समाजात नाही. आदिवासी गटांतील श्रेणीरचना जातीनिष्ठ समाजाप्रमाणे धर्माधिष्ठित नाही, वर्णव्यवस्थेचा भागही नाही किंवा विटाळ, स्पृश्य - अस्पृश्य या कल्पनांशी निगडित नाही हे लक्षात घ्यावयास हवे.

सामाजिक - सांस्कृतिक पातळीवर आदिवासी हे हरिजन - दलितांपेक्षा भारतीय समाजरचनेत वरच्या पातळीवर आहेत. त्यांचे सामाजिक शोषण ही समस्या नसून आर्थिक शोषण ही खरी समस्या आहे. आदिवासी व पर्यावरण, यांचा जितका जवळचा आर्थिक - सामाजिक - सांस्कृतिक - धार्मिक संबंध आहे. तसा इतर कोणत्याही जातीसमूहाचा नाही. याचाच अर्थ असा की आदिवासी व दलित - हरिजनांच्या अनुभूतीत, त्यांच्या ऐतिहासिक उत्क्रांतीत लक्षणीय फरक आहे. हा फरक आदिवासी साहित्यिकांनी समजावयास हवा.

परिवर्तनाचे वारे वाहताहेत. निरनिराळ्या विकासाच्या योजना बऱ्याच अंशी कागदावर व कांही प्रत्यक्षात कार्यवाहीत येत आहेत. त्याचा एकंदर आदिवासी जीवनावर व वेगवेगळ्या आदिवासी गटांवर काय परिणाम होतो हे आदिवासी साहित्यिकांनी टिपावयास हवे. दुर्गम भागात रस्ते, बसगाडया, शिक्षणाचा प्रसार, धरणे, राष्ट्रीय पातळीवरचे विकास प्रकल्प अशा अनेक परिवर्तनाला पोषक घटना घडत आहेत. आरोग्य केंद्र, बँका, आश्रमशाळा यांची संख्या वाढत आहे. स्वच्छ आदिवासी नगरं गलिच्छ होत आहेत. आदिवासी भागातील जमिनीवर शहरातील काळ्या पैशाचे अतिक्रमण होत आहे. या सर्व प्रक्रिया समजण्यासारख्या आहेत. या प्रक्रियांना आदिवासी कसा सामोरा जात आहे हे साहित्यिकांनी मांडावयास हवे. दलित साहित्याचे अनुकरण करून हे साधणार नाही.

संघर्ष आणि दुःख नसणारा मानवसमाज अस्तित्वात नाही. संघर्षाची कारणे वेगळी, लक्ष वेगळे आणि तंत्र वेगळी. प्रत्येक संस्कृति भिन्न असली तरी मानव समाजाची सर्वमान्य मूल्ये आहेत. दलितांची दुःखे दलितांना समजतात व आदिवासींची आदिवासींना हे जरी बहुतांशी वास्तव असलं तरी मानवी मूल्यांची जाण असणाऱ्यांना, वेगवेगळ्या संस्कृतीच्या आरशातून प्रतिबिंब पाहण्याची किमया साधते. शोषिताच्या नजरेतून शोषणाची अनुभूति किंवा एकंदर संस्कृतीची जाण ही संस्कृति - अभ्यासकांना जमते व त्याचे शास्त्र त्यांनी आत्मसात केलेले असते.

सुशिक्षित आदिवासी नगरनिवासी झाल्यावर बरेच लोक आपल्या नातेवाईकांशी, आपल्या जन्मभूमीशी संबंध ठेवत नाहीत. तथाकथित प्रगत संस्कृतीचे अनुकरण करण्याकडे त्यांचा कल असतो, अशा लोकांनी साहित्यनिर्मिती केल्यास ती वास्तववादी असत नाही.

दर्जेदार साहित्याच्या निर्मितीस ऐतिहासिक प्रक्रिया, वर्तमानातील आशा - आकांक्षा, विकासाच्या संधी आणि भविष्यकाळातील आदर्शाबद्दल कल्पना यांचा मिलाफ व्हावयास लागतो. कांही आदिवासी साहित्यिकांची तशी क्षमता आहे. त्यांनी आपली क्षमता व दृष्टी इतरांनाही द्यावी म्हणजे आदिवासी साहित्यिक आपली अस्मिता निर्माण करू शकतील.

# उपेक्षितांची प्रगल्भ कविता

## प्रा. डॉ. विश्वास पाटील

हिंदीतल्या कवितेला आज भावाभिव्यक्तीचे श्रेष्ठ माध्यम मानले गेले तर अतिशयोक्ती ठरू नये. व्यक्ति संदर्भापासून तर थेट सामाजिक तपशिलापर्यंत या कवितेची इयत्ता व्यापक आहे. यात म्हणूनच तर गुंतागुंतीच्या व्यमिश्र संवेदना, वातावरणातील प्रभाव - दबाव, परिस्थितीतले जीवघेणे ताण - तणाव आणि अन्तर्मनातील व्यथा - वेदनांचा उमळता डोंब वाचायला सापडतो. व्यक्ति आणि समाज यांच्या संबंधामधला संघर्ष तर यातून डोकावतोच पण व्यक्ति आणि सत्तेतील अन्तर्विरोध ही या कवितेच्या ओळी - ओळीमधून क्रमबद्ध रित्या वाचता येतो. बाह्य संदर्भांचा राकट - रासवट क्रुर भाव आणि आन्तर मनातील अंधःकाराशी दिल्या जाणाऱ्या धडकी - टकरी यांचे तपशील सांगतांना कवीची आपल्या अनुभवविश्वाशी चाललेली झटापट आणि द्वंद्व जणू अर्थ आणि मुक्ततेच्या महाद्वारापर्यंत पोचण्यासाठी कासावीस होतांना दिसतात. या कवितांमधून सामाजिक, राजकीय, आर्थिक संबंधांचा आंतरशोध चालतांना दिसतो. आपलाच आपल्याशी परिचय करून घेण्याची केविलवाणी धडपड यातून आढळते. यात विस्तृत अनुभव, सतत संघर्षशील चैतन्य आणि संघर्षाची ट्रॅजिक दैना विद्यमान आहे.

या कवितेचा अनिवार्य भाग आहे तणाव. या तणावाचे मूळ, विसंगत परिस्थितींशी जुळवून जगण्याच्या लाचारीत आहे. केवळ वेदना, संवेदना, आवेग, संवेग, उत्तेजना किंवा विचार या कवितेच्या मूळाशी नाही. या द्वंद्वांसाठी झुंजण्याची प्रेरणा, विफलता, दुर्दम्यता आणि हा संघर्ष निभवत रहाण्याची प्रखर प्रतिभा यासाठी आवश्यक - अनिवार्य आहे. समकालीन हिंदी दीर्घ कविता या कसोटीवर पूर्णपणे उतरतांना दिसते. यात दलित जीवनांच्या समस्येचे जे चित्र दिसते ते पराकोटीचे दाहक आणि वास्तवदर्शी आहे.

उपेक्षितांच्या हिंदी कवितेच्या स्वरूपाविषयी थोडे आकलन यानिमित्त करून घेणे आवश्यक आहे. बदलत्या परिस्थितींचा नेमका दिशाबोध आणि त्याला अभिव्यक्त करण्याच्या तगमगीतून - धगीतून या दीर्घ कवितेचा जन्म झाला. या कवितेतून आधुनिक मानवाच्या ताण - तणावांचे, यातनांचे, संकल्पांचे आणि भविष्यदृष्टींचे संदर्भ व्यक्त होतांना दिसतात. या साठी नव्या काव्य - माध्यमाची आणि अभिनव शिल्पाची खरे म्हणजे आवश्यकता होती. यापूर्वी महाकाव्यांमधून, खंडकाव्यांमधून व्यापक जीवनसंदर्भांचा जागता परिचय घडवला गेला पण आजच्या खंडित, अस्ताव्यस्त व्यवस्थेसाठी स्वतंत्र माध्यमाची गरजच होती. यातून अभिव्यक्तीच्या साऱ्या जोखिमा [Risks] कवी उचलतो. जीवनाच्या गोंधळाच्या गुहेत आजच्या माणसाची मूक वेदना ठेचकाळतांना दिसते. अंधकार आणि प्रकाशाचा इथे सनातन लपंडाव चालतांना दिसतो. प्रकाश पराभूत होतो. अंधाराची सत्ता सर्वत्र गाजतांना दिसते. त्या व्यक्ति - समूहांच्या चहुबाजूला काळ्याकुट्ट इतिहासाची महावस्त्रे पांघरलेले दीन - पिडीत, भयावह, जळके - करपलेले चेहरे नांदतांना दिसतात. या दिर्घ कवितेची या भयग्रस्त चेहऱ्यांशी दोस्ती आहे. कवी वर्तमानकाळाचा साक्षीदार आहे. या कवितांच्या निर्मितीसाठी कवीने ज्या प्रसवकळा सोसल्या त्या पूर्ववर्ती कविंना अज्ञात होत्या. या वर्तमानाचा परिचय करून देतांना त्याला ना कुठल्या तर्काची आवश्यकता आहे ना साक्षीदारांच्या शब्दबंबाळ पुराव्यांची. या कवितेत म्हणूनच एक जागती जिजीविषा आढळते. यातले शब्द मरणधर्मी नसून जीवनधर्मी आहेत. या आगीतून आणि धगीतून या दीर्घ कवितेच्या वाटा विस्तारतांना दिसतात यातूनच या कवितेच्या पृथगात्म आशय रेखांकित होतांना दिसतो. आजच्या जीवनाची जटिलता, संश्लिष्टता, अव्यवस्थितपणा या कवितेतून व्यवस्थितपणे अर्थरलेला आढळतो. या कवितेत ना कुठला नियम ना धारणा, उलटपक्षी परंपरागत संदर्भांचा धागा तटकन् तुटून गेलेला आढळतो.

या कवितांमधून अनुभवांची तन्मयता - तल्लीनता या सोबतच कवीच्या तटस्थ दृष्टीला महत्व लाभलेले आढळते. या तटस्थामुळेच कवी आपल्या अनुभवविश्वाशी समरस होतांनाच एका अकुंशाची व्यवस्था करून ठेवतो. यामुळे कलात्मक अंतर Aesthetic Distance ] राखले जाते. कवी विविध जीवनानुभवांना सामोरे जात असतांनाच जीवनाच्या मर्माची नेमकी उकल करत जातो. आपल्या वैचारिक

प्रतिमेच्या सहाय्याने नवनवोन्मेषशाली किरणांच्या रंगांनी आपली कविता सजवून टाकतो, कवितेचा शृंगार करतो. समकालीन दीर्घ कविता आपल्या कथनात आणि रचनातंत्रात विलक्षण पृथगात्म आहे. सूक्ष्म वैचारिक कथा भावान्यक तारतम्य, विरळ कथानंक आणि शैली - शिल्पाच्या आगळया - वेगळया मांडणीमुळे या कवितेला शास्त्रीय चौकटीत बसवणे अवघड आहे. हिंदी काव्येतिशयाची पृष्ठे वरवर जरी आपण बघितलीत तरी एथपर्यंत अनेक सिद्ध व प्रसिद्ध कवींनी या काव्य प्रकाराला हाताळल्याचे निदर्शनास येईल.

उपेक्षितांच्या कवितेची पृथगात्मकता केवळ अनुभवात आणि तो व्यक्त करण्याच्या प्रक्रियांच्या प्रेरणेतच नसून स्वतंत्र प्रतीकांच्या पुनर्रचनेतही आढळते. जीवनाच्या व्यापकतेच्या दोन्ही ही धुव्रांशी नाते सांगणारी ही दीर्घकविता युगीन वेदनेला आणि जाणीवेला समकालीन व्यमिश्रतेच्या संदर्भात, अधिक नेटकेपणाने अधोरेखित करतांना आढळते. दीर्घ कवितेत युगीन वास्तवाचे भान, सामाजिक पीडनाच्या नोंदी आणि संत्रस्त दुनियेच्या सार्थक चित्रणासोबतच कवीच्या मानसिक ताण - तणावाला नाट्यपूर्ण पद्धतीने मांडलेले आढळते.

या कवितांमधून डोकावणाऱ्या अनुभवांचे पीळ अनेकपदरी आहेत. त्याची परिणामे अधिक असल्यामुळे परिणाम अधिक ठाशीव दिसतो. यातून वास्तवाची नाना रूपे व विविध पक्षोपपक्ष स्पष्टपणे जाणवतात. यामुळेच या दीर्घ कवितांमधून ताण - तणावांच्या सोबतच तपशिलाचा ही आग्रह धरला जातो. हे तपशिल मूळातून तपासून घेतल्यावर या कवितांची आस्वादप्रक्रिया सुलभ होते.

दीर्घकवितांच्या संदर्भातला हा विचार मुख्यतः समकालीन कवितांना आधार मानून करीत असतांना भवानीप्रसाद मिश्र यांच्या 'शब्दों के तत्व पर' कवितेचा विचार सर्वप्रथम मनाला स्पर्शून जातो. भाषा, अर्थ आणि अभिव्यक्ति या त्रिविध अंगानी फुलत जाणारी ही कविता सामाजिक संबंधांच्या खिळखिळे होण्याच्या प्रक्रियांची कथा सांगतांना दिसते. मनुष्य जीवनाचा विचार कवीने 'काले घने स्वर की नदी' म्हणून केलेला आहे.

या कवितेच्या माध्यमातून एका सामाजिक अभिसरणाची इच्छा कवीने नांदविलेली आहे. हे 'स्व' पासून 'पर' पर्यंत पोचावे ही त्याला तळमळ लागून राहिली आहे. शोषणाच्या तळाचा उभा छेद घेणारी ही कविता म्हणूनच अशा ओळी लिहून जाते -

*अभय तो शब्द और स्वर और ध्वनिका पहला देय है।
किंतु अतीत करके अल्प और भूमा को भी जो गेय है।
अपनी आवाज उस तक उठाओ
कुटियामें बैठकर किनारे पर या नाव में नहीं
धारा के बीच में स्थिर होकर गाओ।

त्रिलोचन शास्त्रींची दीर्घ कविता 'नगई महरा' गावकुसाबाहेरील नगई ची चित्रकथा आहे. अतिशय तरल, संवेदनशील, अद्‌भुत आणि पृथावोत्पादक शैलीची ही कविता विषय, भाषा, आशय, मांडणी या चतुष्कोणातून जनसंस्कृतीशी जवळीक सांगणारी आहे. नगई ने आपल्या सख्ख्या भावाच्या सासूला घरात 'ठेवून' घेतली आहे. म्हणजे एकाच घरात मायलेकी जावा - जावा आहेत. पण इथे ही पुन्हा जातीवर्णव्यवस्थेची उतरंड आहेच. कवीने या व्यवस्थेचा नेटका संदर्भ या ओळींमधून दिलाय.

* जातियों के आपसी भेद थे
कोई जाति कुछ ऊंची
कोई जाति कुछ नीची
स्त्री पुरूष भिन्न - भिन्न शाखा के हुए तो
मुश्किल पड जाती थी।

कुमारेंद्र पारसनाथ सिंह यांची कविता आहे. 'भंगी कॉलनी' ; या कवितेतून एका हरिजन कन्येच्या बलात्काराच्या प्रश्नाची चर्चा आली आहे. या कन्येच्या देहावर - मनावर तिच्या आयुष्याच्या वर्षापेक्षा अधिक वार झाले आहेत. भूक आणि बलात्कार या अंधारकोठडीत तिची सारखी रवानगी होतांना आपल्याला दिसते. एका भयावह अंधाराशी मुकाबला करणारी ही कन्या कवितेची नायिका आहे. 'मैं' (मी) कवितेचे केंद्रीय पात्र आहे. त्याला या कन्येची कणव येते. तो तिच्यावर प्रेम करतो. तिच्या अंधारयात्रेला प्रकाशाची मशाल देण्याच्या प्रयत्नातच तो त्या बलात्कारीत कन्येची किंकाळी ऐकतो. सुसाट धावत जातो तिला सोडाविण्यासाठी पण तिथले अपरिचितचेहरे त्याला घेरून टाकतात आणि अपराधी मानून बदनाम करतात कवी म्हणतो -

*उनकी नीयत पर कोई शक नही कर सकता।
उसके माथे पर लाज देकर वे बहुत उंचा उठ गए हैं।
वे अब सचमुच बहुत बडे लोग हैं।

धर्म, ईमान, नैतिकता,
सामाजिक दायित्व आदि उन्हींपर टिके हैं।

कवितेतल्या 'मै' ला आत्मसंघर्षाच्या वादळी आणि यातनामय वाटांवरून चालण्याचा शाप मिळालेला आहे. तो नकाराची जाणीव पेरू इच्छितो. मूकनायकाच्या ओठांवर धगधगत्या ज्वालाग्राही शब्दांची पेरणी करू इच्छितो. यातनांच्या मूळाशी जाऊन प्रश्नाची परखड चिकित्सा करीत असतांना मग तो तटस्थपणे बोलत रहातो. या तटस्थांची एक खूण कविने त्या दुदैवी कन्येच्या मुखाने वदविली आहे. या वक्तव्यातील तटस्थता, कोरडेपणा आणि आत्म - अलिप्तपणा बघण्याजोगता आहे. कवी म्हणतात-

*जब तक मेरे घरवाले
दारू की बोतल और ताडी की लबनी में
कैद होने के लिए
अपनी जबान और हाथ कटाते रहेंगे,
तब तक मेरी खैर कहाँ है ?

आपल्या पतनासाठी 'दुसऱ्या' माणसाला दोष देतांना ती म्हणते की याच्या हातात अधिकार अन् खिशात पैसा असतो. आर्थिक समानता नांदली तरच शोषण थांबेल. अनैतिकता रोखता येईल. तिची मागणी अगदी स्वच्छ, ठाम आणि ठाशीव आहे.

*किसी के भी सामने फैलने की
मेरे मुँह और हाथों की आदत को बदलो
अपने ढंग से बोलन
और अपने ढंग से उठने का उन्हें मौका दो।

आपल्या 'सवाल अब भी मौजूद है।' या दीर्घ कवितेत श्री. प्रताप सहगल यांनी 'हरिया' या पात्राला केंद्र कल्पून परंपरा, ईश्वर, व्यवस्था, क्रांति, मजूर, हक्क - कर्तव्ये, हरताळ - संप, मागण्या - बोनस, शोषण - फसवणूक या सारख्या मुद्यांची काव्यात्म चर्चा केली आहे. वाढत्या वयासोबत हरियाच्या मनाला पुढील दंश करत रहातात. या गाडया कुणाच्या? विमानातून कोण बरे प्रवास करतात? घरांना आगी कोण लावतो? दंगली का उसळतात? देव कुठाय? कुठाय देव? या कवितेमधून पोलीसी यंत्रणेची चिरफाड ही केलेली आढळते. पोलीस आणि कसायात फक्त पोशाखाचाच फरक आहे असे म्हणून तर कवी म्हणतांना आढळतो. हरिया च्या कर्तृत्वाची क्षितीजे विस्तारत जातात. जो आंतरराष्ट्रीय संमेलनांमधून हिंडतो आणि अखेर पंख कापलेल्या पाखरागत त्याची विलक्षण तडफड आपल्याला गुदमरवून टाकते. यातून मजूरांच्या प्रश्नांची सम्यक चर्चा व व्यापक आकलन दिसून येते.

हिंदी भाषेतली समकालीन दीर्घ कविता अश्या दलित समस्यांच्या विविध आणि बहुरंगी संदर्भांनी नटली आहे. यात जीवनाच्या भीषणतेची, कहिलीची आणि तगमगीची शब्द यात्रा वाचता येते. सामान्य माणसांच्या व्यथा - वेदनांची ही कविता पृथगात्म आहे. राजकारणामुळे म्हणण्यापेक्षा राजकारण्यांमुळे एकूणच समाजगंगेत निर्माण झालेले प्रदूषण फार भयावह आहे. घोषणा, मोर्चे, आदोलने, संप, ताळेबंदी, शोषण, कुपोषण, उपोषण, सांप्रदायिकता, अतिरेकी हैदोस, विघटनवादी तत्वे, जाळपोळ, दंगली, लूटालूट, बलात्कार, मूल्यहीनता या तमाम नकारात्मक संबंधामागे राजकारंण्याच्या धूर्त डावपेंचाची सनातन खेळी आहे. या कवितांमधून समकालीन वास्तवाचे दाहक, भीषण, कटु, तिक्त चित्र मांडले गेले आहे.

वास्तवाशी मुकाबला करतांनाही ही दीर्घ कविता आक्रोशमुक्त असून अधिक संमजस आहे. प्रश्नांच्या तळापर्यंत उतरतांना स्तब्ध आणि तटस्थपणे तारतम्याचा बोध या कवितेला आहे. मांडणीची अधिक नेटकी रीत असल्यामुळे काव्यदृष्ट्या ही या रचनांचा अभ्यास विशिष्ट ठरावा असाच आहे.

# हृदयीचा भाव

सोपानदेव चौधरी

आदिवासींच्या लोकगीतात एक गोडवा आढळून येतो. त्यांची गोडी रानमेव्यासारखी मधुर आहे. आदिवासींच्या जीवनात निसर्गाची शिकवण जास्त आहे. निसर्गाने त्यांना जेवढे शिकविले तेच त्यांचे ज्ञान होऊन बसले. पेठच्या बाजूला एकदा प्रवासाला गेलो असतांना ही गाणी मला ऐकायला मिळाली. आंब्याला मोहोर आला म्हणजे लग्नसराई सुरू होते. आदिवासी बहिण आंब्याच्या झाडाकडे पाहते. त्या आंब्याला मोहोर आलेला नसतो. लग्नाला आलेल्या आपल्या लाडक्या भावाची तिला आठवण होते, आणि ती गाऊ लागते -

आंब्यां मोवूरा मोवूरा कधी येसी ?
भाऊ नवरा नवरा कधी होसी ?

मोहोराने आंब्याचे झाड पिवळे कधी होईल अन आपला भाऊ हळद लागून पिवळा धम्मक कधी होईल ? हा विचार काव्यरूपाने तिच्या अंतःकरणात येतो. आंब्याच्या झाडाला ती विनंती करते. तुला एकदाचा मोहोर येऊ दे आणि माझ्या लाडक्या भावाचे लग्न होवू दे. देवा ब्राम्हणांपेक्षा ती आंब्याच्या झाडाला जास्त मानते.

आदिवासी लोक टोळ्या करून रहात असत. अजूनही राहतात. अगदी कुत्र्याच्या हाकेवर त्यांची वस्ती असणार. एक सासुरवाशीण मुलगी आपल्या माहेरी निरोप पाठविते. पक्षाला सांगितलेले निरोप आतापर्यन्त सर्वांना माहीत असतील, परंतु फुलपाखराला निरोप्या म्हणून कुणी माहेरवाशिणीने पाठविले आहे कां ? ही माहेरवाशिण फुलपाखराला सांगते-

झारझुरू पांखरू मैना ग । आयडा निरोप मैना ।
सांगणो बापालं,। झारझुरू पाखरू मैना, ।

फुलपाखराला निरोप्या म्हणून पाठविण्यात केवढी रसिकता भरलेली आहे. रसिकतेच्या मागे एक हेतू दडून बसला आहे हे ही विसरता कामा नये, या माहेरवाशिणीला शहरी स्त्रीयांप्रमाणे फुले काढलेली साडी पाहिजे होती. त्याशिवाय ती फुलपाखराला निरोप्या म्हणून कशी पाठविणार. आई बापांना मुलीचा लळा असतो. मुलगी सासरी निघाली की अंतःकरण हुंदका देवू लागते. कन्या मागे वळून पाहते. तेंव्हा आदिवासींचे गीत म्हणते

चाफ्याची कळी री चाफ्याची कळी
कोणी ती वाढविली, बापानं वाढविली
परदारी मायी ....गेली !

आदिवासी लोकांमध्ये मुलीला बापाचा जास्त लळा दिसून येतो. आणि तेच निसर्गाला धरून आहे.

चांदा पासली चांदनी ग चांदनी
हीत कोनाची लाडकी ग
हीत बापाची लाडकी ग

अशी जिव्हाळ्याची गाणी आदिवासी स्त्रीयांनी गायली आहेत. या व्यतिरिक्त राम कृष्ण देवादिकांवरही काही गाणी आढळून येतात. त्यात देवांविषयी भाविकता, कृतज्ञता पुरेपुर भरलेली दिसेल. आदिवासी जनता ही निसर्गाची लेकरं असल्याने चंद्र, सूर्य, तारांगण, धरित्री, पाउस यानांच ते देवता मानतात. विजेचा चमचमाट करणारा डोंगर आणि मेघांची गर्जना करणारा डोंगर - या देवतांचे गाणे ऐकल्यावर याची सत्यता पहाण्यासारखी आहे.

गरज्या डोंगर गरजतो, गरजतो.
ईजल्या डोंगर इजलतो, इजलतो.

आदिवासी गाण्यातील एक स्वतंत्र विभाग म्हणजे 'लग्न - समारंभात म्हणावयाची गाणी' हा होय. नवरानवरीला हळद लागल्यापासून तर लग्न समारंभ संपल्यानंतर हळद उतरण्यापर्यन्तची गाणी या भागात दिलेली आहेत. काव्याबरोबरच त्यांच्या चालीरीती अभ्यासण्यासारख्या आहेत. लग्नात मुख्य स्थान हळदीला आहे. मळ्यात हळद पिकविण्याऱ्या जंबू माळ्यापासून तर हळदी भरून नेणाऱ्या गाडयापर्यन्त हळदी महात्म्य वर्णन केले आहे. आदिवासी जनांना पिवळे व्हायला गाडया भरभरून हळद लागते. त्यांना या गोष्टीचा अभिमान वाटतो. नवऱ्या मुलाला प्रथम पायापासून ते डोक्यापर्यन्त सुवासिनी हळद लावतात. नंतर शेवटच्या दिवशी डोक्यापासून तळपायापर्यन्त हळद उतरवितात आणि मग त्या शुभ मंगल हळदीला सांगतात.

हाळद उतर व मुखाचे नेजी
हाळद उतर व उराचे नेजी
हाळद उतर व ढोपराचे नेजी

हाळद उतर तळपायाचे नेजी
हळदायबाई, हळदायबाई
तूंत जाई व जंबू माळ्या घरी।

हळदीबाई, हळदीबाई, आता तू जंबू माळ्याचे घरी जा आणि पुढच्या मंगलकार्याला सोन्याच्या पावलाने पुन्हा आमच्याकडे ये, असे त्या हळदीबाईला आळवून आळवून सांगतात. आदिवासी लोकांची स्नेहसंमेलने म्हणजे लग्नसमारंभ. लग्नसमारंभाच्या निमित्तानेच त्यांचे स्वकीयात स्नेह संमेलन, तेच त्यांचे व्यासपीठ, तिथेच त्यांची रंगभूमी, तिथेच पंडितमैत्री अन् तोच सभासंचार.

थाळ गाणे हा एक प्रकार आदिवासींमधे आहे. त्यातील काही लोकगीते सांधिक गायनासाठी आहेत. एका मोठया थाळीला मधोमध काडी लावून त्या काडीवर बोटे फिरविली म्हणजे धारदार गोड स्वर निघतो. त्या स्वराने वातावरण दुमदुमून गेल्यासारखे वाटते. या वाद्याच्या साथीवर ही गाणी गायली जातात.

रात्री या गाण्याची बैठक सुरू झाली, म्हणजे त्या धुंद वातावरणात रात्र केंव्हा उलटून जाते ते कळत नाही. आदिवासींच्या वास्तव्याला, त्यांच्या संरक्षणाला देवाने धाऊन यावे असाच या गाण्यांचा मुख्य सूर आहे.

धेनां गायल्या रे, आप धरतारी देवा
धेनां गायल्या रे, आप धरतारी देवा।

एवढयाच ओळी परंतु ते आळवून आळवून गात असतात. काव्यापेक्षा स्वरांतील धून या गाण्यात जास्त महत्वाची असते. दोनच ओळी परंतू नादब्रम्हात घोळून घोळून त्यांचा ते मंत्र बनवित असतात, एवढे सांगितले म्हणजे पुरे.

त्यानतंर 'ठाकूर गाणी' हा एक लोकगीताचा हृद्य भाग अभ्यासण्यासारखा आहे. काही लोकगीतात कथांचे संकेत मोजक्या शब्दात गुंफलेले आढळून येतील.

आपला सुंदर पिसारा उभवून मोर नाचत आहे. नाचता नाचता आपल्या पायाकडे पहात तो अश्रू ढाळीत आहे. मोराचा इतका सुंदर पिसारा, इतके सुंदर रूप, असे असूनही तो अश्रू कां बरे ढाळतो? आपल्या बेढब आणि काळ्याकुट्ट पायांकडे पाहून त्याला अतिशय दु:ख होत आहे. आपले पूर्वीचे सुंदर पीतवर्णाचे पाय सांळुकीने उसनवार म्हणून मागून नेले. तिला श्रीराम प्रभूंच्या लग्नाला जावयाचे होते. तिने हे बेढब पाय मला दिले. आता ती माझे पूर्वीचे सुंदर पाय द्यायला तयार नाही.

गजने डोंगरातले दादा
नाचतो गजा मोर
पाय काशा काळ काळ रे
पाय नेल साळोखी दादा
आता नाचायच्या वेळ दादा
येत डोळ्याला आसूळ!

रोहिणी नक्षत्र आले. पावसाचे नांव नाही. अजून भोजा पक्षी 'पेर्तेव्हा, पेर्तेव्हा' अशी ललकारी ठोकीत आला नाही. वरूण राजाने अजून त्याला कां पाठविले नाही? कुणबी लोक हवालदील झाले आहेत.

मोठं मोठं खोरीलं भोजानी लाहो केला
भोजानी लाहो केला - पानीज बोलावला
पानी पड चितचा कुळंब्याचे हिताचा

भोजा पक्षाला ते प्रार्थना करीत आहेत. या पक्ष्याला निरनिराळ्या नांवाने ओळखतात. कुणी पावशा, कुणी पपीहा, कुणी पोप्पा म्हणतात. आदिवासींची वरूणाची प्रार्थना चालली असतांना त्या गीत गायनात पावसाची झुबंड चालली आहे, असा भास झाल्यावाचून रहात नाही. ढोल वादन एकदा सुरू झाल्यावर, विश्वसंगीताला जणु दिगतरांतील अनाहत साथ देत असल्याचा भास होतो.

पड पान्या पड पान्या
धरतारी सुकली र
धरतारी सुकली र
कनसारी कोमली र

शास्त्र हे शास्त्राच्या मार्गाने कसे जाते? ही गंमत या गीतगायनात अनुभवायला मिळते. वास्तविक आदिवासींना रागरागिणींचे ज्ञान बिलकूल नाही, असे असतांना देखील त्यांच्या या गायनात मेघमल्हाराचे स्वर हजीरी देऊन जातात आणि संगीत रत्नाकराच्या संकेताची आठवण देतात. पाऊस आला की त्यांच्या आनंदाला पारावार रहात नाही. अन्नधान्य पिकविणाऱ्या धरित्री माऊलीला ते वंदन करतात.

माझां नभीन रं धरतारी मातालं
माझां नभीन रं कनसारी मातालं
माझां नभीन रं पानिया देवालं
माझा नभीन रं डूज कां गाजलं

(पान १३ वर पाहा)

# साहित्य म्हणजे आवेश नव्हे

## किसनराव पवार

आदिवासी साहित्य संमेलने महाराष्ट्रात नियमितपणे होवू लागली असून आजपर्यन्त चार संमेलने पार पडलीत. बहुसंख्य आदिवासी साहित्यिक नवशिक्षित आहेत व ते स्वाभाविकही आहे. आदिवासींच्या प्राचीन साहित्यात आदिवासी जीवनाबरोबरच नागरी समाजाचेही चित्रण आलेले दिसते. नव्या साहित्यीकांनी मात्र साहित्याची सर्वसमावेशकता दुर्लक्षलून आवेश व अभिनिवेशालाच व एकांगी, अपुऱ्या चित्रणालाच साहित्य मानण्याचे ठरविलेले दिसते.

इन्द्रधनुष्यातील सात रंगाचे बेमालूम झालेले मिश्रण प्रकाशाच्या किरणाकडे पाहिले असल्यास दिसून येत नाही. एका विशिष्ट प्रसंगीच त्याचे दर्शन घडते. अशीच अपेक्षा, आमची साहित्यकाराकडून आहे. जीवनदायी प्रकाश किरणाचे विभाजन केल्यास मूळ प्रकाश नाहीसा होईल. तसेच साहित्याचे वेगवेगळे विभाग आपण करीत बसलो तर त्याचे मूळ स्वरूपच नष्ट होईल.

साहित्याची निर्मिती ही समाजाच्या प्रबोधनासाठी असते. ती निर्मिती होत असतांना समाजात विविध घटक असतात. त्यांचे रितिरिवाज चालीरिती संस्कृती ही वेगवेगळेपणाने नटलेली असते. आपण जर वेगवेगळ्या प्रवाहात समाविष्ठ व्हावयाचे ठरविल्यास त्याचे काय परिणाम होतील हे सांगण्यासाठी भविष्यवेत्याची गरज नाही. साहित्य निर्मितीचा अंतिम हेतू हा समाज प्रबोधनाचाच असावा यात दुमत होण्याचे काहीही कारण नाही.

मानवी स्वभावाचे आपपर भावनेने समाजात परंपरा आणि रूढी निर्माण झाल्या आहेत. परंतु त्या कालचक्राशी समांतर राहू शकत नाही. कारण अनंताचे जसजसे संशोधन होते तसतसे नव्या तारका व ग्रह दृष्टीस पडतात. व नव्याचे जुनेपण होते व नवेपणाच्या भोवती विचारधारा घुमू लागतात. कालचक्राचे गतिमुळे रूढया आणि परंपरा या कालबाह्य ठरत जातात. पण नवे विचार समाज सहजासहजी स्वीकारत नाही त्याला त्याप्रत जाण्यासाठी प्रभावी साहित्याचा वापर करावा लागतो. कारण समाजमनाला काव्याची आणि साहित्याची भाषा चांगली समजते. ती समजली की मग हळूहळू परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होते व ते कालचक्राचे समांतर धावू लागते. एवढा मोठा प्रभाव साहित्याचा जनमानसावर पडलेला आहे. समाजाला साहित्याचेच घाव समजतात. व सहन होतात म्हणूनच ज्ञानी माणसांनी या समाजाच्या बाळसेपणासाठी, समृद्धीसाठी, विकासासाठी जे साहित्य नावाचे शस्त्र आहे त्याचा अचूक वापर केला पाहिजे. शस्त्र हे दुधारी ही ठरू शकते.

साहित्य अपार आहे पण ते जर महापूराप्रमाणे आजुबाजुच्या परिस्थितीचा नाश करून घोंघावत वाहून जात असेल तर त्या साहित्याला साहित्य म्हणावे काय? हा प्रश्न निर्माण होण्यासारखी आज परिस्थिती निर्माण होत आहे. पण तोच जलसंचय नियोजनाने सर्व समाजभर सर्व क्षेत्रात सारखा फिरविला तर समाजात साहित्य विषयक समृद्धी, विविधता सर्वत्र बहरून आलेली आढळून येईल.

साहित्य निर्मितीचा प्रभाव जोरदार असेल तर समाजातल्या उंच भागावर (दुर्लक्षित) पोहोचू शकेल व सखल त्या गतीने पसरेल. म्हणून प्रवाह जोरकस असावयास हवा. आपण जर लहान लहान नाल्याच्या किंवा ओढयांच्या सहाय्याने समाजात समृद्धी आणण्याचा प्रयत्न केला तर उंच भागावर त्याचे परिणाम होणार नाही तर सखल भागावर त्याचा काही उपयोग होऊ शकेल. म्हणूनच आपण मुख्य प्रवाहाच्या धारेचीच जोपासना केली पाहिजे. लहान लहान प्रवाह कुरवाळीत बसणे ही आपल्या संकुचित दृष्टीचे गमक आहे.

शिक्षणाच्या प्रसार हा सर्व प्रथम शहरी भागात झाला त्यामुळे शहरी संस्कृतीतील साहित्य निर्माण झाले तो प्रवाह ग्रामीण भागाकडे वळला तेव्हा ग्रामिण संस्कृती व साहित्याची निर्मिती होऊ लागली व ती शिक्षणाची गंगा दलित व आदिवासी पर्यंत जाऊन पोहोचली तेव्हा त्या संस्कृतीत त्या प्रकारच्या साहित्याची निर्मिती होऊ लागली. शहरी संस्कृतीतील साहित्य निर्माण झाले तेव्हा ते सर्व समावेशक असण्याची अपेक्षा करणे गैर आहे व शहरी साहित्याची निर्मिती हा तर विशाल साहित्य निर्मितीचा उगम स्थानावरील प्रवाह आहे. म्हणूनच त्यापासून खूप अपेक्षा करणे गैर आहे हा प्रवाह सर्व समावेशक रितीने वाहू लागेल तेव्हाच आपण अपेक्षा करू या! आता साहित्य निर्मितीची खरी प्रक्रिया सुरू झाली आहे. वास्तविक मराठी भाषेला अजून

(पान १३ वर पाहा)

# आदिवासींचे 'काज'

## डॉ. भास्कर गिरीधारी

दिवाळीनंतर अचानक आलेल्या निरोपामुळे प्रसिद्ध गीतकार अशोक जी. परांजपे व श्री. नानासाहेब मेटकर यांच्यासह जामसर जवळच्या हिरडपाडयाला जाण्याचा योग आला. तिथे गेल्यावर मला प्रथम वाटले की हिरडपाडयावर आज एखादी यात्राच आहे. कारण अनेक आदिवासी स्त्रीया उत्साहाने सजून आलेल्या दिसल्या. अनेक दुकानेही लागलेली होती.

### अनावर रडणे

आम्ही मांडवाच्या दिशेने आणखी थोडे गेलो सुरूवातीला मला काहीच बोध होईना. त्या ठिकाणी आठ-आठ दहा-दहा बायकांचे घोळके स्वतंत्रपणे बसले होते. त्यातील एका बाईच्या मांडीवर कापडात गुंडाळलेले गाठोडे ठेवलेले होते. बायका रडत होत्या. रडत रडत मृतात्म्याला साद घालीत होत्या. सगळीकडे नजर फिरवली. तर अशी जवळ जवळ वीस पंचवीस टोळकी त्या मांडवात बसलेली होती. नवीन येणारे नातेवाईक आपापल्या टोळ्यात सामील होत होते आणि रडायला साथ देत होते. त्यामुळे दु:खाची भावना दरवेळी उफाळून येई आणि तेवढया पुरती त्याची तीव्रता वाढे, याचे पार्श्वसंगीतही शोकानुभव गडद करणारे होते. काही घोळक्यामध्ये भेदरलेली लहान मुले दिसत होती.

### " काजा "ची कल्पना

दहा पंधरा ढोलवाले, ढोल घेवून विशिष्ट प्रकारे वाजवित होते. हे ढोल वाजविण्याचे भिन्न प्रकार आदिवासींमध्ये आहेत असे समजले. वारलीच्या काजात मात्र " डाका "हे वाद्य दोन्ही बाजूला निमुळते होत जाणारे आणि गुडग्यावर घेवून वाजविण्याचे असते. ढोल हा देवाकार्याचा भिन्नप्रकारे वाजतो काजा सारख्या श्राद्धाच्या समारंभाच्या वेळी वेगळा वाजविला जातो.

तपशीलात जावून चौकशी केली तेव्हा कळले की दिवाळीनंतर येणाऱ्या पहिल्या शनिवारी ज्या कुणाला त्यातल्या श्रीमंत आदिवासीला हजार दोन हजार रूपये खर्च करून " काज " घालायचा आहे. त्याच्या पाडयावर तो ढोल वाजविला जातो. म्हणजे निरोप न देता निमंत्रणे न पाठविता सर्वांनी समजावयाचे की त्या पाडयात यंदा काज आहे.

प्रत्येक आदिवासींच्या उपजातीचे " काज " स्वतंत्रपणे साजरे होते. आम्ही गेलो होतो त्या हिरडपाडयावर " क " ठाकूरांचे काज होते. या वर्ष-सहा महिन्यात ज्यांच्या ज्यांच्या घरी कुणी दिवंगत झाले असेल अशा सगळ्या लोकांनी मिळून एकत्र येवून हे काज साजरे होते. त्याप्रमाणे त्या सूचना त्यांना ढोलाच्या विशिष्ट नादाने आपोआप मिळालेल्या असतात. हे काज साधारणपणे दिवस दिड दिवस चालते म्हणजे २७ ऑक्टोबरलाच हे लोक येवून दाखल झाले होते. भर दुपारपासूनच रात्रभर काही न खाता उपाशी राहून सगळेच समदु:खी, मृताला द्यावयाच्या वस्तूंचे गाठोडे कवटाळून, धाय मोकलून रडत राहिलेले होते, आणि दुसऱ्या दिवशी दुपारी म्हणजे २८ ऑक्टोबरला हा कार्यक्रम आटोपला. वारली समाजात पाच दिवस उपवास करण्याची प्रथा आहे, असे समजते.

### श्राद्धात रडणे

दुपारी रडून रडून त्यांच्या डोळ्यातील पाणी आटलेले दिसले आणि उपाशी पोटी आवाजही बसलेले होते. तरीही आक्रंदन चालूच होते. काही घोळक्यात 'मोले घातले रडाया' अशीही स्थिती होती. सहाजिकच मृतात्मे निघून जावून बरेच दिवस झालेले आहेत. भावनांची तीव्रता कमी झालेली आहे. आणि तरीही या ठरलेल्या दिवशी सगळे हा समारंभ करीत आहेत. त्यामुळे मंडपभर चार पाचशे माणसे नुसती आक्रंदन करीत होती. इकडे ढोल गतीने वाजत होता. डोक्यात लख्खकन प्रकाश पडला. हे तर सामुदायिक श्राद्ध आहे. सामुदायिक विवाह, सामुदायिक व्रतबंध, जसे साजरे होतात. तसेच मृतांचे विधिवार न पाहता ठरलेल्या दिवशी सर्वांनी मिळून एकत्र येवून श्राद्ध करण्याची

पद्धत आहे.

थोडा विचार केला तर तेव्हा लक्षात आले ह्याच्या मुळाशी कदाचित आदिवासींची गरिबीही कारणीभूत असेल. प्रत्येकाला ब्राम्हण बोलावणे, तांदळाचे पिंड घालणे आणि जेवणावळी उठवणे, हे कसे शक्य होणार ? म्हणून सोप्या पद्धतीत सामुदायिक श्राद्धाची एक थोर आणि उदात्त प्रथा आदिवासीमध्ये खळली असावी. त्यातला काही थरारक भाग वगळल्यास ही प्रथा अनुकरणीय आहे यात शंका नाही.

## समारंभ की सोहळा

मोठया मांडवात हिरव्यागार बांबूचा एक छोटा माडंव घातलेला असतो. त्या माडवांवर जे गवत असते त्याला काजाचे गवत असे म्हटले जात असावे. या छोटया मांडवात साळ, वरई अशा धान्याचे छोटे ढीग केले होते. एका कोपऱ्यात एक टोपली होती आणि त्या टोपलीत आदिवासींचा देव ठेवलेला होता. तो देव म्हणजे बहुधा हिरवा, बहिरोबा असावा. तिथे काही लहान मोठया आकाराचे पिंड ठेवलेले होते. ते पिंड भाताचे नसून मातीचे होते. त्याच्या भोवताली वेगवेगळ्या प्रकारचा आवाज देणारी वाद्ये घेवून वाजविणारी माणसे बसली होती. सुरूवातीला शंख फुंकले गेले भजन म्हटले टाळ वाजवले पण त्या रडण्याच्या एकच हलकल्लोळात शंखाच्या आवाजापलिकडे त्या गाणाऱ्याच्या गाण्यातला शब्दही कळत नव्हता.

प्रत्येक मृताच्या गटाबरोबर कमीत कमी एक ढोलवाला आणि दोन ज्यांच्या अंगात नेहमीच वारे सचांरीत, अशी माणसे आणलेली होती. त्यांना 'भापे' म्हणतात मृतांच्या नातेवाईकांनी फार अगोदरच सुपारी देवून त्यांना आणलेले असते आणखी विशेष म्हणजे हे भापे अनोळखी असतात व मृताम्यांच्या अंगात संचार झाल्यावर अचूकपणे गर्दीतून ते मृतात्म्याच्या नातेवाईकांना हेरतात.

पाहता पाहता ढोलवाल्यांची संख्या व आवाज भरपूर वाढला. वातावरण निर्माण झाले. द्रुतगतीने सगळ्या हालचाली होवू लागल्या. मोहाच्या दारूचा भपकारा आसमंतात आणि मांडवात दरवळत होता. त्यावरून बहुतेकांनी समारंभपूर्वक दारू घेतलेली होती. याची कल्पना आली आणि ती धुंदी त्यातूनच निर्माण झालेली होती.

भर दुपारी तीनच्या सुमारास " कांबडी ". कांबडी म्हणजे श्राद्धाचे मंत्र म्हणणारा तो पुरोहित। भिक्षुक। तो आदिवासींच्याच बोलीभाषेतून मंत्रोपचार करून मृतात्म्याला आवाहान देतो. केवळ लंगोटी लावलेले संपूर्ण उघडे असे वीर काही ठराविक गावातून आलेले काळसर रंगाच्या तलवारी हातात घेवून त्या ठिकाणी उभे राहिलेले होते. त्यांनी त्यांच्या जवळच्या खंजीरांच्या वाराने आपले मस्तक रक्ताच्या चिळकांडया उडाल्या त्यांचे रक्त मानेवर पोटावर छातीवर ओघळलेले दिसत होते आणि तरीही ती माणसे हू की चूँ न करता आपापसात बोलत होती भेटत होती. आणि हिंडत होती. या कार्यक्रमाबरोबरच प्रत्येक गडातील त्या दोन माणसांच्या अंगात मृताचा सचांर झाला. ते सर्वांगाने थरथरू लागले. मूठ आपटू लागले आणि बायका आपला मृतात्मा त्यांच्यात संचारला असल्याच्या कल्पनेने नमस्कार करू लागल्या. कडकडून भेटू लागल्या. पोहे आणि वरई त्यांच्या कपाळी लावत होत्या. भेटी घेत होत्या.

तो अगांत आलेला माणूसही प्रत्येक नातेवाईकाला ओळखून जवळ घेवू लागला व दसऱ्याच्या शिलंगण सोहळ्याप्रमाणे वयाच्या भेदाचा विचार न करता ते एकमेकास अलिंगन देतात. ते पाहता पाहता रडण्याचा भयानक आक्रोश मावळतो आणि आनंदाचे वातावरण निर्माण होते. गाठोडयातील सर्व वस्तू, तेल, कंगवा, तांब्या, पितळेचे काही दागिने इ. त्या अंगात संचारलेल्या मृतात्म्याला आप्ताकडून अर्पण केले जातात.

तो अंगात आलेला 'भावे' मुठ वळवून पायाची मांडी घालून बसतो. त्याला सगळे मिळून ताठ करतात हाता पायांना हालचाली देतात. त्या नंतर पूर्ववत सामान्य माणसासारखे होतात.

हे काज एवढयावरच संपत नाही, तर त्या ठिकाणीच काही पोक्त समजुतदार माणसे मृतात्म्याच्या विधवेला किंवा विधुराला भावी आयुष्यात उभे करण्याच्या दृष्टीने बाजूला घेऊन बोलणी करतात. असेही ऐकायला

मिळाले की काही वेळा जिथल्या तिथे जोडी निश्चित होवून पुन्हा उध्दवस्त संसार उभारण्याला सुरूवात होते. लग्न जमते पण प्रत्यक्षात हा प्रकार आमच्या निदर्शनास आला नाही मात्र त्या एकत्र येण्यामागे तोही एक हेतू असावा हे जाणवले.

आपल्या वस्तीवर परतल्यानंतर काहीच मार्ग उरत नाहीत म्हणूनच या एकत्रीकरणातून तरी विवाह जुळून आणावेत असा प्रयत्न स्वाभाविक वाटतो.

डोक्याला जखम करून घेणारी व्यक्ती यांना एक खास वनस्पती औषधी माहिती असते की त्यामुळे ते आपला घाव दोन तीन दिवसात बरा करतात.

दारूच्या देवाण घेवाणीचा प्रकार आणि वीराचे रक्त भाबांळ होणे या दोन गोष्टी वगळल्यास या प्रथेचे निश्चितच उदात्तीकरण होवू शकते. त्यातील सद्हेतूही स्पष्ट होतो.

आदिवासींच्या या प्रथा नेमक्या किती वर्षापासुन सुरू आहेत व त्यांचे मूळ स्वरूप असेच होते का ? या प्रश्नांचा शोध घेतल्यास अधिक काही हाती लागेल या विचारात हा काजाचा सोहळा पाहून आम्ही परतलो. ✿

(पान ९ वरून)

आदिवासी जनांच हे भूमीवंदन म्हणजे त्यांचे 'वंदे मातरम्' गीतच नव्हे कां ? काम करता करता आणि घाम ढाळता ढाळता निसर्गाच्या सहवासात ही गाणी आदिवासी जनांना स्फुरली आहेत. ती गाणी कुणी रचली ? याची नांव निशाणी त्या महाभागांनी नावांना झिडकारून आपल्या हृदयीचा भाव तेवढा मागे ठेवला आहे. ही गाणी परंपरेने गायिली जात आहेत व लोकगीतातील अलौकीकता रसिकांना पटवून देत आहेत.

(आदिवासी विकास प्रतिष्ठान व आदिम साहित्य यांच्या सौजन्याने). ✿

(पान १० वरून)

खूपच समृद्ध व्हावयाचे आहे. आपणापेक्षाही संख्येने लहान केरळ, आंध्र, कर्नाटक हे आपल्यापेक्षाही साहित्याने समृद्ध आहे. आपणातील विभाजनता हेही आपल्या आड येते असे माझे मत आहे.

दहा आंधळे एकत्र आले आणि त्यांनी हत्तीच्या वेगवेगळ्या भागास स्पर्श केला तेव्हा त्यांना अनुभव तोच हत्ती आहे असे त्यांनी मत व्यक्त केले. पण दहा भाग जेव्हा एकत्र येतील तेव्हाच हत्तीचे चित्र स्पष्ट होईल. अन्यथा नाही हे सांगण्याची आज गरज निर्माण झाली आहे. वेगवेगळेपणाने निर्माण झालेले साहित्य म्हणजे साहित्य नव्हे तर सर्वांचे मिळून असलेले साहित्यच पूर्णत्वाप्रत गेलेले आढळेल.

परंतू आज प्रत्येक क्षेत्रातील साहित्यीक, अभिनवेशाने पछाडलेला दिसतो व तुलनात्मक गैर चर्चा करीत असतांना दिसतो. प्रत्येकात सौंदर्य असेल समाज प्रबोधनाची प्रक्रिया असेल शब्दात सामर्थ्यही असेल पण साहित्याचे विभाजन करणे मात्र गैर आहे.

आज प्रचंड साहित्याची निर्मीती होत असतांनाही माणूस हा वखवखलेला दिसत आहे.

अजूनही कोठे तरी अपूर्णता आहे असे वाटते. आता नुकतेच शिक्षणाच्या गंगेने आदिवासी मुलखात प्रवेश केला आहे ते क्षेत्र म्हणजे निसर्गाचे वरदान असलेले क्षेत्र आहे. प्राचिन काळातील वेद आणि पुराणात निसर्गाचीच आधिक वर्णने आढळून आली आहे. रामायणातही रामचंद्रांच्या १४ वर्षाचा वनवास हाही निसर्गाच्याच सान्निध्यातला आहे. त्यामुळे रामायणाची व वेद वेदांतांची लोकप्रियता आज कायम आहे. निसर्गाने साऱ्यांना प्रभावित केले. म्हणूनच चिरस्मरणिय साहित्य निर्माण झाले. यामुळे साहित्यातील अपूर्णता निसर्गाच्या सान्निध्यात निर्माण झालेल्या साहित्याने दूर होईल व मानवी जीवनात विपूल साहित्य निर्मिती नंतरही जी वखवखता आहे तीही दूर होईल.

म्हणून आदिवासी साहित्य संमेलने अभिनवेशी होऊ नये तर मराठी साहित्यातील अपूर्णता पूर्ण करण्यासाठीच त्याची निर्दोषपणे निर्मिती व्हावी असे प्रयत्न व्हावे. असुया व द्वेषाला पुरक ठरू नये एवढीच अपेक्षा. ✿

# पावरा व भिल्ल जमातीचा होलिकोत्सव.

-श्री. दिलीप इंगळे,

सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी भिल्ल, पावरा या आदिवासी जमाती वसलेल्या आहेत. जसा कोकणात गणेशोत्सव हा सगळ्या सणापैकी मोठा सण मानला जातो तसाच या जमातीमध्ये होळी हा सण मोठा मानला जातो. बहुजन समाजात होळी हा सण फक्त एक दिवसापुरता मर्यादित असतो. परंतु भिल्ल व पावरांची वस्ती असलेल्या भागात हा सण सुमारे ५ दिवस साजरा करीत असतात. हा होळीचा सण दोन प्रकारे साजरा करीत असतात. उदा. गावात काही रोगराई पसरली असेल किंवा गाव संकटात असेल किंवा गावात पीकपाणी चांगले झाले नसेल. त्या गावामध्ये शेणाच्या गोवऱ्यांची होळी साजरी करीत असतात. दुसरा प्रकार गावात आनंदी आनंद असेल व पीकपाणी चांगले तर लाकडांची होळी साजरी करीत असतात.

गोवऱ्यांची होळी ज्या गावामध्ये असते त्या गावात एक महिना अगोदर सागाच्या लाकडाचा दांडा गाडून देतात व होळीच्या दिवशी गावातून गोवऱ्या जमा करून होळीची पूजा करून पेटवत असतात. त्या होळीत लाकडे वगैरे टाकत नाहीत. होळी पेटवल्यानंतर तिला नैवेद्य वगैरे दाखवून जेवण करीत असतात. अशा होळीच्या गावात नृत्य वगैरे नसते. या गावामध्ये बाहेरगावची नृत्यपथके सुद्धा नाचावयास किंवा वर्गणी मागावयास येत नाहीत. अशा प्रकारची होळी म्हणजे साधी होळी.

दुसऱ्या प्रकारची होळी म्हणजे फार मोठा आनंदोत्सव. ही होळी सुमारे ५ दिवसांपर्यन्त चालते. होळीच्या अगोदर एक महिना जुन्या होळीच्या ठिकाणी सागाच्या लाकडाचा दांडा रोवून देतात. नंतर होळीच्या दिवशी उंच असे बाबूंचे झाड किंवा सावरचा दांडा आणतात व होळीच्या खड्डयात तो दांडा रोवतात. तसेच होळीच्या दिवशी गावातील प्रत्येक माणस आपली बैलगाडी किंवा बैलाची जोडी घेऊन जंगलात जातो व जंगलातून लाकडे आणून होळीच्या पटांगणात आणून सोडतो. बांबू किंवा सावरचा दांडा रोवल्यानंतर सर्व लाकडे त्याभोवती रचली जातात. उंचच ऊंच अशी लाकडांची रास आपल्याला दिसत असते. ज्या गावी लाकडाची होळी असते. अशा गावात साधारणत: रात्री १२ ते ४ वाजण्याच्या दरम्यान होळी पेटवत असतात. ज्या गावात होळी असते त्या गावाचा पोलिस पाटील होळीची पूजा करून होळी पेटवतो. त्यानंतर होळीभोवती सर्व गावातील आबाल वृद्धांची गर्दी झालेली दिसते. काही लोक पूजा नैवेद्य वगैरे दाखवितात, काही लोक होळीभोवती फेर धरून नाचतात. गावातील नृत्यपथक त्या ठिकाणी होळीभोवती रात्रभर नाचत असतात.

ज्या गावी मेळावा असतो त्या गावी सुमारे १० ते १५ गावांची नृत्यपथके होळी पेटवण्याच्या दिवशी हजर असतात. होळी पेटवल्यानंतर सर्व नृत्यपथके होळीभोवती धुंद होऊन नाचू लागतात. काही वेळाने जो बांबू रोवलेला असतो. तो पेटल्यावर खाली पडण्याच्या बेतात आला की, त्याला दुसऱ्या लाकडाच्या सहाय्याने वरच्यावर (जमिनीला टेकू न देता) ठेवतात. त्याच्या अग्रभागाची पूजा करून स्थानिक गावातील पोलिस पाटील घाऱ्या (घाऱ्या म्हणजे एक प्रकारचा भाला, ह्याला विळ्यासारखे गोल तीक्ष्ण पाते असून बाबूंला जोडलेले असते) घेऊन एका घावात त्या बाबूंचा अग्रभाग तोडतो. नंतर गावाचा कोतवाल आजूबाजूच्या परिसरातील गावाचा पुकारा करतो. ज्या गावाचा पुकारा झाला त्या गावाचा कारभारी किंवा पोलिस पाटील पुढे येऊन त्या हत्याराच्या सहाय्याने त्या बाबूंचे फक्त एक घाव मारून नंतर त्याच्या पाया पडून हत्यार खाली ठेवत असतो. नंतर बांबूच्या अग्रभागाचा जो तुकडा असतो (ज्याला खोबऱ्याची वाटी बांधलेली असते) तो याच स्थानिक गावातील नृत्यपथकास दिला जातो. तो तुकडा ते नृत्य पथक बाहेरगावी जाताना घेऊन जातात. बाबूंचे उरलेले कापलेले तुकडे होळीत टाकल्यावर सर्व गावातील लोक, सर्व नृत्यपथके, स्त्रिया, पुरूष, मुले आनंदाने बेहोष होऊन होळीभोवती वाद्याच्या तालावर नाचू लागतात व सर्व रात्र जागून काढीत होळीचा आनंद उपभोगत असतात. ह्या मेळाव्याच्या गावी दुसऱ्या दिवशी सकाळी छोटी यात्रा भरते. या यात्रेत मिठाईची

दुकाने, स्टेशनरी बांगडयावाले, पालखीवाले वगैरे लोक आलेले असतात. सकाळी लोकयात्रेचा आनंद घेऊन घरी जात असतात.

ज्या गावामध्ये लाकडाची होळी असते त्या गावात गेर नृत्य पथक किंवा बुध्या बाबा पथक बहुधा असतातच. या प्रत्येक नृत्यपथकात लहान मुले असतात. काही म्हातारी माणसे असतात. काही तरूण असतात. यांपैकी काहींची मान्यता असते. म्हणून ते नृत्यात भाग घेतात. काही लोक हौशीने भाग घेतात. गेर नृत्य पथकात सुमारे २५ ते ३० माणसांचा संच असतो. त्यामध्ये काही गेर असतात. हे गेर म्हणजे कमरेला साडी विशिष्ट पद्धतीने चामडी पट्टयांच्या साहाय्याने गुंडाळलेली, हातात तलवार, अंगावर दागदागिने, पायात घुंगरू, डोक्याला फेटा अशा पद्धतीने साज करीत असतात. काही राई म्हणजेच बाया. ह्या बाया म्हणजे पुरूषांनी घेतलेला स्त्रीवेष होय. काही वाद्य वाजविणारे वादक असतात. त्याप्रमाणे दोन पोलिसांचा वेष करणारे पोलिस, दोन डाकिणीच्या वेषातील पुरूष, काही विचित्र सोंगे घेतलेली माणसे तसेच एक लाकडी घोडा ढोलाच्या तालावर नाचवणारा माणूस असतो. अशा ह्या नृत्यपथकाचे स्वरूप असते. ह्या नृत्यपथकात मोठे ढोल वाद्य (विशिष्ट प्रकारचा ढोल) थाळी, बासरी, झांज, रोनथे वगैरे वाद्ये असतात. ह्या वाद्याच्या तालावर हे गेर नृत्य एकाच तालावर लयबद्ध रीतीने नाचत असतात. प्रत्येकाची पावले एक इंच देखील मागे-पुढे पडत नाहीत. असे हे गेर नृत्य पाहिल्यावर डोळ्याचे पारणे फिटल्यासारखे वाटते.

दुसरे नृत्य पथक म्हणजे बुध्या बाबा यांचे. त्यांच्या डोक्यावर मोठ्या मोरपिसांचा टोप असतो. गळ्यात सुकलेल्या उंबरांच्या किंवा टेंभराच्या माळा असतात. पायात लहान घुंगरू किंवा भोपळ्याचे तुंबडे बांधलेले. हातात धान्या किंवा भाला असतो. अंगाला राख फासलेली असते. अशा प्रकारचा साज घेऊन भेरीच्या तालावर कमरेला विशिष्ट बाक देऊन तांडव नृत्य सादर करीत असतात. हे नृत्यसुद्धा पाहण्यासारखे असते.

वरील होन्ही प्रकारच्या नृत्यपथकात एक भगत (बडवा) असतो. हा भगत त्यांचे नृत्य पथक सांभाळत असतो. कारण अनेक गावांमध्ये फिरताना नाचताना हे बडवे एकमेकांची विद्या आजमावतात. त्यामध्ये पथकातील कलाकारांना विशिष्ट प्रकारच्या संकटांना सामोरे जावे लागते. अशा वेळी आपल्या पथकातील बडवा योग्य ते उपचार करून त्यांना व्यवस्थित शुद्धीवर आणत आसतो. बहुधा विना बडवांचे नृत्यपथक बाहेरगावी जातच नाही.

ही नृत्यपथके जेव्हा अंगावर साज घेतात, तेव्हा त्यानंतरच्या ५ दिवसांत त्यांना काही नियम पाळावे लागतात. उदा. ५ दिवसपर्यंत खाटेवर किंवा पलंगावर बसत नाहीत किंवा झोपतही नाहीत. ५ दिवसपर्यंत बाहेगावीच फिरतात. अंगावर घेतलेला साज उतरवीत नाहीत. त्यांच्या गावात ज्या दिवशी होळी केली असेल त्या दिवशी संबंध दिवसभर नाचतात व गावातून धान्य, पैसा वगैरे भाग (वर्गणी) गोळा करतात. स्वत:चे गावं आल्यानंतर दुसऱ्या गावात लाकडाची होळी असेल त्याच गावात) काही वेळेस २५ ते ३० मैलापर्यंतच्या गावामध्येसुद्धा पायी जातात. त्या गावामध्ये गेल्यावर होळीभोवती नाचल्यानंतर गावामध्ये नाचतात व प्रत्येक गावात धान्य व पैसा वर्गणीरूपाने गोळा केले जातात व पैसे देणाऱ्यांची (५ रू. १० रू.) यादी बनविली जाते.

पाचव्या दिवशी गावात परत आल्यानंतर साज वगैरे उतरून सर्व धान्य, पैसा ह्यांचा हिशोब केला जातो. प्रसंगी धान्य विकून त्याचेही पैसे बनविले जातात व सर्व पैसे एकत्र करून त्यामधून दोन कोंबडे व ५ ते १० बकरे (जसे पैसे जमले असतील त्या हिशोबात) आणतात व ते आणल्यानंतर गावाच्या बाहेर शेतामध्ये सर्व बकरे कापून मटण तयार केले जाते व त्यांचे झाडाच्या पानावर वाटे तयार केले जातात. ज्यांनी ज्यांनी पैसै दिले असतील त्यांना तो वाटा घरपोच केला जातो. भले ते गांव २० मैल दूर असले तरी त्या गावातील वाटे बरोबर पोच करतात. म्हणजे वर्गणी रूपाने जे पैसे देतात त्यांचा सुद्धा मोबदला परत करतात. अशी इमानदारी वृत्ती त्यांच्यात आढळून येते.

# माणुसकीच्या जीवनालाही आदिवासी पारखे :

## म. वि. कुलकर्णी

धुळे जिल्ह्यातील आदिवासींचे प्रश्न सुटून त्यांना समाजातील सामान्य माणसासारखे का होईना स्वस्थ जीवन ते जगत आहेत असे चित्र बघावयास मिळेल असे जे वाटत होते ते अखेर स्वप्नच ठरत असल्याची चिन्हे दिसू लागली आहेत. स्वातंत्र्य पूर्वकाळात त्यांना सावकारांनी लुबाडलेच नाही तर नागवले. त्याची जमीनजुमला, दागदागिने सर्व काही गेले. सर्वोदयी विचार या सावकारीला थोपवू शकला नाही, ही आदिवासी भागातील सर्वात मोठी शोकांतिका आहे.

खानदेशचे गांधी म्हणून जे ओळखले जातात त्या बाळुभाई मेहता यांनी आपली कर्मभूमी म्हणून या उपेक्षित व अप्रगत भागाची निवड केली. आयुष्यभर जीवनाचे रान केले. आपल्या 'सेवेचे अनुभव' या पुस्तकात ते म्हणतात, "एक टन कल्पनेपेक्षा एक शेर अनुभव महत्वाचा" मेहतांनी जीवनाच्या अखेरपर्यंत अनुभवाचा पाठलाग करण्यासाठी 'अब काटोंपर चलना सिखो' हा मंत्र अनुयांयाना दिला. स्वांत्र्योत्तर काळात सावकारांची जागा आदिवासी म्हणून घेणाऱ्या स्वकियांनी घेतली. पुढारीपणाचे नावाखाली व राजकारणाची झूल पांघरून आपलेच लोक त्यांना कुरतडत आहेत. आदिवासींच्या अशिक्षित व निष्पाप वृत्तीचा फायदा घेऊन व त्यांना जीवन विकासाच्या नव्या दिशा न दाखवता वेठबिगारीच्या जोखडात अडकावून ठेवले जात आहे. नंदुरबार तालुक्यातील केवडीपाडा येथील मन्ना सोनवणे हा वेठबिगार पंतप्रधान राजीव गांधीना राजस्थानात सापडला व ३५ वर्षानंतर त्याची सुटका झाली. अशा हजारो वेठबिगाऱ्यांची सुटका करण्यासाठी पंतप्रधानांनीच दौरा आयोजित करावयाचे काय असा प्रश्न निर्माण होतो.

### झारीतील शुक्राचार्य

आदिवासींच्या शैक्षणिक, आरोग्य, आर्थिक व सामाजिक सुधारणा होण्यासाठी व त्यांना माणुसकीचे जीवन जगता यावे म्हणून महाराष्ट्र आणि केंद्रशासन विविध सवलती उपलब्ध करून देत आहे. पण आदिवासी उपयोजनांच्या झारीत बसलेले शुक्राचार्य हे आदिवासींचे धुरीणत्व करणारे ते स्वत: असल्यामुळे दोषारोप तरी कसा आणि कुणावर करावयाचा? कुंपणच शेत खायला लागले तर शासन काय करणार असे सहजच मनात येते.

वर पू. मेहता यांनी म्हटल्याप्रमाणे एक टन कल्पना हवेत विरल्या पण एक छटाक भर अनुभव आदिवासींच्या वाट्याला आला नाही. अगदी प्राथमिक स्वरूपाचे आरोग्य व प्राथमिक शिक्षण याचा लाभ आदिवासींना मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे.

### पैसे जातात कुठे ?

शिक्षण आणि आरोग्य याची पूर्तता करण्याची जबाबदारी वास्तविक जिल्हा परिषदेची आहे. अगदी अलीकडे जे अंदाजपत्रक जिल्हा परिषदेने मंजूर केले त्यात शिक्षणासाठी १ कोटी ९३ लाख ८७ हजारांची तरतूद आहे. सार्वजनिक आरोग्यावर परिषद ४ लाख व शासन २ कोटी १५ लाख ९३ हजारांची तरतूद करीत आहे. एवढी आर्थिक मदत असताना आश्रमशाळा व प्राथमिक शाळा शिक्षक नाही म्हणून शाळा ओस पडतात अशी टीका आदिवासी आमदार रमेश पावरा हे मुख्यमंत्र्यांचे उपस्थितीतच जेव्हा करतात तेव्हा एवढा पैसा जातो कुठे? असा प्रश्न स्वाभाविकच निर्माण होतो. प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थिती यापेक्षा वेगळी नाही. अगदी एक साधे पण ज्वलंत उदाहरण घ्यायचेच म्हटले तर आयोडिनयुक्त मिठाचे घेता येईल. अक्कलकुवा - धडगांव या सातपुड्यातील समुद्रसपाटीपासून अतीउंच डोंगराळ भागात गलगंडाचे प्रमाण खूपच आहे व त्यावर आळा घालण्यासाठी आयोडिन मिठाचा पुरवठा हा एकच पर्याय आहे. स्वरूपसिंग नाईक यांनी आदिवासी भागात आयोडिन मिठाचा प्रकल्प काढण्याची घोषणा केली होती पण ती हवेत विरली. धुळे जिल्हा गलगंडग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आला आहे आणि या विशिष्ट मिठाच्या वापराची बरीच जाहिरात होत आहे. वास्तविक ज्या डोंगराळ आणि अतिदुर्गम भागात या प्रचाराची व प्रसाराची गरज आहे तेथे ती होत नाही. आग रामेश्वरी व बंब सोमेश्वरी असे वाटावे अशी आरोग्ययंत्रणा काम करीत आहे. आरोग्यमंत्री भाई सावंत यांनी धडगांव येथील आरोग्यशिबिरात सध्या जे साधे मीठ बाजारात आहे ते काढून घेण्यात येईल आणि त्या जागी आयोडिन युक्त मिठाचा पुरवठा गरजूंना मोफत करण्यात

(पान २४ वर पाहा)

# कथा कातकरी मनाची

## वडाचा डोह

श्री. पं. गो. गांगल

काशी अगदी लगबगीने घराकडे निघाली होती. डोक्यावर एक छोटसं गाठोडं होतं आणि हातात तेलाची बाटली. तालूक्याच्या गांवी जाऊन आज दोघांनी बाजार केला होता. गावातील जमीनवाल्यांच्या कापण्या, मळण्या संपल्या होत्या दिवाळीच्या सणासाठी अंगावर घेतलेले पैसे फिटल्यावर रोखीने मिळालेल्या मजुरीचे थोडेसे पैसे साठले होते. पाऊणशे - ऐंशी रूपये बरोबर घेऊन बाजाराला जाण्याची वेळ क्वचित कधी येई. नेहमीचा बाजार असायचा पंधरा वीस रूपयांचा. पण ह्यावेळी काशीने पक्का निर्धार केला होता. बाजाराला जाऊन लुगडं आणायचंच.

सबंध पावसाळा दोन फाटक्या लुगडयावर काढला होता. दंड घालून नाहीतर भोकं बुजवून, तशीच वेळ आली तर गाठी मारून लज्जारक्षणापुरते सबंध अर्धे - अर्धे दोन तुकडे वापरून काशीने पाऊस काळ संपवला. उद्या पासून एक आख्खं लुगडं नेसून ती दोन दिवस वाडीत आणि गावात मिरवणार होती नव्या नवरीसारखी.

सख्याला खरं म्हणजे बायकोला लुगडं घेण्यात काहीच रस नव्हता. नवीन लुगडं नेसल्यावर काशी कशी दिसेल हा विचार त्याच्या मनाला शिवलाही नव्हता. दोन - तीन रूपयांच्या बांगडया काशीने भरल्या तर त्याची काही हरकत नव्हती. पण आज जवळ जवळ पंचेचाळीस रूपयांचे लुगडं आणि पाच - सहा रूपायांचा खण म्हणजे भारीच काम झालं होतं. सख्या वारभर मांजरपाटात लंगोटीवजा दोन रूमाल बसवी आणि एका वारात मुंडासं. आता काशीने स्वत:च - कापिली - बांधिलीवर सर्वा करून (भाताच्या ओंब्या वेचणे) भाताचे पैसे जमविले होते, म्हणून त्याला काही बोलता येईना. शिवाय त्याच्या डोक्यात निराळेच चक्र फिरत होते.

पावसाचे प्रमाण कमी झाल्यावर ओढयास जागोजागी तुबंलेल्या पाण्यात मासे रहातात. बांध घालून डबक्यातले पाणी उपसायचे आणि मासे मारायचे. पाणी उपसताना काही मासे बाहेर फेकले जातात. ते पकडण्यासाठी काहीतरी धोतर - लुगडयासारखे कापड लागते. धोतर ही चीज कातकऱ्याने गावातील लोकांजवळ पाहिलेली असते तेवढीच. म्हणून उपयोग व्हायचा, बायकांच्या लुगडयांचाच. गेल्या दोन - तीन वेळा फाटक्या, जीर्ण झालेल्या लुगडयाने सख्याला चांगलाच दगा दिलेला होता. पाण्याबरोबर उडालेले मासे लुगडयाला पडलेल्या भोकांतून पळून जायचे. एकदा तर दोन - चार चांगले मोठे डाकू मासे सख्याला चकवून पळाले. सख्या काशीवर डाफरला. काशीलाही मासे पळाल्याबद्दल वाईट वाटले. पण लुगडे शिवले तरी पाण्याच्या माऱ्याने ते पुन्हा - पुन्हा फाटायचेच.

काशी बाजार करून घरी आली. मुलांना खाऊ देऊन झाला. जरा वेळाने सख्याही घरी आला. रात्रीची जेवण उरकली. वाडीतले गडी गटागटाने गप्पा मारीत बसले आणि कोणीतरी बूट काढला. मोहोळ आटत चालला आहे. वडाखालच्या मोठया डोहातले मासे मारायचा डाव आताच साधला पाहिजे. एका गटाने दुसऱ्याला, दुसऱ्याने तिसऱ्याला अशा प्रकारे निरोप सगळ्यांना मिळाला आणि बेत पक्का झाला. उद्या सकाळी ऊन उगवल्यावर सगळी वाडी वडाच्या डोहावर मासे मारायला जाणार.

काशीच्या कानावर हा बेत आला आणि ती जरा हिरमुसलीच झाली. सख्या मात्र खुशीत घरी आला. मासे मारायला आसू (टोपलीचा प्रकार) तरी पाहिजे, नाहीतर कापड तरी. कालचं काशीनं लुगडं आणलं आहे. सख्याला चिंता नव्हती. आपलं लुगंड उद्या मासे झोकायला न्यावं लागणार म्हणून काशी मात्र चिंतेत होती. तरी वडाचा डोह मारला की भरपूर मासे मिळतात म्हणून नवं लुगडं नेसून मिरवता येणार नाही त्याबद्दलची निराशा तिने गिळून टाकली.

दुसऱ्या दिवशी वडाच्या डोहावर एकच गदारोळ माजला. बायका - मुलांसकट शंभर सव्वाशे माणूस. मासाही भरपूर मिळाला, पण मासे झोळण्याच्या धुमश्चक्रीत डोहाच्या कडेवरील एका काटेरी झुडपांत काशीचे लुगडे अडकले आणि दोन हात लांबरूंद आखोटा गेला.

एक दिवस भरपूर मासे खायला मिळाले आणि काशी चार मुलांची आई पुन्हा अर्ध्या लुगडयावर फिरू

लागली. ❀

## बेडकांच्या तंगडया

कान्हू कण्हत होता. विव्हळत होता, थोडीशी हातापायांची हालचाल करावी लागली तर बोंब मारीत होता, दोघंही चुलीशी होती. कान्हू आडवा आणि राधा बसलेली. रात्री दोन अडीचचा सुमार. चुलीवर तवा तापत ठेवून फडक्याने राधी कान्हुचे हातपाय शेकत होती. तिलाही एकदोन फटके बसले होते; बाई म्हणून तेवढयावरच निभावले. कान्हूसारखी तिची अवस्था झाली असती तर उजाडेपर्यंत दोघेही तिळाच्या माळावरच पडून राहिली असती.

गेल्यासाली देशमुखांच्या पिकावर अतोनात खोंडकिडा पडला. औषधांच्या फवारणीवर हजार-दीड हजार रूपये खर्च झाले. पण काही विशेष उपयोग झाला नाही. पाच एकरांत तीन खंडी भात झाले नाही. खर्चही सुटला नाही. सगळ्या शेतकऱ्यांची तीच ओरड होती, पण देशमुखांनी जामच मार खालला होता.

गेली दोन-तीन वर्ष पंचायतीपातळीपासून ते विधानसभा-लोकसभेपर्यंत खोंडकिडा आणि पिकावरील इतर रोग ह्याबाबत चिंता व्यक्त केली जात होती. तालुका पत्रापासून तो अखिल भारतीय स्तरावरील वर्तमानपत्रातून ह्यावर चर्चा चालू होती. शेतकऱ्यांचे आणि सर्वसामान्य ग्रामीण लोकांचे मत होते की, बेडकांची कत्तल सुरू झाल्यापासून ह्या पीकनाशक किडयांचा उपद्रव वाढला आहे. बेडूक ह्या किडयांची पैदास मुळातच नष्ट करीत. अळी आणि लहान आळयाच खाऊन फस्त करीत.

तज्ञ मंडळी स्थितप्रज्ञ होती. परकीय चलन उपलब्ध होते म्हणून सरकार आत्मसंतुष्ट होते. तालुक्या तालुक्याला बेडकांचे कत्तलखाने चालविणारे गालातल्या गालात हसत होते. दोन रूपये किलोने बेडूक घ्यायचे. तंगडया कापायच्या बर्फात ठेवून खोके भरायचे, मुंबईस पाठवायचे. शंभर टक्के नफा कमवायचा. वर्तमानपत्रातील ओरड म्हणजे रिकामटेकडया माणसांचे कुडाला तुबंडया लावणे ठरले. विरोधी आमदार-खासदारांची भाषणे उपडया घडयावर पाणी ओतणे झाले.

देशमुख बैचेन झाले. रात्रीची झोप उडाली. कृषिपंडीत पदवी मिळवायची महत्वाकांक्षा बाळगली पण कृषिपीडित व्हायची वेळ आली. पंधरा खंडीच्या ठिकाणी तीन खंडी भात पिकले. असे होऊ लागले तर देशोधडीला लागायची वेळ येईल. ह्याला जबाबदार कोण? काय करावे? फक्त बेडकांची कत्तल थाबंली पाहिजे. सरकार वळत नाही. तालुक्यात बेडकांचा कत्तलखाना चालविणारा सावंत तर आपला मामेभाऊच आहे. देशमुख धुमसत होते.

लावण्या संपल्या बेणव्याही आटोपल्या आता कातकऱ्यांना नियमित काम काहीच राहिले नाही. बारीक सारीक कामे करायची केळीची पाने आणून विकायची. आवारातील कामे कोणी सागितली तर करायची. मासे मारायचे, नाहीतर सराईच्या कामाच्या हवाल्यावर अंगावर पैसे घ्यायचे. तशाच हलली हे एक बेडूक पकडण्याचे व कर्जतला नेऊन विकण्याचे नवीनच काम मिळाले होते. आठ-दहा दिवस या कामात जायचे.

देशमुख आपल्या तरुण्याताठया चौघा मुला-पुतण्यांना एकत्र बसवून बेत आखीत होते. निदान आपल्या पांच एकरांतील तरी एकही बेडूक पकडू द्यायचा नाही. आता कातकरी बेडकावर सुटतील. पहिल्याच दिवशी जो कोणी आपल्या जमिनीवर पाय ठेवील त्याला ठोकून काढायचा. रात्री जेवण आटोपली की चौघेजण हातात काठया घेऊन झुडपाआड लपून बसू लागले.

कान्हू आणि राधी मुलांना झोपवून रात्री दहानंतर पलिता आणि लहान तोंडाचा डबा असं घेऊन मोहिमेवर निघाली. बेडूक जमा करीत करीत देशमुखांच्या जमिनीवर आली. राधी एका हातात डबा व दुसऱ्या हातात पलिता अशी कान्हूला उजेड दाखवित चालली होती. बेडूक दिसला की कान्हू झडप घालून पकडी आणि त्याला डब्यात टाकी, जोडी पुरेशी आत आली असे पाहून चौघांनी एकदम घेराव केला. पहिला फटका राधीच्या हातातील पलित्यावर बसला. पलिते शेतातील पाण्यात पडून विझून गेला. राधीच्या कमरेवर एकाने दोन काठया हाणल्या. बाकीच्या तिघांनी कान्हूचे पाय अगदी यथास्थित सडकून काढले. आठ पंधरा दिवस त्याला चालता येणार नाही अशी तजवीज करून ठेवली.

कान्हूने राधीच्या खांद्यावर हात ठेवला. राधीने कमरेला धरून कान्हूला वर उचलले. त्याचा सगळा भार आपल्या अंगावर तोलला. मोठ्या कष्टाने एकेक पाऊल उचलीत, मिट्ट अंधारात, चिखल तुडवीत दोघ घरी आली.

देशमुखांचे मामेभाऊ बेडकांच्या तंगड्या कापीत आहेत आणि देशमुखांनी सडकावून काढलेल्या कान्हूच्या तंगड्या राधी शेकीत आहे.

# मोराचे अश्रु

जानू त्या ओबोडधोबड आकाराच्या शंकराच्या पिंडीसमोर हात जोडून बसला होता. थकला-भागलेला चेहरा ओढलेला दोन दिवसांना पुरेल इतकी शिदोरी त्याने बरोबर घेतली होती. ती काल रात्री संपली आजचा दिवस पुरा उपवास घडला दोन-तीन वेळा पाणी पिऊन तहान भागली; पण भुकेचं काय? तिन्ही सांजेची वेळ. जंगलात वस्तीपासून दूर असलेल्या त्या शिवमंदीरात गुढगे टेकून जानू महादेवाला विनवीत होता.

'देवा मला काही कळत नव्हतं तेव्हाच माझे आईबाप हैजाच्या (कॉलऱ्याच्या) साथीत दगावले. पाच वर्षांचा मी चुलत्यांकडे शेळ्या राखीत भाकर तुकडा खात लहानाचा मोठा झालो. मोलमजूरी चालू राहिली. कोणाच्यातरी वळचणीला राहून कंटाळलो म्हणून एक छोटसं खोपट बांधलं. वयात आलो याची जाण झाली. बरोबरीच्या पोरांची लग्न उरकली. मला पण वाटू लागलं, की आपलही लग्न व्हावं, खोपट बांधल्यावर लोकही विचारू लागले, 'काय जान्या, लग्न करायचा विचार दिसतोय!' मी मनातून सुखावून जायचो. पण आपल्यासाठी मुलीला मागणी कोण घालणार? चुलता काहीच बोलत नव्हता. शेवटी एकदा धीर करून मी चुलत्याला विचारलं. चुलता म्हणाला, तुझं लग्न लहाणपणीच झालयं. तू तूझ्या आई बापांना अगदी उतार वयात झालास, आपल्या डोळ्यादेखत लग्न व्हावं म्हणून तुझ्या आईबापांनी तू पाच वर्षाचा असतानाच तुझ एका पाळणातल्या पोरीशी लग्न लावून दिलं. सोयऱ्याचं नाव 'पुंजारा' होतं, एवढचं आठवतयं. पुढे कधी गाठ भेट झालीच नाही, कारण ती सगळी मंडळी मालेवाडी सोडून दुसऱ्या कुठंतरी रहायला गेली आणि मग संबंधच सुटला. तूच आता आसपासच्या दहा-पंधरा मैलातील रानात चौकशी करीत फिरलास तर भेटतील ती माणसं'.

आपलं लग्न इतक्या लहानपणीच झालयं हे ऐकून मी अवाक झालो. आता बायकोला भेटायचीं पण मला हूरहूर लागली. पण तिला शोधायची कुठे, ओळखायची कशी, हे माझ्या लक्षात येईना। आपण पाच वर्षांचे असताना लग्न लागले. तेव्हा मुलगी पाळण्यात होती. म्हणजे आता ती तेरा-चौदा वर्षांची असेल. ठाकराच कुटुंब हललं तरी दहा-पंधरा मैलाच्या परिसरातच कुठेतरी सापडेल. अशी आशा वाटत होती. दोन दिवस सगळ्या वाड्या धुडांळल्या, पण ठावठीकाणा नाही. आता तूच मार्ग सांग परत घरी जाणार नाही. तुला माझं शीर वाहीन पण एकदा बायकोची भेट घडव. एकदा तिला भेटलो की तुझ्याकडे नवस फेडायला येईन.'

भावनेच्या भरात भुकेने व्याकुळलेल्या जान्या नवस बोलून गेला. त्याने रात्र देवळातच अर्धवट झोपेत, स्वप्नात आणि जागून काढली. सकाळी उठला आणि त्राण नसलेल्या पायांनी आतापर्यंत न गेलेल्या दिशेला निघाला. मैल, दीड मैल चालला असेल वाटेत भगवा कफनी घातलेला, दाढिमिशा वाढलेला एक साधु भेटला. रामराम करून झाला. मग साधुने जानूला म्हटले, 'काय रे पोरा, कुठे निघालास सकाळच्या प्रहरी ? अगदी थकलेला दिसतो आहेस?

'काय सांगू बाबा, माझी कहाणी। वेड्यासारखं झालंय बघा।

'काय झालय रे ? 'असा मृदू आणि प्रेमळ प्रश्न साधुबुवांनी विचारला, जान्याने सारी हकिगत सांगितली.

साधुबुवांनी क्षणभर विचार केला आणि आठवल्यासारखे करून म्हटले, 'असाच दोन मैल पुढे जा. जांभूळवाडी म्हणून गांव लागेल. त्या वाडीच्या टोकाला एक खोपटं आहे. तिथ बहिण-भाऊ अशी दोघ राहातात. भाऊ असेल पंधरा सोळा वर्षांचा अन् धाकटी बहीण तेरा वर्षाची. तिचं लग्न झालय अस म्हणतात. लहानपणापासून गळ्यात मंगळसूत्रही आहे. पण तिचा नवरा कोण तेच तिला माहीत नाही. तू चौकशी कर. देव तुझी इच्छा पुरी करील.

जान्याने साधुच्या पायावर डोकं टेकलं आणि पुढे निघाला. जांभूळवाडी मिळाली. वाडीच्या टोकाला एक खोपट होतं. तिथं आला. आत डोकावला बहीण - भाऊ भाकरी खात होती. पाहुणा कोण आला म्हणून भाऊ पुढे आला. ओळख पटेना, एक तरह बसायला दिलं.

'कोण गावचं पाहुणं ?'

'मी भक्ताच्या वाडीचा. तू पुजारा का ?

पोरगा हो म्हणाला.

'तुला धाकटी बहीण आहे का ?

'हो !'

'तिचं लग्न झालंय का ?'

'हो, झालंय असं म्हणतात. पण माझे आई बाप आठ - दहा वर्षांपूर्वी इकडे लांब रहायला आले. तेव्हापासून सोयऱ्यांशी संबंध सुटला. कुणी 'बारे' म्हणून आमचे सोयरे होते. पण आमचे आईबाप पाचसहा वर्षापूर्वीच मरून गेले मग त्यांना आता कोण आणि कसं शोधणार ? ते पण कधी इकडे आले नाहीत.'

जान्याने त्याला आपली सारी हकीगत सांगितली. साधुने दिलेला आशीर्वाद पण सांगितला. नवसाबद्दल तो काही बोलला नाही. पदूने गावातील चार - सहा मोठी माणसं जमा केली. दोन्ही कडची माहिती लोकांनी ऐकली. 'बारे - पुंजारे' सोयरीक ती हीच असं पक्क ठरलं. दोन दिवसांनी मुलीला घेऊन भक्ताच्या वाडीला जायचं ठरलं जानकी जानूला पाहून मनात अगदी हरवून गेली

गोंडाची जेवणं झाली. बहिणीच्या जबाबदारीतून आपण सुटलो म्हणून. पदूही आंनदून गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी दोघांना घालवायला पदू निघाला. जानूचं गाव आणि घरही त्याला पहायचं होतं.

तिघेही निघाली, देवळाजवळ आली. मूळ रस्त्यापासून देऊळ फर्लांगभर झाडीत होतं. जानूनं पदूला आणि जानकीला झाडाखाली बसवलं आणि 'आता घटकाभरात येतो' असं सांगून तो निघाला. देवळात आला. देवासमोर गुढघे टेकून बसला. 'देवा, तू मला पावलास. इच्छा पूरी झाली. माझी बायको मला मिळाली. तुला शब्द दिला होता. नवस फेडायला आलो आहे।' असे म्हणून जान्याने झटकन कमरेचा विळा काढला आणि सरकून मानेवरून फिरवला. रक्ताच्या अभिषेकाने आणि शिरकमळाने पूजा झाली.

अर्धा - पाऊण तास पदूने वाट पाहिली, पण जान्या परतला नाही. म्हणून त्याला हाका मारीत तो निघाला. जानकीला तेथेच बसायला सांगितले. फिरता फिरता दहा - पंधरा मिनिटांत पदूला देऊळ दिसले. तो देवळात गेला. आत जाऊन बघतो तो ते भयानक दृश्य।

पदूचा आवाज बंद झाला. दोन दिवसांपूर्वी एकुलत्या एक बहिणीचा नवरा येतो काय, आपण तिला सासरी पोचवायला निघतो काय आणि वाटेत हा प्रकार घडतो काय! तो हतबद्धच झाला. आता बहिणीला जाऊन काय सांगायचे ? तिला तोंड कसे दाखवायचे ? डोळ्यात अश्रू आले. मेहुण्याचे शीर हातात घेऊन तो बसला विळा समोरच पडलेला होता, तोही हाती घेतला. सुन्नपणे दोहोकडे पहात राहीला. डोळे कोरडे झाले. शंकराच्या पिंडीकडे पाहिले. मनात काही निर्धार झाला आणि मेहुण्यांचे शीर बाजूला टाकून सप्पकन विळा स्वत:च्या मानेवरून फिरवला.

जानकी वाट पाहून पाहून कंटाळली आणि बरोबरचं गाठोडं डोक्यावर घेऊन नवरा व भाऊ ज्या दिशेला गेले तिकडे निघाली. देवळापाशी आली. कुतुहलाने देवळात शिरली. गाभाऱ्याच्या दाराशीच एक अस्फुटशी किंकाळी निनादली आणि जानकी मूर्च्छित होऊन पडली.

त्या रानात वार्षिक उत्सवाच्या काळात जी काय धामधूम चालायची तेवढीच. बाकी इतर वेळी तिकडे कोणी फिरकतही नसे. अर्ध्या तासाने जानकी हळूहळू शुद्धीवर आली. रक्ताचे थारोळे आता घट्ट झाले होते. माश्याही जमा होऊ लागल्या होत्या. जानकीच्या डोळ्यात अजून कसलाच भाव उमटत नव्हता. सगळ शुन्यवत भासत होतं. मान थोडी थोडी निरनिराळ्या दिशांना फिरू लागली. नेणिवेतून जाणिवेकडे मन सरकू लागले. 'लहानपणापासूनचा सोबती भाऊ गेला. दोन दिवसापूर्वी लाभलेला जन्माचा सखा पण पारखा झाला. कोणासाठी ? असं का केलं त्यांनी ? मीच तर ह्या सगळ्या प्रकाराला कारण नाही ना ? मीच असणार. चौथं माणूस आहेच कोण इथं ? भाऊ गेला, नवरा गेला

आता मी कुणासाठी आणि कशासाठी जगू ? देवा, दोघांनी तुला रक्तानं न्हाऊ घातलं. मग आता माझीही पूजा मानून घे. ज्या विळ्याने दोन गळे धडापासून वेगळे केले त्याची धार अजून काही बोथट झाली नाही. माझ्याही शिराचा स्विकार कर आणि सोडव या यातनांतून. जगण जमणार नाही. तुला माझ्याही

शिरकमळाची पूजा बांधते आणि भावाला व नवऱ्याला भेटावयाला जाते'.

जानकीने विळा हातात घेतला. एकदा त्याच्या धारेवरून बोट फिरवली आणि मान खाली झुकवून विळा मानेवर धरला.

इतक्यात कोणाचे तरी शब्द कानावर आले. 'जानकी थांब! जानकी, थांब!'

जानकी इकडे तिकडे पाहू लागली. कोणीच दिसेना. पण बोलण ऐकू येत राहिलं, 'जानकी, तुझ्या भेटीसाठी तुझा नवरा नवस बोलला होता, भेट झाल्यावर शिरकमळ वहाण्याचा तो नवस त्याने फेडला. तुझ्या भावाने दु:खाच्या झपाट्यात आपल्या मानेवरून, विळा चालवला, तू तसं करू नकोस. वेळ न घालवता कापलेली शिरं धडाला लाव. ते दोघं पुन्हा जिवंत होतील. घाई कर विचार करत बसू नकोस. माझ्या बोलण्यावर विश्वास ठेव'.

जानकी पाच दहा क्षण सुन्न झाल्यासारखी बसून राहिली. ताडकन् उठली आणि एक शीर उचलून एका धडाला व दुसरे दुसऱ्या धडाला घट्ट लावून बसली.

क्षणार्धात दोघे उठून उभे राहिले. आश्चर्यचकित होऊन जानकी दोघांकडे पाहू लागली. दोघेही कोऱ्या चेहऱ्याने तिच्याकडे पाहू लागले.

ओळखी पटल्या आणि न पटल्याही. जानकीला समजेना. नवरा कोणता आणि भाऊ कोणता! त्यांना समजेना की ही बहीण की बायको? शिरांची उलटापालट झाली होती. आनंदातिशयात घाईने झालेल्या जोडणीत विजोडपणा आला होता. एकीकडे आनंद गगनात मावत नव्हता, तर दुसरीकडे धरती दुभंगल्यासारखी भेगाळली होती.

'देवा, भाऊ मिळाला पण त्याला भाऊ बिजेलाओवाळू कशी? कपाळावर टिळा लावायचा तर चेहरा नवऱ्याचा आहे. नवरा मिळाला, पण त्याला अलिंगन देऊ कशी? त्याची छाती भावाची आहे. लग्न होऊनही दोष नसताना मी वांझ रहाणार, आता काय करू?'

गाभाऱ्यात पुन्हा एकदा आवाज घुमला, 'जानकी, झाल्या गोष्टीला इलाज नाही. चूक झाली आहे आणि ती सुधारण्याचा एकच मार्ग आहे. ते दोघे मोर होतील. तुझे रूपांतर लांडोरीत होईल. पाऊस सुरू झाला की तुझ्याभोवती ते फेर धरतील. पिंगा घालतील, नाचतील, पण तुला स्पर्श करणार नाहीत. तू स्वस्थपणे सर्व बघत उभी रहा. नाचून नाचून थकले, दमले की दीनवाणेपणाने त्यांच्या डोळ्यातून अश्रू ठिबकू लागतील. ते ठिबकणारे अश्रू जमिनीवर पडण्यापूर्वीच तू पिऊन घे. तुला गर्भ राहील. तू पिलाची आई होशील. तुझ्या कुशीत ती मोठी होतील. तुझा भाऊ आणि नवरा ह्या दोघांचेही जीवन सफल होईल.'

देववाणी ऐकून जानकीचा आत्मा शांत झाला. पदू आणि जानू एकमेकांकडे पाहून केविलवाणे हसले.

(Thakars of Sahyadri ह्या श्री. चाफेकर यांच्या 'शोध निबंधा' तील लोककथेवर आधारित.) ✿

## 'घरंदाज धाक्या'

बाहेर मुसळधार पाऊस पडत होता. पण धाक्या आणि त्याची बायको, मुले आपल्या झोपडीत अगदी निवांतपणे झोपली होती. जमिनीला ओल नाही की वरून जागजागी पाण्याचं ठिबकणं नाही. पाऊस काळ म्हणजे वाडीतील लोकांचे हाल. लावणीचा हंगाम संपला की कामाला कोणी बोलावीत नाही. घरात बसायला धड कोरडी जागा नाही. सागाची पाने, वाळलेले गवत यांनी - आच्छादिलेले घर पावसाच्या पहिल्या महिन्यातच उघड्या चाळणीसारखे दिसू लागायचे. मग थंडीताप पायात पेटके, सांधे दुखणे इत्यादींची लागण. पण यंदा धाक्या या सर्वांपासून मुक्त आहे. झोपडीवर मंगलोरी कौलाचं छत आहे. अभिषेक बंद आहे. जमीन कोरडी आहे.

वाडीतील सर्व झोपड्यांवर सरकारने मंगलोरी कौले टाकून दिली आहेत. अन्न, वस्त्र, निवारा ह्या प्राथमिक गरजांपैकी एका गरजेची जरीपूर्ती करता आली तरी एक -तृतीयांश काम केल्याचे समाधान!

'आदिवासींना कौले देऊन काय उपयोग? ती कौलं विकून टाकतील आणि आठ-पंधरा दिवस घरीच बसून खातील, हा सर्व गावकऱ्यांचा अभिप्राय. तो खोटा पाडण्याचा चंग मनोमनी बांधला आणि प्रत्येकजण कामाला लागला. काम मिळेल तेव्हा काम करायचे. पण नाहीच मिळाले तरी कौलाला हात लावायचा

नाही. हा निर्धार. आपण आता घरंदाज झालो आहोत ही भावनाही सुखावीत होती.

भुकेनं आतडी कुरतडणारा भाद्रपदाचा महिना आला. बाहेर काम नाही. घरात खायला नाही. नेहमीची अंगावर मजुरी देणारी ठिकाणं संपत आली. वाण्याकडची पत आटत आली. धाक्याची नजर मधून मधून वरती जायची, पण मनोमन केलेला निश्चय आठवायचा. हात कौलांपर्यंत पोहोचायचे नाहीत. तेवढयात एक बातमी आली. वाडीत खांडेवाला (जंगलतोड करणारा ठेकेदार) आला आहे. वाडी त्याच्या भोवती जमा झाली. दोनशे-तीनशे रूपयांची खैरात प्रत्येकावर होऊ लागली. धाक्यानेही पैसे घेतले. अंगठा लावला. मार्गशीर्ष-पौष सपंल्यावर जायचे ठरले. खांडेवाल्याभोवतीच्या मेळाव्यात सामील झालेले पण पैसे न घेतलेले तीन-चार गडी वाडीत होते. त्यांच्याकडे खांडेवाला रात्री मुक्कामाला होता. दोन-तीन बाटल्या आणि एक कोंबडी फस्त झाली.

सराई आली मळण्या आटोपल्या. एक दिवस खांडेवाल्याचा माणूस निरोप घेऊन आला. दोन दिवसांनी ट्रक येतील. सर्वांनी तयार रहावं रत्नागिरीला जायचे आहे. चार-पाच महिने काम चालेल. दीड-दोनशे मैल अंतरावर काम असले म्हणजे मजूर पळून जात नाहीत. बायका-पोरांसकट नेण्याची व्यवस्था होती. ट्रक आले. गाडगी, मडकी आणि ॲल्युमिनियमच्या भांडयांचा संसार प्रत्येकाने बरोबर घेतला. खांडेवाल्याकडून वर पैसे न घेतलेले तीन-चार गडी वगळता सर्व वाडी खाली झाली. घरावरती कौले विकून न खाता व्यवस्थित मागे ठेवून सारे गेले.

धाक्याने आणि इतर बऱ्याच गडयांनी अंग मोडून काम केले अंगावर घेतलेले सर्व पैसे फेडले आणि वरकमाईही चांगली केली.

आसपासच्या गावांत जाऊन बायकांनी फाटयाचे भारे विकले. जादा कोळसा पिकवून गडयांनी खांडेवाल्याकडून जादा पैसे कमावले. करवंद, झाडाचा डिंक पळसाची पान, मधाचं पोळ मिळालं तर मधून मधून बाटली अर्धी बाटली मध पोरं गोळ करायची. ते बायका तालुक्याच्या गावी नेऊन विकायच्या. आपल्या वाडीत आपलं घर आहे. त्यावर कौलं आहेत. महिन्याभरात काम संपल की आपण परत घरी जाईपर्यंत आपल्याजवळ थोडेतरी पैसे साठलेले असले पाहिजेत. ह्या सुखद विचारांशी मन खेळवंत खेळवत सर्वजण झटत होते. रोजची अर्धी बाटली न चुकवताही धाक्याने शंभर-सव्वाशे रूपये जमवले रात्री जमिनिवर पडल्या पडल्या अर्धवट नशेत आणि अर्धवट झोपेत तो घरची स्वप्ने पहात होता. घरंदाज असल्याचा उबदार अनुभव भोगीत होता.

परतण्याचा दिवस उगवला. हिशोब पुरे झाले. आपल्याला पुरेपुर मोबदला मिळाला नाही ही रूखरूख धाक्याला थोडा वेळ अस्वस्थ करून गेली पण घरी जाण्याची ओढ आणि मुंडाशात घडयावर घडया करून ठेवलेले दीडशे रूपये याचं मोठेपण ती अस्वस्थता गिळून बसलं.

बाहेर विजांचा लखलखाट वादळाचे थैमान आणि पावसाची संतत धार. रात्र अंधेरी गवताचे आणि सागाच्या पानाचे छत अर्धवट उडालेले. दिवा विझलेला धाक्या बायको आणि मुलं एका कोपऱ्यात गोधडी पांघरूण बसलेली. सर्व काही ओलेचिंब मने मात्र कोरडी.

वैशाख सूटता धाक्या परतला तेव्हा घरावरील अर्धीअधिक कौले गायब झालेली. सर्व रत्नागिरीवाल्यांच्या घरांची तीच अवस्था. गावात मात्र काहींच्या केंबळीच्या (भाताच्या पेंढयाचे छत) घरावर आणि गोठयांवर मंगलोरी कौलं चढली होती. मागे राहिलेल्या तीन-चार गेडयांचं घरंदाजपणही विस्तारलं होतं, धाक्याचं मात्र हरवंल होतं!

## हिरू निरूत्तर

हिरू सकाळी लवकर उठला. सहाची एस्. टी. धावत-पळत पकडून तो तडक कर्जतला गेला. बाजार उघडायचाच होता. कोपऱ्यावरच्या हॉटेलमध्ये चहा घेतल्यावर जरा इकडे-तिकडे फिरून कोणी ओळखीचा भेटतो आहे का पाहिले. कोणीच दिसले नाही तेव्हा एका दुकानाच्या फळीवर बसून राहिला. त्याच फळीवर मणी माळा, काळे ताबंडे दोरे वगैरे कातकरी, ठाकूर बायकांना लागणाऱ्या सौभाग्य वाणांची विक्री करणारी बाई दुकान थाटून बसते हे त्याला माहीत होते. अर्ध्या-पाऊण तासात बाई आली. तिचे दुकान लावून झाल्यावर हिरूने एका माळेची किंमत विचारली.

वारकरी गळ्यात घालतात तसल्या प्रकारची ती माळ होती. बाईने किंमती सांगितली. चार रूपये. हिरू हबकूनच गेला. इतर माळकऱ्यांनी तसली माळ रूपयाला आणलेली त्याला माहीत होती. माळेचा भाव करावा की न करावा असा प्रश्न क्षणभर त्याला पडला. धीर करून तो म्हणाला

'भारी किंमत सांगताय,

'मग काय चार आण्याला पाहिजे का? देवाच्या नावाने माळ घालायची मग पैशाकडे कशाला पहातोयस ?'

'नाही, पण चार रूपये म्हणजे फारच होतात,'

'मग तुला केवढयाला पाहिजे ते तरी सांगशील,'

'रूपया - दीड रूपयाला घेतल्यांत अशा माळा बाकीच्यांनी'

'काढ दीड रूपया, चल लवकर, बोहनीच्या टायामाला खटखट नको',

दीड रूपया देऊन हिरूने माळ घेतली. मनात म्हणाला, पहिल्यादांच दीड रूपया सांगितला असता तर माळ घेताना जरा बरं वाटल असत'.

कालच्या प्रकारानंतर हिरू रात्रभर तळमळला आणि मग त्याने हा निर्णय घेतला. दिवसभर मजुरी करून परतताना तो अगदी तर्रर होऊन आला होता. अशा वेळी बायकोशी भांडायला काही कारण लागत नाही. कशावरून तरी बोलाचाली सुरू झाली आणि पर्यवसान आवडीला बेदम मारण्यात आले.

हिरू मध्यरात्रीला शुद्धीवर आला. बायकोच्या कण्हण्याचा आवाज त्याच्या कानावर आला. मधून मधून सोडीव रे बाबा ह्या त्रासातून एकदा मरून गेले म्हणजे बरं होईल. अग बया ग, हात मोडलाय वाटतं, जरा पण हलवत नाही! वगैरे शब्द कानी येत होते. पोटात आग भडकली होती. हिरू उठला, चुलीपाशी गेला. मुलांनी थोडसं खाल्लेलं दिसत होत. बायको उपाशीच झोपली असावी. हिरूने बकाबका खाऊन घेतले. बायकोजवळ जाऊन तिच्याशी बोलण्याचा त्याला धीर होत नव्हता. तो तसाच तरटावर जाऊन पडला. संध्याकाळच्या मारहाणीची त्याला जाणीव होऊ लागली. मनात कालवा - कालव सुरू झाली. झोप येईना, तळमळ संपेना. पहाटे त्याने पक्का बेत केला. कालच्या सारखा प्रकार पुन्हा होऊ द्यायचा नाही. पूर्वीही आपण असे बेत केले आणि दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मजुरीवरून येताना बाटली घेऊनच आलो. उद्या पुन्हा तसेच घडले तर? तगमग चालुच राहील आणि उजाडताच तो कर्जतला एस्. टी. वर गेला.

आपली माळ आपणच घेतली आहे. कोणा बुवाकडून घेतली नाही, ही जाणीव हीरूला होती. म्हणून त्याने फक्त दारू आणि एकादशीचा उपास एवढयापुरताच तिचा मान ठेवायचा असे ठरविले. मटण, मासे न खाण्याचं बंधन त्याने स्वीकारले नव्हते. आता एकादशी कधी आहे ह्यावर आठवणीने लक्ष ठेवणे हे त्याचे कामच होऊन बसले. हिरूची बायको सुखावली. नेहमीचा मार बंद झाला. आता एवदेवेळी काही कारणाने दोन दणके बसले तर ती मनावर घेत नसे. हिऱ्याचा हिरूबुवा झाला होता.

दारू सुटली दर पंधरा दिवसांनी उपवास मागे लागला. दोन वेळा चहा आणि अर्धापाव साबुदाणे ह्यावर हिरूबुवाने दोन - तीन एकादशा काढल्या. पण तिशीच्या गडयाला अख्खा दिवस तेवढयावर काढणे फार जड जाऊ लागले. त्याने विचार केला, साबुदाण्यापेक्षा वरईचे तादूंळ आणून शिजवावे - किंवा भाकरी करावी. दीड रूपया किलोने वाण्याने आपल्याकडून वरी घेतली. २।। / ३ रूपये किलोने तांदूळ मिळतील. पोटभर उपवास होईल. तो वाण्याच्या दुकानात गेला, किलोभर वऱ्याचे तांदूळ मागितले. वाण्याने सहा रूपये मागितले. हिरू जवळ तीनच रूपये होते. आता काय करणार? अर्धा किलो तांदूळ घेऊन तो घरी परतला.

त्याला आठवलं, भाद्रपद महिन्यात खायला काही नव्हतं म्हणून त्याने मणभर भात आणले होते. आणि त्याच्या बद्दल त्याला दीड मण वरी दिली होती. वरखर्चासाठी ठेवलेली वरी पण दीड रूपया किलो भावाने त्यालाच दिली. माझ्याच वरीचे तांदूळ मी एकादशीला सहा रूपये किलोने घेतो आहे. भाव केला नसता तर दीड रूपयाच्या माळेला चार रूपये द्यावे लागले असते. आवडी दीड दिवस रानात हिंडून किलोभर डिंक गोळा करते आणि सात - आठ रूपये किलोने विकते. शहरात तोच डिंक तीस रूपये किलो भावाने लोक वाण्याकडून घेतात असे त्याने ऐकले होते.

माळ गळ्यात घातली आणि हिरूची दारू सुटली. पण कोणाच्या गळ्यात काय बांधले म्हणजे वरईला चार रूपये भाव मिळेल आणि गोळा केलेल्या डिकांचे

आवडीला किलो मागे वीस रूपये मिळतील ह्याचे उत्तर मात्र हिरूला सुचत नव्हते.

# बेडकांच्या अवैध निर्यातीमुळे पर्यावरणशास्त्रज्ञ चिंतित


कलकत्ता : पश्चिम बंगालच्या दलदलीच्या क्षेत्रात रात्री कंदिल पेटवून बेडके पकडण्याचा उद्योग ग्रामीणांनी सुरू केला आहे. या भागातल्या शेतीवर त्याचा वाईट परिणाम होत आहे. राज्यात दोन वर्षांपूर्वीच बेडकांना पकडणे व त्यांची विक्री करणे यावर वन्य जीवन संरक्षण कानून के तहत प्रतिबंध जारी करण्यात आला आहे. परंतु हॉलैंड, अमेरीका, कॅनडा, जापान, सौदी अरब देशात बेडकांच्या तंगडयांची मागणी सतत वाढती आहे. बेडकांची बेकायदेशीर निर्यात बांगलादेशची सीमा पार करून पूर्ण केली जाते. वरील देशात बेडकांच्या तंगडया हे फार महागडे खाद्य मानले जाते. या निर्यातीतून मोठ्या प्रमाणात परकीय चलन प्राप्त होत होते, पण बेडकांची संख्या कमी होण्याबाबत पर्यावरणशास्त्रज्ञांनी चिंता व्यक्त केल्याने व शेती - उत्पादनावर केन्द्र सरकारने बेडकांची निर्यात करण्यावर बंदी घातली.

उत्तरी २४ परगणा जिल्हयातील नवापाडा रेल्वे लाईनजवळ बेडके पकडणाऱ्या श्री. पारितोष यांचे म्हणण्यानुसार एका तासात एक मोठी थैली भरून बेडके पकडता येतात. या बेडकांना किती किमंतीला व कोणाला विकतात हे सांगण्यास श्री. पारीतोष यांनी नकार दिला. ताबडतोब प्रचंड नफा देणाऱ्या या धंद्यातले रहस्य सांगण्यास अनेकांनी नकारच दिला. या निर्यातीमुळे शेती व्यवस्थेवर वाईट परिणाम होईल हे सांगितल्यावर श्री. पारितोष यांनी सांगितले की त्याची चिंता आम्ही कां करावी ?

(दैनिक उत्तर उजाला, नैनीताल, उत्तर प्रदेश. दिनांक १६ मे १९८९.)

(पान १६ वरून)

येईल अशी घोषणा त्यांनी त्यावेळी केली होती. माजी जिल्हाधिकारी एम. रमेशकुमार यांनीही गलगंडग्रस्तांना आयोडीन - मीठ मोफत द्यावे व दिले पाहिजे असे मत व्यक्त केले होते. लाकडाची मोळी विकली तरच झोपडीत चूल पेटते अशी ज्यांची करूणाजनक स्थिती आहे ते आदिवासी टाटाच्या शिक्क्याचे मीठ घेणार कसे ? एक किलोचे टाटाचे पॅकिंग २ रू. तर स्थानिक लक्ष्मी छाप १ रू. ५० पैसेला मिळते. डॉ. श्रीराम लागू यांच्या तोंडचे 'तुफानाला घर हवे आहे' वाक्य बदलून 'आदिवासींना साधे मीठ हवे आहे मिळेल काहो' ? असे म्हटले तर या समस्येचे गांभीर्य लक्षात येईल.



# खरे - खोटे आदिवासी कसे ओळखाल ?

महाराष्ट्र शासनाने दिनांक २४ एप्रिल १९८५ च्या शासन निर्णयाने जातीचे दाखले देण्याचे अधिकार असणाऱ्या अधिकाऱ्यांना जातीचे दाखले देताना सोयीचे व्हावे, नामसादृश्याचा फायदा घेऊन अनुसूचित जमातीची प्रमाणपत्रे मिळविणाऱ्या खोटया आदिवासींना आळा बसावा, त्यासाठी खरी आदिवासी जमात व त्यांच्या नावावर फायदा घेणाऱ्या बनावट आदिवासींच्या जाती कोणत्या यांचा तुलनात्मक तक्ता या शासन निर्णयास सहपत्र म्हणून जोडण्यात आलेला आहे. त्यात मूळ अनुसूचित जमात, तिचे मूळ राहण्याचे ठिकाण व इतर सर्वसाधारण माहिती देऊन प्रत्येक अनुसूचित जमातीच्या नावावर कोणत्या जातीचे लोक किंवा गट सवलती लुबाडीत आहेत त्यांची जात दिली आहे. व त्यापुढे ह्या खोटया आदिवासींची मूळ राहण्याची ठिकाणे, व्यवसाय इत्यादि सर्वसाधारण माहिती दिलेली आहे. ही सर्व माहिती शासनाने 'आदिवासी कल्याण मंत्री' यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या हाय पॉवर कास्ट कमिटी ने (High power Caste Committee) दिलेल्या अहवालाच्या आधारे तयार केलेली आहे.

या शासन निर्णयाची अंमलबजावणी जातीचे दाखले देणारे अधिकारी करत नाहीत. परिणामी बोगस आदिवासींचा सुळसुळाट वाढतो आहे. शासनाचे आदेश शासकीय कार्यालयातच पडून राहिल्याने आदिवासी समाजाचे अतोनात नुकसान होत आहे. आदिवासी छोटया - मोठया कार्यकर्त्यांना, संघटनांनादेखील याबाबत निश्चित माहिती नाही. म्हणून मुद्दाम येथे सारांशरूपाने महत्वाची माहिती देण्यात येत आहे.

( १) **टीप** :- शासन निर्णय आदिवासी विकास विभाग, क्रमांक सीबीसी-१६८४/ (३०९) /का - ११ दिनांक२४ एप्रिल १९८५ चे सहपत्र.

२) अनुसूचित जमातीच्या नावापुढे देण्यात आलेले आकडे हे अनुसूचित जमातीच्या यादीतील त्या जमातीचा अनुक्रमांक दाखवितात. )

## १. भैना (५) :-

अनुसूचित जमातीच्या यादीत क्रमांक ५ वर ही जमात आहे. ही अनुसूचित जमात अमरावती जिल्हातील मेलघाट तालुक्यात, गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा आणि यवतमाळ जिल्ह्यांच्या वणी आणि केळापूर तालुक्यात आढळते. या जमातीत लारीया किंवा छत्तीसगडी आणि उरीया असे दोन प्रादेशिक भेद आहेत. तसेच 'घटयारा' आणि 'झटयारा' ह्या दोन उपशाखा त्यांच्यात आढळतात. मुख्य व्यवसाय मंत्र तंत्र व जादू-टोणा करणे मोलमजुरी करणे हा आहे. ही जमात असून हिंदू धर्मीय आहे. त्यांच्यात मृत्यूनंतर प्रेत जाळले जाते.

भैना ह्या अनुसूचित जमातीच्या नावावर 'मुस्लिम', 'भाईना', बईना', 'बेहना' ह्या गटांचे लोक प्रमाणपत्रे मिळवितात. या मुस्लिम गटातील लोकांना धुनिया, कठेरा, पिंजरा इत्यादि नावांने ओळखले जाते. अमरावती आणि नागपूर ह्या विभागात हा गट विखुरला आहे. हे लोक मुख्यत: भोपाळ, बिलासपूर, खांडवा, बऱ्हाणपूर, यवतमाळ, मंडला याठिकाणी फार वर्षापासून स्थायिक आहेत. त्यांची मातृभाषा उर्दू आहे. इस्लाम धर्माच्या सर्व परंपरा आणि प्रथांचे ते पालन करतात. भाईना, बेहना हा मुस्लिमांचा एक व्यवसायिक गट आहे. त्यांचा भैना ह्या अनुसूचित जमातीशी सामाजिक, सांस्कृतिक, वांशिक, धार्मिक असा कोणताही संबंध नाही; मात्र नामसदृश्याचा फायदा घेऊन हे लोक भैना अनुसूचित जमातीची प्रमाणपत्रे मिळवितात.

## २. भिल्ल (८) :-

भिल्ल जमातीत तडवी भिल्ल ही एक शाखा आहे. त्यांपैकी काही तडवी भिल्ल इस्लाम धर्मीय आहेत. त्यांची वस्ती प्रामुख्याने जळगांव जिल्ह्यातील रावेर, यावल, चोपडा, जामनेर आणि पाचोरा या तालुक्यातील सुमारे ७०-८० गावांत विखुरलेली आहे. मुस्लिम तडवी भिल्लांत 'वतनदार' व 'सुखवस्तू' असे दोन भेद आहेत. मुस्लिम तडवी भिल्लांत मुख्यत्वे 'तडवी' असे आडनाव असते; तर हिंदू तडवी भिल्लांत निरनिराळी आडनावे असतात.

## ढाणका (१३) :-

**तडवी** : ढाणका तडवी ही भिल्ल शाखेपैकीच एक उपशाखा आहे. या जमातीत तडवी, तलेरिया, वळवी ह्या लहान उपशाखा आहेत. ही जमात धुळे - जळगांव जिल्ह्यांत विशेषत: सातपुडयाच्या पर्वतरांगांत वस्ती करून राहते. ते ढाणकी, भिल्ली भाषा बोलतात. शेती

आणि शेतमजुरी हा त्यांचा प्रमुख धंदा आहे. भिल्ल शाखेपैकीच असणाऱ्या ह्या जमातीची संस्कृती भिल्ल संस्कृती असून ढाणका शाखेतील तडवी हिंदू धर्मीय आहेत.

तडवी भिल्ल व तडवी या शाखेच्या नावावर इतर मुस्लिम लोक आदिवासी म्हणून प्रमाणपत्रे मिळवितात. मुस्लिम हे संपूर्ण राज्यात आहेत. तसेच ते विविध व्यवसाय करतात. मुस्लिम धर्म स्वीकारलेल्या तडवी भिल्लांशी इतर मुस्लिमांचा बेटी व्यवहार होत नाही. त्यांचे वैवाहिक संबंध त्यांच्या गटापुरतेच मर्यादित आहेत. तरीही मुस्लिम समाजाचे काही लोक तडवी भिल्ल असल्याचे जातीचे प्रमाणपत्र मिळवितात.

### ३. पावरा (८) :-

ही भिल्लाची एक प्रमुख शाखा आहे. पावरा जमातीची वस्ती मुख्यत: धुळे जिल्ह्यातील आक्रणी, शहादा, शिरपूर व तळोदा तालुक्यांत व जळगांव जिल्ह्यात रावेत, यावल आणि चोपडा तालुक्यांत आढळतो. 'पावागंड' हे त्यांचे मूळ ठिकाण सांगण्यात येते. तरी काही पावरा भिल्ल 'मथवा' सस्थानातून आल्याचे सागंतात. त्यांना स्थानिक लोक 'मथवाडी' या नावानेही ओळखतात. त्यांचा मुख्य धंदा शेती, जंगलकाम व शेतमजुरी हा आहे. ते निसर्गातील देवतांची पूजा करतात. त्यांचा मुख्य सण 'इद्रंज'; त्याशिवाय ते होळी, शिमगा, दसरा, दिवाळी हेही सण साजरे करतात. नागदिवाळी हा सण त्यांच्यात मोठया उत्साहान साजरा करतात. ते पावरी भाषा बोलतात. त्यांच्यात दहेज, घरजावई, पुनर्विवाह, विधवा विवाह, बहुपत्नीत्व या प्रथा प्रचलित आहेत. मृत्यूनंतर जाळणे व पुरणे ह्या दोन्हीही प्रथा त्यांच्यात आढळतात. भूत-पिशाचावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे.

पावरा भिल्लाच्या नावावर भोयर (पोवार) फायदा घेतात. हे मूळचे माळव्याचे राज्यकर्ते असून रजपूत-१२ व्या शतकात महमद घोरीच्या स्वारीमुळे पलायन करून नागपूर विभागात वैनगंगेच्या काठी स्थायिक झालेले आहेत. सध्या त्यांची वस्ती भंडारा, नागपूर, अमरावती आणि चंद्रपूर जिल्ह्याच्या काही भागांत आढळते. ही जात शेतीप्रधान व क्षत्रिय शाखेतील समजली जाते. हे लोक पावरा अनुसूचित जमातीचे असल्याची प्रमाणपत्रे मिळवितात.

भोयर (पोवार) या जातीचा समावेश इतर मागासवर्गाच्या यादीत क्र. १८९ वर केलेला आहे. या जातीचा पावरा जमातीशी सांस्कृतिक, सामाजिक, वांशिक, भाषा व वेशभूषा वगैरे बाबतीत कोणताच संबंध आढळून येत नाही.

### ४. भुंजिया (९) :-

ही जमात मेळघाट (अमरावती), गडचिरोली, सिरोंचा, केळापूर, वणी, यवतमाळ या विभागांत आढळते. १९७१ च्या लोकसंख्येनुसार त्यांची लोकसंख्या फक्त २३० होती. ही जमात ओरिसा आणि मध्यप्रदेशात मुख्यत: आढळते. त्यांच्यात 'चंखुलिया' व 'चिंदा' हे दोन गट आहेत. ते छत्तीसगडी हिंदी आणि बैयागी यांच्या मिश्रणातून निर्माण झालेली भाषा बोलतात. शेती आणि शेतमजुरी हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे.

भुंजिया या अनुसूचित जमातीच्या नावावर १) भरभुंजिया, भुजिया, २) भडभुंजे किंवा भडभुंजा ३) भुंजवा, भुजवा ४) परदेशी भुंजवा ह्या जातीचे लोक जातीची प्रमाणपत्रे मिळवितात. बाजारपेठांच्या गावी व शहरी प्रदेशात ही जात डाळ, चणे, फुटाणे भाजणे, लाह्या भाजणे व त्यांची विक्री करणे हे व्यवसाय करते. ही जात मुळची उत्तरप्रदेश, दिल्ली, भोपाळ, मथुरा परिसरातील आहे. नागपूर परिसरात त्यांची संख्या बरीच मोठी आहे. भोपाळकडील कायस्थांशी त्यांचा रोटी व्यवहार होतो. त्यांच्यात सक्सेना, श्रीवास्तव, झिनकर आणि भटियार इत्यादी शाखा आहेत. ही जात इतर मागासवर्गाच्या यादीत क्रमांक १६ वर समाविष्ट करण्यात आलेली आहे.

### ५. धनवार (१४) :-

ही जमात मूळची मध्यप्रदेशातील आहे. या जमातीत पोटजमाती नाहीत. यवतमाळ जिल्ह्यात ही जमात राहते. त्यांची भाषा गोंडी व छत्तीसगडी यांच्या संमिश्रणाने बनली आहे. मुख्य धंदा शेती असून ते उत्तम शिकारी म्हणूनही ओळखले जातात. धनुष्य-बाण हे शिकारीचे हत्यार ते वापरतात. शेतीबरोबरच बांबूपासून चटया, पाटया, टोपल्या बनविण्याचा धंदा ते करतात.

धनवार ह्या अत्यंत अल्पसंख्य असणाऱ्या जमातीच्या नावावर धनगर ही संपूर्ण महाराष्ट्रातील इतर मागासवर्गीयांच्या जातीत क्र. ३२ वर समाविष्ट केलेल्या जातीचे लोक प्रमाणपत्रे मिळवितात. धनगरांचा परंपरागत व आजचा मुख्य धंदा शेळ्या, मेंढया व जनावरे पालन, शेती आणि शेतमजुरी हा आहे. खंडोबा

व बनाई हे सर्व धनगर जातीची दैवते समजली जातात.

धनवार व धनगर ह्या वेगवेगळ्या जाती - जमाती आहेत. त्यांच्यात सामाजिक, सांस्कृतिक, वैवाहिक संबंध नाहीत. त्यांच्यात केवळ नामसाधर्म्य आहे.

## ६. गामित (१७) :-

गावित - गावित, गामित ही भिल्लांची एक शाखा आहे. ही जमात धुळे जिल्ह्यातील नवापूर, साक्री, नंदूरबार इत्यादी तालुक्यांत व सातपुड्यातील काही भागात प्रामुख्याने वस्ती करते. धुळे जिल्ह्याला लागून असणाऱ्या गुजराथ राज्यातील काही जिल्ह्यातही गावित जमात आहे. गावित आणि गामित यांची संस्कृती भिल्ल संस्कृतीच आहे. ते भिलोरी व मावची भाषा बोलतात. गावित, गामित जमातीत वळवी बसावे, मावची, पाडवी इत्यादी कुळ गण आहेत. शेती हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. थोडे लोक जंगलकामही करतात.

गावित, गामित जमातीच्या नावावर गावित ह्या लहान जहाजावर व गलबतावर मासेमारी करणारे, गलबते, जहाजे चालविणारे कोकणपट्टीवरील जातीचे अधिकार सांगतात. गाबीत या किनारपट्टीवरील प्रदेशातील लोकांना काही लोक कोकणी मराठा किंवा आरमारी मराठा असेही म्हणतात. ह्या लोकांची वस्ती मुख्यत्वेकरून मुबंई, सिंधुदूर्ग (देवगड, मालवण, वेंगुर्ला), रत्नगिरी (कुडाळ, राजापूर, सावंतवाडी) या जिल्ह्यांत व गोवा, कारवार व नॉर्थ कॅनरामध्येही आढळते. ते हिंदू देवदेवतांची पूजा करतात. श्री केपादेवी, श्री दिबदिवी, श्री रामेश्वर ही गाबीत जातीची आराध्य दैवते आहेत. गाबीत जात मालवणी (मराठी) बोलते.

**गामित ही भिल्ल अनुसूचित जमातीची शाखा आहे, तर गाबीत ही इतर मागासवर्गीयांच्या यादीत क्र. २०१ वर असलेली जात आहे. नामसाधर्म्य सोडल्यास या दोन्हींचा परस्परांशी सांस्कृतिक व वांशिकदृष्ट्या काहीही संबंध नाही.**

## ७. गोंड (१८) :-

**धोबा** : ही गोंड जमातीची एक उपजमात आहे. गोंडी संस्कृती हीच त्यांची संस्कृती आहे ; तर बोली - भाषा गोंडीच आहे.

धोबा ह्या गोंडच्या उपजमातीच्या नावावर धोबी (परिट, रजक, वरठी) या नावाने ओळखली जाणारी व काही खेड्यांत बारा बलुतेदारांमध्ये समावेश केलेली इतर मागासवर्गीय जात आदिवासींची प्रमाणपत्रे मिळवीत आहेत. धोबी किंवा परिट यांचा परंपरागत व्यवसाय लोकांचे कपडे धुण्याचा आहे. धोबी या जातीचा समावेश इतर मागासवर्गीयांच्या यादीत क्रमांक १२५ वर केलेला आहे. धोबा व धोबी यात असणाऱ्या नामसादृश्याचा फायदा घेऊन अनुसूचित जमातीची प्रमाणपत्रे धोबी जातीचे लोक मिळवितात. प्रत्यक्षात धोबा या गोंड उपजमातीचा व धोबी या जातीचा सांस्कृतिक, वांशिक, रूढीपरंपरा या कशातच साम्य नाही.

## ८. गोंड (१८) :-

**गोंडगोवारी** : ही गोंड जमातीची एक लहान उपजमात आहे. ही उपजमात गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा तालुक्यात आढळते. गोंड जमातीपैकी जनावरे पालन करणाऱ्या गोंडांना स्थानिक लोक गोंड गोवारी म्हणतात. त्यांची भाषा, चालीरीती, रूढी, परंपरा आणि धार्मिक संस्कृती गोंडीच आहे.

गोवारी ह्या गोंडाच्या उपजमातीच्या नावावर गोवारी, गवारी, गाय - गोवारी, दूधगोवारी ह्या जमातीचे लोक जातीची, प्रमाणपत्रे मिळवितात. ही जात प्रामुख्याने नागपूर, अमरावती, वर्धा, यवतमाळ, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये विखुरलेली आहे. कृष्णा, गंगा, जमुना ही त्यांची आराध्य दैवते आहेत. काडेकोडेवान हा त्यांचा प्रमुख देव मानला जातो. त्यांच्यात जात, पंचायत आहे. तिच्या प्रमुखाला शेंड्या असे म्हणतात. एकाच कुळात ते लग्न करीत नाहीत. शेती, गायी - गुरे पालन, दूधउत्पादन आणि शेतमजुरी हे त्यांचे प्रमुख धंदे आहेत.

गोवारी आणि तिच्या तत्सम जातीचा गोंड जमातीशी कोणताही सामाजिक संबंध नाही. त्यांच्यात सांस्कृतिक, वांशिक - भाषिक, वैवाहिक संबंध नाहीत. गोंड गोवारीत गाईचे दूध काढण्याची प्रथा नव्हती. ते फक्त जनावरांचे पालन करीत असत. याउलट, गोवारी जातीचा परंपरागत व्यवसाय दूध - उत्पादन करणे हा आहे. असे असले तरी नावातील साम्याचा फायदा घेऊन गोवारी जातीचे लोक 'गोंड गोवारी' या अनुसूचित जमातीची प्रमाणपत्रे मिळवितात. व आम्ही आदिवासी आहोत, असा दावा करतात.

## ९. माना (१८) :-

ही गोंड अनुसूचित जमातीची उपशाखा आहे. हल्ली 'गोंड माना' स्वतःला गोंड म्हणवून घेतात. त्यांची

(पान ४६ वर पाहा)

# मौखिक - संपदा

डॉ. भास्कर गिरीधारी

आदिवासींच्या पारंपारिक व दैनंदिन जीवनातील गीते विस्मृत होवू नये म्हणून ती छापील स्वरूपात उपलब्ध व्हावी असा 'हाकारा' चा प्रयत्न आहे. जाने - मार्च १९८८ चे अकांत सौ. सोनाबाई तळपे यांनी सकंलीत केलेली जुन्नर भागातील व श्री. राजाराम बेंडकोळी यांनी संकलीत केलेली ईगतपुरी भागातील आदिवासी गीते प्रसिद्ध केली होती. या अकांत जव्हार (जिल्हा - ठाणे) या भागातील व प्रा. डॉ. भास्कर गिरीधारी यांनी सकंलीत केलेली गीते प्रसिद्ध करीत आहोत. गीतांचा मराठी अर्थ डॉ. गिरिधारी यांनीच लिहिला आहे. आदिवासी लोकगीतांची वैशिष्टये स्पष्ट करणारा स्वतंत्र लेख याच अकांत प्रसिद्ध केला आहेच.

## सीता हाक मारते

सीता गेलीय वारूळे तळेला सोनु कंबळायला
हाक मारीते दशरथाला ग तिच्या सासऱ्याला
हाक मारीते कौसल्याला ग तिच्या सासूला
सीता गेलीय वारूळे तळेला सोनु कंबळायला
हाक मारीते लक्ष्मणाला तिच्या दिराला
हाक मारीते रामयाला ग तिच्या नवऱ्याला
सीता गेलीय वारूळे तळेला सोनु कंबळायला

आदिवासी संस्कृतीत रामायण रूजलेले आहे हे या गीतातून उलगडते. नावे बदलून पुनरूक्ती हे वैषिष्टय येथे दिसते. त्याचप्रमाणे कौटुंबीकं नात्याला - सासू, सासरा, दीर आणि शेवटी लाजत नवऱ्याच्या उल्लेखाला या गीतात प्राधान्य आहे. रामायणातील सीता वारूळ नावाच्या पाडयावरील एका तळयात कमळे आणायला गेली ही कल्पना यात असून, सीता आपला सासरा दशरथ, सासू - कौसल्या, दीर - लक्ष्मण आणि नवरा - राम यांना हाक मारीते, एवढीच कल्पना या गीतात आहे. येथे 'सोनू' हे गाणे गाणारीच्या मैत्रिणीचे नावं आहे. आदिवासी गीतात आपले गावं आणि आस यांची नांवे गोवायला कायम वाव असतो.

## जंगल

जंगल जंगल जंगल ग आई जंगल ग
जंगलाच्या मध्ये मला दिलय ग
पायातले पैंजण केलें नग सीता केले न ग
आता कशाला रडतेस ग ॥ १ ॥ जंगल जंगल
गळ्यातले गंठण केले नग सीता केले न ग
आता कशाला रडतेस ग ॥ २ ॥ जंगल जंगल
जंगल ग आई जंगल ग जंगलाच्यामध्ये मला दिलंय ग
हातातच्या बांगडया केल्या न ग सीता केल्या न ग
आता कशाला रडतेस ग ॥ ३ ॥ जंगल
कानातल्या रींगा केल्या न ग सीता केल्या न ग

आता कशाला रडतेस ग ॥४॥ जंगल जंगल
नाकातली नथनी केली नग सीता केली न ग
आता कशाला रडतेस ग ॥५॥ जंगल जगंल

'जंगल' या गीतात जंगलचे राजे म्हणविणाऱ्या आदिवासींच्याच एका लेकीचे दु:ख उत्कटतेने चित्रित केले आहे. ही लेक आईला रडून सांगते की मला जंगलामध्ये का दिले. याचा अर्थ नागरी जीवनाचे सुप्त आकर्षण या वनवासी सीतेला आहे. 'जंगल' शब्दाच्या प्रासात्मक लयीतून जंगलाचा उबग प्रभावीपणे व्यक्त झाला आहे. लेकीच्या समजुतीसाठी मग जंगलाच्या या राजाने (नवरा) केलेल्या दागिन्यांची यादी गाण्यात येते. त्यावरून पायातले पैंजण, गळ्यातले गंठन, हातातल्या बांगडया, नाकातली नथनी, हे दागिने आदिवासींचे आवडते आहेत याचा बोध होतो. शिवाय महिला जगताला प्रिय असलेल्या दागिन्यांची हौसही या गाण्यातून भागते. तांबे, पितळ, कथिल, या धातूच्यांच दागिन्यांवर आदिवासी महिला खरा आनंद उपभोगतात.

## कुंतीचे गाणे

सांगते देवाला रे कुंती सांगते कृष्णाला
रे कर्ण हा पांडव रे पाहीला रे कर्ण हा पांडव रे पहिला ॥धृ॥
फुल तोडण्यासाठी गेले जल देवीला
सुर्य मंत्राची आठवण मजला
सुर्य मंत्र जपीलारे देवा सुर्य मंत्र जपिला
रे कर्ण हा पांडव रे पाहिला. ॥१॥
नव महिने गर्भ जपीला
सुर्य मंत्राची कर्ण हा आला
काळा कर्ण अवतरला रे देवा काळा कर्ण अवतरला
रे कर्ण हा पांडव रे पहिला ॥२॥
नाही घेतले कधी बाळाला
प्रेमाणी नाही चुंबीले त्याला
केला अर्पण गंगेला रे कर्ण हा पांडव रे पहिला ॥३॥
नकुल, सहदेव, भीम, अर्जुन
पाचवा तो राजा हा तो धर्म
सहावा माझा कर्ण
रे कर्ण हा पांडव रे पहिला ॥४॥

रामायणाप्रमाणेच महाभारतही आदिवासींमध्ये पूरते मुरलेले आहे. या कुंतीच्या गाण्यात महाभारतातील उपेक्षित कर्णाची व्यथा तिव्रतेने साकार झालेली आहे. हे गाणे ज्या स्वरात आळवले जाते तो विलक्षण करूण आहे. आपले दु:ख कुंती कृष्णाला सांगते ते असे-कर्ण पहिला पांडव, सूर्य मंत्राने नऊ महिने गर्भ जपून अवतरला पण प्रेमाविणा तो गंगेलाच अर्पण करावा लागला. पांच पांडवात सहावा कर्ण शोभला असता, पण प्रखर तेजापासून हाय रे देवा हा काळा कर्ण अवतरला.

## सासरच्या घरी

सासरच्या घरी ग आई मी बाबा कुणाला म्हणू
म्हण ग म्हण ग लेकी तुझ्याच ग सासऱ्याला २

सासरच्या घरी ग आई मी आई कुणाला म्हणू
म्हण ग म्हण ग लेकी तुझ्याच ग सासूला
सासरच्या घरी ग आई मी भाऊ कुणाला म्हणू
म्हण ग म्हण ग लेकी तुझ्याच ग दिराला
सासरच्या घरी ग आई मी ताई कुणाला म्हणू
म्हण ग म्हण ग लेकी तुझ्याच ग नंदेला

या गीतात अर्थोही कण्या परकीय एवं। ही कणवाची व्यथा टिपली आहे. माहेरवाशीण जेंव्हा सासरी जाते तेंव्हा ती व्याकुळ होते. तीला आपले घर आणि नाती - गोती आठवतात. या गीतात अत्यंत मौलिक उपदेश सासूरवाशीणीला केला आहे. यापुढे तू 'मी आई बाबा कुणाला म्हणू? असा प्रश्न न विचारता सासू सासऱ्यालाच आई बाबा म्हण असे समजावले आहे. त्याचप्रमाणे दीराला भाऊ म्हण व ननंदेला ताई म्हण. तात्पर्य सासर न मानता तेच आपले माहेर मान. हे गीत आजही उद्‌बोधक आहे.

## हळदीनं भरलय पातळ बायचं

हळदीनं भरलय पातळ बायच पातळ ग लग्नाच
दोन दिवसाची आई बायची सासू ग जन्माची
दोन दिवसाचा बाप बायचा सासरा ग जन्माचा
दोन दिवसांची बहीण बायची नंणंद गो जन्माची
दोन दिवसाचा भाऊ बायचा दिर ग जन्माचा
लग्नात बायनो उपास धरला उपास ग नवऱ्याचा

लग्नात हळद लागते तेंव्हाच माहेर सुटतं म्हणून यापुढे विवाहीत स्त्रीने माहेरच्या माणसांना विसरून सासरची माणसे जवळ करावीत, हा बोध या गीतात आहे.

आई, बाप, बहिण, भाऊ; ही दोन दिवसाची असून आता या आमच्या विवाहितेला सासू सासरा ननदं दीर जन्माचे मानावे लागणार आहेत. नवऱ्याचा उल्लेख मात्र मोठ्या खुमासदार रीतीने शेवटच्या ओळीत केला आहे. नवऱ्याच्या प्राप्तिसाठी नवस उपास - तापास हिने केले होते आणि म्हणूनच तो योग प्राप्त झाला आहे.

## काजळया डोहो माजविला

काजळ्या डोहो माजविला माजविला काळ्या डोहो माजविला
कुंभार नवरा सजविला सजविला कुंभार नवरा सजविला
कुंभार नवरा नको मला नको मला कुंभार नवरा नको मला
मटकी घडाय लाविला मला लाविल मला मडकी घडाय लाविलं मला ॥ १ ॥

काजळ्या डोहो माजविला माजविला काजळ्या डोहो माजविला
भंडारी नवरा सजविला सजविला भंडारी नवरा सजविला
भंडारी नवरा नको मला नको मला भंडारी नवरा नको मला
तांडी आंतायला लाविल मला लाविल मला ताडी ओतायला लावीळ मला ॥ २ ॥

काजळ्या डोहो माजविला माजविला काजळ्या डोहो माजविला
मास्तर नवरा सजविला सजविला मास्तर नवरा सजविला
मास्तर नवरा नको मला नको मला मास्तर नवरा नको मला

छडी द्यायला लावील मला लावील मला छडी द्यायला लावील मला
काजळ्या डोहो माजविला, माजविला काजळ्या डोहो माजविला ॥ ३ ॥

या गीतात गोड काळीमा पसरलेला डोह भरतीला आला आहे. कोळी गीतांची लय पकडून हे गीत रचलेले असावे. यामध्ये मुलीची नवऱ्या बद्दलची आवड-निवड व्यक्त झाली आहे. एकेका व्यवसायाला ती नकार देते. कुंभ्भार नवरा मडक्की घडवायला लावील म्हणून नको, भंडारी नवरा साडी आणायला लावील म्हणून नको. मास्तर नवरा नको कारण तो मला छडी द्यायला लावील, असे करत-करत प्रत्येक व्यवसायातील दोष खुबीने दाखविले आहे. याचा आनंद आदिवासी मुली गाणे गाताना लुटतात.

(काजळ्या प्रकारच्या मासोळ्यांनी युक्त असा डोह पालापाचोळा टाकून पाणी रंगवितात. त्या रंगाने मासे आंधळे बनतात आणि मरणोन्मुख होऊन आदिवासींच्या हाती लागतात. अशी ही प्रक्रिया आहे.)

## चल पोरी भर पाणी

चल पोरी भर पाणी लवकरी ग ठाण्याला जायाला वेळ झाली ..... २
ठाण्याला गेली पोर ठाणेवाली झाली ठाणेला गेली पोर ठाणेवाली झाली
भुलीन तुझ्या नखऱ्याला मला फसवले गरीबाला
भुलीन तुझ्या नखऱ्याला मला फसवले गरीबाला
चल पोरा भर पाणी लवकरी ग मुंबईला जायाला
वेळ झाली चल पोरी भर पाणि लवकरी ग
मुंबईला जायाला वेळ झाली
मुंबईला गेली पोर मुंबईवालीन झाली
भुलीन तुझ्या नखऱ्याला मला फसवले गरीबाला
भुलीन तुझ्या नखऱ्याला मला फसवले गरीबाला

या गीतात नित्याच्या पाणी भरण्याच्या क्रियेचे नादमय चित्रण ध्रुवपदात आले असून एका प्रियकराची व्यथा चटकदार पणे वर्णिली आहे.

चल पोरी तू लवकर पाणी भर कारण आपल्या ठाण्याला जायची वेळ झाली. पण ठाण्याला जाऊन ही ठाण्यावाली आणि मुंबईला जाऊन मुंबईवाली होऊन बसते आणि तीच्या नखऱ्याला भुलून हा बिचारा गरिब प्रियकर नाहक फसवला गेला.

## दर्याच्या किनाऱ्याला उगवेला चंद्र

दर्याच्या किनाऱ्याला एक किनाऱ्याला उगवेला चंद्र
सोडा सोडा सीताबाई आता सीताबाई आईचा छंद
धरा धरा सीताबाई आता सीताबाई सासूचा छंद
दर्याच्या किनाऱ्याला एक किनाऱ्याला उगवेला चंद्र
सोडा सोडा सीताबाई आता सीताबाई बापाचा छंद
धरा धरा सीताबाई आता सीताबाई सासऱ्याचा छंद
दर्याच्या किनाऱ्याला एक किनाऱ्याला उगवेला चंद्र
सोडा सोडा सीताबाई आता सीताबाई भावाचा छंद
धरा धरा सीताबाई आता सीताबाई दिराचा छंद
सोडा सोडा सीताबाई आता सीताबाई बहिणीचा छंद

धरा धरा सीताबाई आता सीताबाई नंदेचा छंद
दर्याच्या किनाऱ्याला एक किनाऱ्याला उगवेला चंद्र

या गीतातही कोळी गीताची नकल आहे. पण काही आदिवासी किनाऱ्यालगत राहतात, सागराच्या किनाऱ्याला एक चंद्र उगवला आहे म्हणजे या गाण्यातल्या खुणा सीता नावाच्या मुलीचे लग्न झाले व तीला नवा प्रकाश लाभला. म्हणून हे सीताबाई तू आता आईचा छंद सोड आणि सासूचा छंद धर, भावाचा बहिणीचा सोडून दीर ननंदेचा छंद धर मुलीला शहाणपण शिकविणाऱ्या या गीतात छंद शब्दाला जोडीचा यमक जुळणारा म्हणूनही चंद्र शब्द झाला आहे अर्थात तो प्रेमाचे प्रतिक आहेच.

## श्रावण बाळ जातो काशीला

श्रावण बाळ जातो काशी ला रे जातो काशीला
मात्यापित्यांची कावड खांद्याला रे कावड खाद्यांला
मात्यापित्यांना तहान लागली रे तहान लागली
कावड उतरली वृक्षाफांदीला रे वृक्षाफांदीला
श्रावण बाळ गेला पाण्याला रे गेला पाण्याला
झारी बुडवताना आवाज आला रे आवाज आला
दशरथ राजाने बाण सोडीला रे बाण सोडीला
श्रावण बाळाच्या छातीत घुसीला रे छातीत घुसीला
श्रावण बाळ धरती पडीला रे धरती पडेला
श्रावण बाळ जातो काशी ला रे जातो काशीला

हे गीत श्रावणाची करूण कहाणी सांगणारे आहे. आदिवासी थाळगाण लावताना सुद्धा श्रावणबाळाची कथा समरसून सांगतो. ही कथा खुपच लोकप्रिय दिसते. माता-पित्याची कावड खांद्यावर घेवून श्रावणबाळ काशीला जातो. आईबापांना तहान लागली म्हणून झारीने पाणी आणायला जातो आणि दशरथाच्या बाणाने मृत्युमुखी पडतो.

विशेष म्हणजे श्रावणाच्या आई वडीलांचे नाव सुद्धा आदिवासींना माहित आहे ते विठ्ठल रूखुमाई असे नांव सांगतात.

## आज मी नवस घेईन देवाला

आज मी नवस घेईन देवाला की गणपतीला
सोन्याचा टेबल वाहीन देवाला की गणपतीला
आज मी नवस घेईन देवाला की श्रीकृष्णाला
सोन्याची बासरी वाहीन देवाला की श्रीकृष्णाला
आज मी नवस घेईन देवीला की संतोषीला
सोन्याची तलवार वाहीन देवीला की संतोषीला
आज मी नवस घेईन देवीला की लक्ष्मीला
सोन्याचा कमळ वाहीन देवीला की लक्ष्मीला

नवसावर आदिवासींचा विश्वास आहे, तसाच देवावरही हे या गीताने स्पष्ट होते. देव आणि देवाच्या आवडीच्या वस्तू या गीतात आल्या आहेत. गणपतीला सोन्याचा टेबल ऊ, श्रीकृष्णाला सोन्याची बासरी, संतोषी मातेला सोन्याची तलवार, लक्ष्मीला सोन्याचे कमळ वाहण्याचा नवस येथे केला आहे, देव-देवता आणि त्यांच्या आवडी आदिवासींना भिणल्याचे येथे नवल वाटते.

## आई तुझा नवस कोणी घेतीला

आई तुझा नवस कोणी घेतीला ग आई तुझा नवस कोणी घेतीला
घेतीला पाची पांडवांनी ग भीमा - अर्जुनाने
आई तुझ देऊळ कोणी बांधील ग आई तुझ देऊळ कोणी बांधील
बांधील पाची पांडवांनी ग भीमा - अर्जुनानी
आई तुझा नवस कोणी फेडीला ग आई तुझा नवस कोणी फेडीला
फेडीला पाची पांडवांनी ग भीमा - अर्जुनानी

या गीतातील भाव मातृप्रेम नसून देवी किंवा कुंती हा अर्थ आई शब्दातून लागतो. कारण कुंतीची मुलं इ. पाची पांडव यांचा उल्लेख येतो. भीमाचे आणि अर्जुनाचा पराक्रम या सामर्थ्यावर या आईचे देऊळ बांधून नवस फेडला जाण्याची भावना या गीतात व्यक्त केली आहे.

## शेवंतीची फुले


शेवंतीची फुले न गुंफूनिया हार न पाहिला हार कुणाला
पहिला तो हार न माया गणपती देवाला ग .....२
शेवंतीची फुले न गुंफूनिया हार न पहिला हार कुणाला
पहिला तो हार न माया श्रीकृष्ण देवाला ग .....२
शेवंतीची फुले न गुंफूनिया हार तिसरा हार कुणाला
तिसरा तो हार न माया लक्ष्मी मातेला ग .....२
शेवंतीची फुले न गुंफूनिया हार चौथा हार कुणाला
चौथा तो हार न माया संतोषी मातेला ग .....२
शेवंतीची फुले न गुंफूनिया हार न पाचवा हार कुणाला
पाचवा तो हार माया रेणूका मातेला ग .....२

आदिवासींना उपजतच फुलांची हारांची आवड आहे. त्यांना फुले माळायला आवडते तसेच देवाला वाहणेही आवडते या गीतात सुगंधी शेवंतींची फुले गुंफून किंवा माळून पहिला' हार गणपतीला दूसरा हार कृष्णाला, तिसरा संतोषी मातेला, चवथा हार रेणूका मातेला वाहिला आहे. नवल म्हणजे ज्ञानेश्वरांनी म्हटलेले ओम् नमोजी अद्या त्या गणपतीलाच पहिला हार आदिवासीही आपल्या लोकगीतातून अर्पण करतात.

# पिली - कनेर


उल्हास राजश

सांस्कृतीक संपन्नता आणि आर्थिक विपन्नता यांचा साऱ्या उत्तर भारतात एक वेगळाच मिलाफ ठायी ठायी आढळून येतो. तुलसी आणि मिराबाईच्या गहऱ्या तत्वज्ञानातल्या नितळ मनोवृती एवढाच आनंदाचा नृत्यझंकार तराईच्या वनवासी जीवनात मन रमवून टाकतो. याच रहस्य आहे, तीथल्या निसर्गाच्या



थारू जमातीच्या महिलांशी चर्चा करतांना कार्यकर्ते.....

उदारतेत. हिमालयाच्या उतारावर शेकडो मैल पसरलेली घनदाट जंगले, लाल तुऱ्याचे देखणे पक्षी, भयचकित करणारे श्वापदे, उपजाऊ जमिनी, वाऱ्यावर डोलणारी गव्हाची सोनेरी शेते, अवघ्या दहा हातावर मिळणारे भरपूर पाणी आणि चेहऱ्यात मॅंग्रोलाईड वंशाची चिन्हे सावट दर्शवीत हसणारे यौवन. आणि या साऱ्या संपदेचे भू - स्वामी आहेत 'बुक्सा व थारू' या वन्य जमाती. रजपूतांचे साहसी रक्त त्यांच्या धमन्यातून खेळत असल्याचे पुरावे ईतिहास व त्यांच्या लोककथा देत आहेत. राजस्थान व पंजाबमध्ये जेंव्हा जेंव्हा परराष्ट्रातून शक, कुशाण व मोगलांची आक्रमणे व युध्दे यांनी थैमान घातले, तेव्हा तेथल्या समाजात उठलेल्या खळबळीचे अनेक तरंग दक्षिणेकडे विन्ध्य - सातपुडा पर्वतश्रेणीत आणि पूर्व - उत्तरेला हिमालय पायथ्याला तराई प्रदेशापर्यन्त जनलाटा होऊन पसरले. अनेक शतकांतून निसर्गाची पारस्पारीक नाते निर्माण करणारे बुक्सा आणि थारू, हेच येथल्या भूमीला सर्वाधिक परिचित असणारे मानवपुत्र आहेत. त्यांची सत्यप्रिती आणि वचनबध्दता पाहिली की प्रशंसेला शब्द सापडत नाहीत. दो - पुलिया हे छोटेसे गांव याच तराई प्रदेशातले. एका अन्यायाविरूध्द सरळ घाव घालणाऱ्या बुक्सा - युवकाला खूनाचा प्रयत्न करण्याच्या आरोपाखाली अटक झाली तेव्हा या भागातल्या श्री. प्रेमकृष्ण द्विवेदी यांचे या प्रकरणाकडे लक्ष वेधले. श्री. द्विवेदी हे पंडित हृदयनाथ कुंझरूंचे शिष्य. या युवकाची खरी कहाणी जाणून, त्याचा बळी जाऊ नये म्हणून ते हायकोर्टापर्यन्त गेलेत. पण या बुक्सा - युवकाने जे घडले त्याचीच जबानी देण्याचा हट्ट राखला अन न्यायालयात सजा स्विकारली. व्दिवेदीजी सहज म्हणून गेले, 'अगर वो इन्कार कर देता,'. युवकाच्या पालकांनी त्यांना अडवित सुनविले 'आप स्कूल वाले है हमारे गांवमे आपका कोई स्कूल होता, तो हमारे बच्चे भी झूठ बोलना सिख जाते'. व्दिवेदी उतरले, 'हम



**बुक्सा जमातीच्या मुली बालवाडी - शिक्षिका - प्रशिक्षण शिबिरात**

स्कूल तो तब खोल सकते, जब तुम्हारे गांवमे कोई जमीन देता' बुक्सा शेतक-याने पुढे होऊन आपली अर्धी जमीन व्दिवेदीजींच्या संस्थेच्या नावाने लिहून दिली. आणि आज त्याच जमिनीवर हायस्कूलची इमारत उभी आहे. आणि सुमारे तीनशे बुक्सा मुले मुली तेथे शिक्षण घेत आहेत.

तेथील शिक्षकांशी चर्चा करतांना इयत्ता आठवीत एकूण अठरा बुक्सा विद्यार्थी आहेत व त्यातील चौदा जण पास झाल्याचे वृत्त समजले. सर्व प्रथम आलेला विद्यार्थी बुक्सा आहे. अनेक बुक्सा विद्यार्थी संस्कृतची निवड करतात हे ऐकून कुतूहलाने एका बुक्सा विद्यार्थ्याचे सर्व पेपर्स मागितले. 'प्रेमदेवी बुक्सा' चे पेपर्स पाहतांना संस्कृतमध्येच काय पण हिन्दीतही ती नापास झाल्याचे दिसले. चित्रकलेच्या उत्तरपत्रीकेतील तीची 'पिली कनेर' मात्र हातात उचलुन घेण्याचा मोह व्हावा एवढी सुरेख होती. प्राकृतिक सौन्दर्याशी तीची जानपहचान असल्याची 'पिली कनेर' साक्ष देत होती.

बुक्सा - थारूंची, निसर्गाशी आणि निसर्गाची त्यांच्याशी असणारी ही जान - पहचान यापुढे टिकणे मात्र कठीण झाले आहे. - निदान भारतात तरी त्यांचे हे परस्परांशी असणारे सख्य यापुढे टिकणार नाही अशी परिस्थिती आहे. आधुनिक जमिनदारीच्या आघातांमुळे यापुढे त्यांचे आणि भारताचे तरी नाते टिकेल का अशी शंका निर्माण झाली आहे.

थारू - बुक्सांच्या विस्थापनाच्या कहाणिला प्रारंभ झाला १९५२ मध्ये. त्याआधी शेकडो वर्षे त्यांनीच या भूमीला उपजाऊ बनविण्यासाठी कष्ट घेतले होते. पण १९५२ सालापासून सरकारने पंजाब मधून आलेल्या लोकांच्या पुनर्वसनाचा (कॉलोनायझेशन) चा कार्यक्रम सुरू केला. संपूर्ण भारतात शासकीय विकास कार्यक्रमांचा पहिला परिणाम म्हणून आदिवासी वस्त्या उजाड झाल्याचे दृश्य दिसते. कधी ते भागीरथीवरील हिमालयातील टिहरी धरण असते, कधी ती ओरिसा - बंगाल मधील विद्युत - ऊर्जा केंन्द्रे असतात. पण शासनाचा विकास कार्यक्रम म्हटले म्हणजे आदिवासीच्या छातीत विस्थापनाचे भय दाटते. या विकास कार्यक्रमांचा दुसरा परिणाम म्हणजे नागरी आणि प्रगत समाज सर्व परिसरावर आणि साधनसम्पत्तीवर आपला कब्जा घट्ट करतो. निर्माण झालेल्या विकास - संधी या प्रगत समाजाला समृध्दी बहाल करतात अन रोजंदार मजूर बनून आदिवासी त्यांच्या दरवाजात लाचारीने उभे राहतात. धरणे, उर्जा - प्रकल्प, या बरोबरच शासनाच्या कॉलोनायझेशन - प्रोग्रॅम ही आदिवासींना त्याच्यांच भूमीत परकेपण देऊन गेलाय. फाळणीनंतर विभाजीत पंजाबमधून बाहेर पडणारे शरणार्थी, तराई प्रदेशात आणण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला. हारलेले, त्रस्त पंजाबी लोन्ढेच्या लोन्ढे तराईकडे वळविले गेले. बहुधा येथेच विरोध होण्याची

शक्यता नाही हे हेरून हा निर्णय झाला असावा. अक्षरशः शेकडो एकरांवरील घनदाट जंगले नष्ट करून त्यात या पंजाबी जनसमुदायासाठी कॉलनी उभारल्या गेल्यात. नको असलेली झाडे ज्या निर्ममतेने कापण्यात आली, त्याच निर्ममतेने आदिवासींनाही त्यांच्या पर्यावरणातून सामाजिक जडांसह उपटून दूर फेकण्यात आले. क्वचित कुठे कुठे त्यांना नव्या बंजर जमिनी दिल्याचे जाहिर झाले पण त्याचा ताबा त्यांच्या नशिबात नव्हता. आपला कोणता अपराध झाला हे न कळताच सारी यंत्रणा सहन करता करता अनेक बुक्सा - थारूंनी प्राण सोडले. ते जातील तिथून त्यांना हुसकावण्यात आले. किती अश्राप बालके भूकेने तडफडत राहिली ! किती मातांच्या डोळ्यातील अश्रू आटले !! हिमालयाचे उतार चढून या पतिविरहित स्त्रीया पदरात तान्हुल्यांना गुंडाळून, अब्रू जपत जपत, धडधडत्या अंतःकरणाने रात्री जंगलातून चालू लागल्या, आणि अखेर नेपाळच्या हद्दीत जाऊन सुटकेचा निःश्वास टाकला. आणि त्यांना पहिला आठव आला तो भारतात राहिलेल्या त्यांच्या अनेक नातेवाईकांचा, काय होते त्यांच्या नशिबात? त्या मातांना दिसले नाही ते आपण आज सहज पाहु शकतो. नैनीताल जिल्ह्यातल्या एका बाजारपेठेच्या अगदी तालुकाही नसलेल्या छोटयाश्या गावातून हिंडत होतो. समोर एक अति - विशाल गुरूव्दारा प्रचंड घुमटासह उभा ठाकला. अरूंद रस्त्यातून ट्रॅक्टर्स धडधडत जात होते. ट्रॅक्टर्सच्या इंजिनावर सारे पंजाबी कुटुंब आणि ट्रॉलीत गव्हाची पोती आणि चारा. बाजूला असलेल्या शुगर फॅक्टरीतल्या काळ्या धूराने सारा आसमंत कुंद झालेला. शिवाय अधुन मधून मस्तक सुन्न करणारे दुर्गंधीचे झोत ही फॅक्टरीतून बाहेर पडत होते. रस्त्याच्या कडेकडेला वाहन दुरूस्तीची गॅरिजेस. सधन फेटेधारी शेतकरी मारूती आणि फियाट घेऊन जातांना मिनटा मिनटाला दिसत होते. मातीच्या उंच भट्टयातून तंदुरी रोटी भाजणारे आचारी, प्रत्येक ढाबा मजूरांनी भरून गेलेला. आणि ..... पोटरीच्या नसानसात साकळलेल्या रक्ताची पर्वा न करता, दातओठ खाऊन सायकल रिक्षा ओढणारे अवघे १२/१५ वर्षाचे बुक्सा - मुले. पुलिस चौक्यातील रेकॉर्ड चाळून पाहिले तर ही बुक्सा मुले अनेक अपराधांच्या मामल्यात सापडल्याचे पुरावे दिसतील. कुणी केले त्यांना अपराधी? या वाटेला ते वळले कसे? सेवानिवृत्त सैनिकानांही शासनाने नैनीताल जनपदमधेच जमीनी दिल्या. निर्वासित पंजाबी व सेवानिवृत्त सैनिक यांनी त्यांना मिळालेल्या जमिनीच्या डावी - उजवीकडे आणि मागे पुढे आपल्याला हद्दी वाढवून बुक्सा - थारूंच्या जमिनी दाबून घेतल्या. महसूल, सिंचन आदि सरकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी या मोगलाई लुटीला उत्साहाने सहकार्य केले. ज्यांनी याला विरोध केला त्या थारू - बुक्सांची व्यवस्थित पिटाई झाली. जे विरोध करतात, ते बेकायदेशीर धंदे करतात असे सांगणारे काही पुढे येतातच, पोलिसांनी त्यांचे म्हणणे तत्परतेने लिहून घेतले व नैतिक्तेचे रक्षण करण्यासाठी, चोरी, लूट, दंगेखोरी अशा अनेक अपराधांना हे बुक्साच जबाबदार असल्याच्या केसेस न्यायालयात पाठविल्या.

चोरीच्या मालाचा पंचनामा, साक्षीदार सारे पाहून न्यायालयांनी न्यायबुद्धीने ! या बुक्सांना सजा ठोठावल्या. बुक्सा - थारूंच्या जमिनींवर देशभक्तांनी लाखो रूपयांचे भांडवल गुंतवणूक करून मोठेमोठे फार्मस उभे केले. खते, बि - बियाणे पुरवठा करणाऱ्या व्यापाऱ्यांची जमात झपाटयाने गावांगांवात अवतीर्ण झाली. ठिकठिकाणी दिल्ली, डेहराडूनला शोभावे असे राजमहाल बांधले गेले. कुमाऊ पहाडीतील जवान खाकी ड्रेस पहनून हातात दंडे घेऊन या राजमहालांच्या गेटवर पहारा करू लागले ते ज्यांना हटकत होते ते त्यांचेच भुके कंगाल भाऊबंद होते.

लखनौचे व्यापारी आणि त्यांचे एजंट भाजी - फळे आणि गहू खरेदीसाठी तराईला भेटी देऊ लागले. त्यांच्या मुकामासाठी आणि सेवेसाठी हॉटेल्सची गरज होतीच. कुंपणाच्या आंत समृद्धीची पिके डोलतय आणि कुंपणापलीकडे विस्थापित बुक्सा - थारू मजुरांच्या झोपडयातून रॉकेलच्या चिमण्या अंधाराशी केविलवाणा विरोध करताय हे आता नित्याचे दृश्य झालेय.

तलाठी, नायब तहसिलदार, रजिस्ट्रार, मामलेदार, पोलिस कर्मचारी व अधिकारी, ऊस विकास अधिकारी, साऱ्यांना त्यांचा हिस्सा - वाटा घरपोहच मिळाल्याने या शहरी शिस्तीवर ते खुश होते. शांतता भंग होणार नाही व उगाचच कुणाची अंधार फाडून जाणारी आर्त किंकाळी विधानसभेत रसभंग करणार नाही याचा ते कायदेशीर बंदोबस्त करू लागलेत.

जमिनीचे ऐलाटमेंट एकाचे नांवाने, कब्जा दुसऱ्याचा शेती करणारा तिसरा आणि विकणारे अजून भलतेच. सारे लँड - रेकॉर्ड एक अजब गुंतागुंत झाली. कोर्ट आणि

खटलेबाजीलाही ऊत आला. कोर्ट कचेरीचे मामले समजू न शकणारे दुर्दशा होऊन बाहेर पडलेत.

धरण फुटल्यासारख्या आलेल्या या विपत्तीत आदिवासी समाज गटांगळ्या खात असतानाच दोन अनपेक्षित घटना घडल्यात. अलाहाबादला सर्व्हन्टर्स ऑफ इंडिया सोसायटीचे लाइफ मेम्बर असणारे श्री. आर. एस. मिश्रा या वृत्तान्ताने अस्वस्थ झाले. ते स्वत: गंगाकाठावरील प्रयागच्या वेदशास्त्र सम्पन्न उच्चवर्णिय आणि फ्युडल घराण्यातले. आदिवासीसाठी कितीही मन कळवळले तरी त्यांच्या स्वत:च्या मर्यादा फार होत्या. त्यातल्या त्यात त्यांनी शिक्षणाचा दिर्घकालीन उपाय योजण्याचे ठरवून तराई भागात ठिकठिकाणी आदिवासींसाठी शाळा आणि काही ठिकाणी फक्त बुक्सा मुलांसाठी होस्टेल्स सुरू केलीत. १९७८ मध्ये महसूल खात्याचे सचिव व आय. ए. एस. अधिकारी श्री. एन. सी. सक्सेना यांनी स्वत: ठिकठिकाणी हिंडून परिस्थितीचे अवलोकन केले व सरकारी लँड रेकॉर्ड मधून आदिवासी जनजातियांची नांवे झपाटयाने कमी होत असल्याचा रोखठोक रिपोर्ट उत्तर प्रदेशच्या सरकारला दिला.

श्री. आर. एस. मिश्रा आणि श्री. सक्सेना यांनी भविष्य काळातल्या दोन विधायक शक्तिप्रवाहांचे बिजारोपणच यातून केले होते, याचा प्रत्यय आज येतोच. श्री. सक्सेना यांनी आपल्या रिपोर्टमधे अनधिकृत कब्जेदारांच्या स्वामित्वावर कडा प्रहार केला व जमिनदारी विनाश कायद्याच्या १५३ व्या कलमाचे आस्तित्व अर्थहीन होऊन आदिवासींच्या जमिनी 'फ्रॉड आणि फोर्सच्या' बळावर हिसकावून घेत असल्याचे स्पष्ट केले होते. एका सनदी आय. ए. एस. ऑफिसरने लिहिलेल्या अहवालाने उत्तर प्रदेशच्या असंख्य जागृत व्यक्ती, संस्था, कार्यकर्त्यांचे लक्ष वेधून घेतले व सुशिक्षित जनमताने राज्य शासनावर आदिवासींच्या दुर्दशेकडे व विस्थापनाकडे डोळेझांक करून मदत केल्याबद्दल वारंवार ठपका ठेवला. उच्चवर्णियातल्या एका गटाने याबाबतचे तथ्य उजागर करणारी सारी कागदपत्रे इंदिराजींच्या हवाली केलेत व निश्चित कार्यवाहीचा सक्त आग्रह धरला. १९८० मध्ये इंदिराजी पुन्हा सत्तेवर येताच त्यांच्या दबावाने राज्य सरकारने तराई प्रदेशातील जनजातीच्या जमिनीवरील बेकायदेशिर ताब्यांची तपासणी करणाऱ्या समितीचे कार्य सुरू केले. गैर आदिवासींच्या जमिनी काढून घेऊन त्यांना भूमिहिन करण्याचा हा डाव आहे. असा आरडाओरडा हितसंबंधियांनी सुरू केला. याची किमंत मतांच्या राजकारणात मोजावी लागणार असा धमकीवजा इशारा दिला गेला. राज्याचे नेतृत्वाने धावत पळत दिल्ली गाठली. पण दिल्ली याबाबत काहीही ऐकून घेण्यास तयार नव्हती. समितीचा पहिला अहवाल बाहेर आला. त्यात स्पष्ट लिहिले होते, 'गैर आदिवासी हे कुणी गोरगरीब नसून लढाऊ जमातीतले शक्तिसंपन्न गट आहेत. त्याशिवाय उद्योगपती, चित्रपट - कलाकार, राजकारणी, अति बडे लष्कर अधिकारी यांनीही आदिवासींच्या जमिनीची लूट केली आहे. या लढाऊ जमातीतल्या शक्तिसंपन्न गटांकडील आदिवासींच्या जमि ी काढून घेतल्या तरी ते भूमिहिन होणार नाहीत कारण दुसऱ्या जमिनी त्यांचेजवळ मालकीहक्काने आहेतच. शिवाय यातल्या अनेकांचे व्यवसाय आहेत. लंडन व मुंबई शहरातून यांचे नातेवाईक व्यवसायाची सुत्रे हलवित असतात. याउलट आदिवासींची आर्थिक गतिशिलता लगभग शून्य आहे. या प्रदेशातला विकास असंतुलित असून त्याचा फटका फक्त बुक्सा व थारू यांनाच सहन करावा लागतोय'. कार्यकर्त्यांना जे जनप्रबोधन करणे शक्य झाले नसते, ते या सरकारी अधिकाऱ्यांच्या कमिटीने आपल्या रिपोर्टने करून दाखविले. तराई प्रदेशातले सारे फार्म - मालक अस्वस्थ झाले. जमिनी लुटण्याची एक 'कायदेशिर' पद्धत अस्तित्वात आली. या कायदेशीर पद्धतीत सर्व प्रथम आदिवासी अल्पभूधारकांना खते, पाण्याचे पंपस्, आणि मोटारी, विहिरी यासाठी भूविकास बँकांकडून भराभर कर्ज मिळू लागली. कर्ज नको असले तरी त्याची कागदपत्रे तयार करून त्यावर मंजूरीचे सही शिक्के उठवून, मोहात पाडून कर्ज वाटपाचा धडाका सुरू झाला. यथावकाश हा शेतकरी थकबाकीदार असल्याचे जाहीर केले जाते. भूविकास आणि अन्य बँकाची कर्जे फेडण्यासाठी आम्ही जमिन विकू इच्छितो असा त्यांच्याच सह्यांचा अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल होतो. आणि कलम १५७ नुसार जमिन विक्रीसाठी जिल्हाधिकारी तशी परवानगी देतात. या पध्दतीने जी जमिन बिगरआदिवासींनी त्या आधीच हाडप केली असते. ते आता कायदेशीर मालक बनतात. एकटया नैनीताल जिल्हयात या पध्दतीने प्रतीवर्षी ५०/६० प्रकरणांत परवानगी देतात. गरीबांच्या जमिनी हिसकावून घेण्यासाठी बँका या सर्वात जास्त उपयुक्त शाबित झाल्या. वेगवेगळया नावांनी या जमिनी

रजिस्टर्ड करून मूळ मालकाला भूमीहिन राखण्याच्या या प्रकारानां अभूतपूर्व यश आले आहे. सरकारी रिपोर्टनुसार अशा जबरदस्ती व अनुचित पद्धतींनी जमिनीवर ताबा करणाऱ्यांची संख्या पाच हजारावरून वीस हजारांवर पोहचली आहे. सरळ सरळ दंडेली करून सरकरी जमिनीवर अतिक्रमण करून त्यांनी सुमारे पंचावन्न ( ५५ ) हजार एकर जमिनीवर ताबा केला आहे. थारू - बुक्सांना त्यांची गांवे उठविल्यावर गांव व शेतीच्या बदल्यात जी जमिन सरकारने दिली होती, तीच्यावरही बाहेरून आलेल्यांनी अतिक्रमणे करून, काटेरी कुंपणे उभारली. या साऱ्या सुलतानीला नियमित करून घेण्यासाठी सरकारी कर्मचा-यांनी तऱ्हेतऱ्हेचे उलट सुलट आदेश जारी केलेत. राज्यकारभार करतांना काही सामाजिक न्यायाची बूज राखणारी मार्गदर्शक तत्वे असतात याची आठवण न ठेवता तीन वेगवेगळ्या अतिक्रमकांना त्यांच्या जमिनीची कायदेशीर मालकी देणारे तीन आदेश निघालेत. रायसिखांना त्यांची अतिक्रमित जमिन सव्वा तीन एकरापेक्षा जास्त नसेल व अतिक्रमण एक जुलै चोपन्नच्या आधीचे असेल तर कायदेशीर मालक घोषित करणारा आदेश केवळ हतबुद्ध करणारा आहे. आदिवासी हे कुणी जमिनदार नव्हेत. ते अल्पभूधारक असल्याने त्यांच्या जमिनी सव्वा तीन एकराच्या आतच असणार. पण तोच त्यांचा अपराध ठरला. त्यांची सारीच्या सारी जमिन दाबून घेऊन त्यांना हाकलून देण्याची मुभा रायसिखांना मिळाली. प्रतिवर्षी असे आदेश निघत असतात. आदेशात लिहिलेल्या तारखांच्या आधीचे अतिक्रमण आहे. हे सिद्ध करणारा कागदोपत्री पुरावा तयार करून द्यायला तहसिलदार व सर्व कर्मचारी अतिशय उत्साहाने तयार असतात. लुटलेल्या जमिनीवर कायदेशीरपणाचा शिक्का ठेवला जातो.

एका निश्चित तारखेनंतर बुक्सा व थारू जमातीत मूल जन्माला येतांना ते पक्क्या घरात न जन्मता छोटया झोपडीत जन्मले तर तेही घेऊन जाण्याचा 'कायदेशिर अधिकार रायसिखांना देणारा आदेश मात्र सरकारी कर्मचाऱ्यांनी काढलेला नाही.

अशा बिकट परिस्थितीत इंदिराजींनी आपल्या निर्णयशक्तिची ताकद व तडफ दाखविली. विधि संशोधन अध्यादेश जारी झाला. अध्यादेश जारी होताच तराई क्षेत्रात युद्धमय परिस्थिती निर्माण झाली. आदिवासींची लुटलेली जमिन त्यांना परत करणारा स्पष्ट आदेश बिगर - आदिवासींना अनधिकृत ताब्याच्या जोरावर मालकी हक्क नाकारतो. तराई भागात या आदेशामुळे एकच आरडा ओरड सुरू झाली. आदिवासींना धमकी देण्याचे, मारहाण करून त्यांना नेपाळमध्ये परागंदा होण्यास भाग पाडण्याचे प्रयत्न सुरू झाले. पण या वेळेस गंगाकाठच्या सत्ताधारी ब्राम्हण वर्गाने आपली ताकद आदिवासींच्या बाजूने वापरण्यास सुरूवात केली.

विधी संशोधन अध्यादेशातील तरतूदींमुळे कोणत्याही पध्दतीने लुटलेली जमिन आदिवासींना परत देण्याची शक्यता लक्षात घेऊन अलाहाबाद - प्रयागच्या ब्राम्हण वर्गाने दिल्लीतून दबावाचे राजकारण सुरू केले व त्यामुळे राज्यशासनाला भूमि जोड मोहिमेची घोषणा करणे भाग पडले. उत्तर प्रदेशच्या राजकारणात ब्राम्हण - लॉबीला दुखावणे कोणत्याही पक्षाला परवडणारे नसते. भूमिजोड तथा चकबन्दी कार्यक्रमात अध्यादेशाच्या आधारावर आदिवासींना जमिनी परत देण्याची सुरूवात झाली. त्याबरोबर अनधिकृत कब्जेदारांनी 'उत्तर प्रदेश सरकार हजारो पंजाबी शेतक-यांना तराईतून हाकलून देत असल्याचा' आरोप केला. जत्थेदार संतोखसिंह यांनी आदोंलनाची धमकी दिली. पंजाबचे मुख्यामंत्री श्री. बरनाला यांनी देखील पंजाबी शेतकऱ्यांवर आलेल्या संकटाची (!) पाहणी करण्यासाठी अकाली दलाचे खासदार श्री. बलवन्तसिंह रामूवालिया आणि श्री. तेजसिंह दर्दी यांना नैनीताललला पाठविले. श्री. बरनाला यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री व केन्द्रीय गृहमंत्रीना याबाबत खलिते पाठविले. युद्धक्षेत्रात चकबन्दी विरोधी आन्दोलन करणाऱ्यांनी समिती स्थापन करून विरोध सुरू केला. केन्द्रीय मंत्री मंडळातल्या अनेकांना चकबन्दी विरोधकांनी स्टॅम्प पेपरवर खरेदी केल्याचे कागद दाखविले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री नारायण दत्त तिवारी यांचेवर विरोधकांनी प्रश्नांचा भडिमार केला तेंव्हा त्यांनी स्पष्ट सांगितले की, 'बुक्सा - थारु हेच मूल निवासी आहेत आणि चलाखीने खरेदी केलेली व लुटलेली जमिन त्यांना परत देण्याचा माझा दृढ संकल्प आहे.

आज १९८८-८९ मध्ये सर्व्हन्टर्स ऑफ इंडिया सोसायटीच्या बुक्सा छात्रावासातून शिकून बाहेर पडणारे आदिवासी युवक ठिकठिकाणी आढळू लागले आहेत. १० वी पास झाल्याने त्यांच्या पिढीला त्यांचेवर होणारा अन्याय नीट लक्षात येऊ शकतो. कोर्टात,

तहसिलदारांसमोर ते हिंमतीने उभे राहतात. बुक्सा मुली बालवाडी - शिक्षिका म्हणून वावरू लागल्या तेंव्हा अनेकांचे डोळे कौतुकाने व आश्चर्याने विस्फारले गेले. मात्र जीवनातले प्रत्यक्ष सत्य फार वेगळे व गुंतागुंतीचे असते. कोणत्याही शिक्षणाचा संबंध नसणाऱ्या आदिवासींच्या दोन पिढया ज्या जिद्दीने, 'आमची भूमी - आमची माता' या वृतीने आपल्या दु:खातून वाट काढत राहिले, ती वृत्ती व जिद्द या दोन्हीचा आदिवासींच्या शिक्षणयुक्त पिढीत आढळ होत नाही. अशिक्षित बुक्सा व थारू महिलांशी त्यांच्या शेतात चर्चा करतांना, त्यांचे मनोबळ आणि स्वत:चे संस्कृतीवरील प्रेम उत्कटतेने लक्षात आले. स्वत:च्या स्थितीचे वर्णन करतांना महाभारतातल्या कथांचे दाखले देत बोलण्याची त्यांची 'अर्थपूर्ण वाणी' ऐकतांना मन चकित झाले. संत मिराबाईचे अभंग त्यांच्या ओठांवर लिलया खेळत होते. स्वत:च्या दु:खाची कारणमिमांसाही त्या करू शकत होत्या. नव्या पिढीला हे सांस्कृतीक धन फारसे माहित नाही आणि सर्व समाजासाठी सर्वांनी प्रयत्न करण्यापेक्षा एकेकटयाने मिळेल ती नोकरी शोधणे त्यांना बरे वाटले. उद्या कदाचित त्यांना रोजगार मिळेलही पण तुलसी, मिराबाई जयदेव यानांच ते विसरून गेले तर भिषण आपत्तीतही मनोबळ देणारे हे 'संजीवक बोल' त्यांना नव्या दारिद्रयात उपलब्ध नसतील. जमिन शासनाने दिली तरी प्रत्येक समाजाला व व्यक्तिला आपली सांस्कृतीक मुळे स्वत:च विकसित करून पोषण मिळवावे लागते. नवी पिढी हे जाणेल कां? स्वत:ची सांस्कृतीक मुळे विकसित करून 'पिली कनेर' निरंतर ताजीतवानी राहील का? ✿

## खोटे आदिवासी कर्मचारी कसे पकडावे?

स. न. वि. वि.

मी स्वत: एक पारधी जमातीतील कर्मचारी आहे. आपले अंक मी नेहेमी वाचतो.

अमरावती जिल्हयात आदिवासी जमातीच्या सवलती मिळविण्याकरितां अनेक कर्मचाऱ्यांनी जमातीचे खोटे प्रमाणपत्र मिळविले आहे. ते त्या प्रमाणपत्राचे आधाराने शासकीय सेवेत रूजू झाले आहेत. यामुळे खऱ्या आदिवासींवर अन्याय होत आहे. अशा जाती पुढीलप्रमाणे आहेत. कोष्टी - हलबा, धनगर - धनवर, सोनार - ओतारी, वाणी - लींगपतवली राजपूत - भामटी राजपूत, धोबी - धोबी वगैरे. यांना कसे पकडावे? वरील सर्व बाबतीत मार्गदर्शन मिळावे.

आपला विश्वासू,
पी. एस. चव्हाण
शासकीय आश्रमशाळा, टेम्ब्रुसोडा
ता. चिखलदरा. जिल्हा - अमरावती,

---

## इतिहास जाणून घ्यायचा आहे.

स. न. वि. वि.

आपणांस कळविण्यांत अत्यानंद होतो की आपण प्रकाशित करीत असलेला हाकारा हे त्रैमासिक, भटक्या विमुक्त जनजातीच्या लोकांना त्यांच्या प्रबोधनाचे दृष्टीने आणि त्यांना संघटित करण्याचे दृष्टीने अतिशय उपयुक्त आहे.

आपणांस विनंती करण्यात येते की आम्ही पारधी समाज नागरिक विकास मंडळ राजूलवाडी तर्फे उनरेड जिल्हा - लातूर येथे स्थापन केले आहे. आम्हाला विशेषत: पारधी समाजाचा इतिहास जाणून घ्यायचा आहे. त्यातच विकासामधे पारधी व तत्सम जमातींची नांवे व उत्पत्ती या विषयी माहिती हवी आहे. ती आपण द्यावी.

आपला
पन्नालाल राजपूत
राजूलवाडी, जिल्हा-लातूर.

# वृत्त - विश्व

## आदिवासियों हेतु सीटो का पुनः निर्धारण होगा

नयी दिल्ली, ३ मई (प्रे.) । केन्द्र सरकार और त्रिपुरा नेशनल वालंटियर्स में हुए समझौते के अनुसार शासन में आदिवासियोंके योगदान को बढाने के लिए आज लोकसभा में संविधान के अनुच्छेद ३३२ में संशोधन करने के लिए विधेयक पेश किया गया।

गृह राज्यमंत्री श्री. संतोष मोहनदेव द्वारा पेश किये गये इस विधेयक में यह व्यवस्था की गई है की सन २००० में प्रस्ताविक जनगणना तक राज्य की विधानसभा में आदिवासियों की सुरक्षित सीटों के पुनः निर्धारण हेतु अस्थायी व्यवस्था की जाएगी और यह प्रावधान वर्तमान विधानसभा के भंग होने तक प्रभावी रहेगा।

### संविधान संशोधन विधेयक पेश

विधेयक के साथ इस संदर्भ में पेश वक्तव्य में कहा गया है कि संविधान में संशोधन करना इसलिए आवश्यक हो गया ताकि भारत सरकार और त्रिपुरा नेशनल वालंटियर्स के बीच हुए समझौता ज्ञापन को उसकी भावना के अनुरूप लागू किया जा सके। इस पर १२ सितम्बर को उभय पक्ष ने हस्ताक्षर किये थे ताकि अशांत राज्य में शांति और भाईचारा कायम हो सके।

इसी समझौते के अंतर्गत संविधान के अनुच्छेद ३३२ में संशोधन करने की व्यवस्था थी। पेश किये गये विधेयक में कहा गया है की त्रिपुरा विधानसभा में आदिवासियों के लिए जो स्थान वर्तमान में सुरक्षित है तथा विभिन्न वर्गों का जो प्रतिनिधित्व कायम है उसमें बिना किसी हेरफेर के आदिवासियों को प्रदेश की सरकार में अधिक भागीदारी के लिए उपयुक्त व्यवस्था की जाय। (दै. जागरण, वाराणसी. ४-३-८९, ४-५-८९)

## भिल्ल कुटुंबियांनी माहिती पाठवावी

पुणे - हिंदू धर्मात राम कृष्ण हे हिंदूधर्माचे भूषण मानले जाते. त्यात रामायणातील शबरी भिल्लीण व महाभारतातील एकलव्य यांच्यासह भिल्ल जमातीचा इतिहास आम्ही प्रसिद्ध करणार आहोत. तरी भिल्ल जमातीच्या प्रत्येक कुटुंबांनी आपल्या जमातीच्या चालीरिती, राहणीमान, व्यवसाय, कुटुंबांतील संख्या किती साक्षर व निरिक्षर किती शिवाय सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरांची सविस्तर माहिती खालील पत्त्यावर समिती प्रमुख श्री. के. के. निकम १०३ गांधी नगर, येरवडा, पुणे ४११००६ यांना कळवून सहकार्य करावे. (दै. संध्या. पुणे. दिनांक ३०-३-८९)

## आदिवासींच्या सैन्यभरतीसाठी सात जिल्ह्यांत केंद्रे उघडणार

मुंबई, ता. २१ - आदिवासींना सैन्यात मोठया प्रमाणावर संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून राज्यातील आदिवासी जिल्ह्यांत सात भरती केंद्रे सुरू केली जातील, असे त्या खात्याचे राज्यमंत्री मधुकर पिचड यांनी काल विधानसभेत जाहीर केले'.

आदिवासी विभागाच्या मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना श्री. पिचड म्हणाले, 'ही भरती - केंद्रे इगतपुरी (नाशिक), जव्हार (ठाणे), आरेगांव (पुणे), मेळघाट (अमरावती), देसानीगंज (गडचिरोली), राजूर (चंद्रपूर), किनवट (नांदेड) येथे स्थापण्यात येणार आहेत. नंदूरबार (धुळे) येथेही एक केंद्र असावे, ही सूचना स्वीकारली जाईल', असे त्यांनी सांगितले.

सुखदेव उईके, सुदाम देशमुख (कम्युनिस्ट), निशिकांत जोशी, म. ना. वरोरा (काँग्रेस), जीवा पांडू गावीत (मार्क्सवादी) आदींनी चर्चेत भाग घेतला.

राज्यातील आदिवासींकडे असलेली दोन कोटी ४७ लाख रूपयांची खावटी कर्जे माफ करण्यात आली असून, येत्या जूनपासून गरजू आदिवासींना खावटी कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी तीन कोटी रूपये राखून ठेवल्याचे पिचड यांनी सागितले. 'आदिवासी विकास महामंडळातील गैरव्यवहार' व अपहार प्रकरणी जे दोषी असतील त्यांच्यावर कठोर कारवाई केली.
(सकाळ २२-४-१९८९)

## गडचिरोलीच्या विकासासाठी अनेक सरकारी अटी शिथील

गडचिरोली : दि. १५ - गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी राबविण्यात येणारे विशेष कृती कार्यक्रम जलद गतीने अमलात आणण्यासाठी राज्य सरकारने काही धोरणात्मक निर्णय घेतले असून आवश्यक त्या अटी शिथील करण्यात आल्या आहेत.

राज्याचे मुख्य सचिव द. म. सुकथनकर यांनी नुकताच गडचिरोली जिल्ह्याचा दौरा करून विविध खात्यांच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. जिल्ह्याचा दौरा करून विविध खात्यांच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. नक्षलवाद्यांचा प्रभाव कमी करण्यासाठी राज्य सरकारने महत्वाचे निर्णय घेतले असून त्याची कोणत्याही परिस्थितीत वेगाने अमंलबजावणी झाली पाहिजे, असा आदेश त्यांनी यावेळी दिला. यावेळी अर्थ खात्याचे सचिव डॉ. गोडबोले, नियोजन सचिव वसाक, विभागीय आयुक्त अजित वर्टी, जिल्हाधिकारी ए. एम. खान, आदिवासी विकास आयुक्त झावरे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पांडे तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्य सचिवांनी यावेळी जिल्ह्यातील आदिवासींशी चर्चा करून त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या. आदिवासींना असलेले जंगल संपत्तीचा हक्क आणि पाणी हे या भागातील महत्वाचे प्रश्न असल्याने त्याला सरकारने अग्रक्रम द्यावा, अशी विनंती श्री. सुकथनकर यांना करण्यात आली. या व्यतिरिक्त आदिवासींच्या इतर काही मागण्यांकडे मुख्य सचिवांचे लक्ष वेधण्यात आले.

जिल्ह्यातील विकास योजनांत वीज, पाणी, प्राथमिक शिक्षण, कृषी आणि फलोद्यान यांना विशेष स्थान देण्यात आले आहे. या योजना वेगाने राबवून त्याचा फायदा आदिवासींपर्यंत लवकरात लवकर पोचविला पाहिजे असे मत श्री. सुकथनकर यांनी अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेच्या वेळी सांगितले.

(महाराष्ट्र टाईम्स. १६-४-८९)

## बोडोंचे आदोंलन आणखी २ जिल्हयांत पसरले

गुवाहाठी, दि. २४ (प्रे.ट्र.) - अखिल बोडो विद्यार्थी संघटनेचे (उपेंद्र ब्रम्हा गट) कोकराझार, उदलगुडी या बोडोंचे वर्चस्व असलेल्या भागात केंद्रित असलेले आंदोलन आता लगतच्या नलबारी व बारपेटा जिल्ह्यात पसरू लागले आहे.

आसाम विधानसभेचे अध्यक्ष पुलकेश बारूआ यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय सदिच्छा शिष्टमंडळाने शुक्रवारी अतिरेक्यांच्या हिंसक कारवायांचा फटका बसलेल्या भागाची प्रत्यक्ष पाहणी केली. बोडोंच्या आदोंलनात गेल्या महिनाभरातच या भागात १० जण ठार झाले असून लाखो रूपयांची मालमत्ता नष्ट झाली आहे.

प्लेन्स ट्रायबल्स कौन्सिल ऑफ आसाम या संघटनेच्या पाठिराख्यांची तसेच आदिवासींची घरे ओस पडलेली असल्याचे या शिष्टमंडाळासोबत असलेल्या पत्रकारांना आढळून आले. जे लोक घरात होते, त्यांनी घराबाहेर न पडणेच पसंत केले.

प्लेन्स ट्रायबल्स कौन्सिल ऑफ आसाम या संघटनेच्या कार्यकर्त्यांवर अखिल बोडो विद्यार्थी संघटनेमध्ये सामील होण्याची सक्ती करण्यांत येत आहे, असे काही लोकांनी सांगितले.

आसामच्या बारपेटा जिल्ह्यातील चलचाली भागाला व नलबारी जिल्ह्यातील पद्मपारा भागाला आदोलंनाचा सर्वाधिक फटका बसलेला आहे.

चलचालीमधील सात गांवावर २१ मे रोजी सुमारे ८० बोडो अतिरेक्यांनी हल्ला करून अनेक घरे जाळली. एकूण २२७ कुटुंबियांना याचा फटका बसला असून आता ही कुंटुबे सरकारने उभारलेल्या मदतछावण्यांमध्ये राहात आहेत. या आपद्ग्रस्तांच्या मदतीसाठी ५६,७५० रूपये खर्च केल्याचे सरकारी अधिकाऱ्यांनी सांगितले.

अतिरेक्यांच्या दहशतीमुळे गावकऱ्यांना स्वत:ची रोजची कामेदेखील करता येत नसल्याचे प्रवीण ब्रम्हा नावाच्या एका शिक्षकाने सांगितले.

नलबारी जिल्ह्याच्या पद्मपारा भागातही बोडोंनी दहशत निर्माण केली आहे. या भागातील आदिवासी हे प्लेन्स ट्रायबल्स कौन्सिल ऑफ आसाम या संघटनेचेच

समर्थक आहेत. परंतु बोडोंच्या बंदुका आणि बॉम्बपुढे ते असहाय्य असल्याचे सुनंदा दास नावाच्या शिक्षकाने सांगितले.

याच जिल्ह्यातील निकाशी येथे बोडो अतिरेक्यांनी ७ मे रोजी जाळलेल्या चार बसचे सांगाडे पत्रकारांना पाहायला मिळाले. तर जवळच्याच सुवानकाटा गावात आणखी तीन बसचे सांगाडे आढळून आले.
(महाराष्ट्र टाईम्स दि. २५ जून १९८९)

## जमातीची पाचशे प्रमाणपत्रे बनावट

मुंबई,- (विशेष प्रतिनिधी) - नागपूर जिल्ह्यातील ५०० आदिवासी विद्यार्थ्यांनी जातीची व उत्पन्नाची प्रमाणपत्रे बनावट दिल्याचे तपासात स्पष्ट झाल्याने गेली दोन वर्षे त्यांना शिष्यवृत्ती देण्यात आलेली नाही, असे स्वरूपसिंग नाईक यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

आमदार डॉ. श्रावण पराते यांनी यासंबंधात प्रश्न विचारला होता. नागपूर आदिवासी विकास अधिकाऱ्यांनी शिष्यवृत्ती अजून दिली नाही हे खरे आहे, असेही मंत्र्यांनी सांगितले. आमदार चंद्रकांत गोसालीया (कांदीवली), सी.डी. उमाचन यांच्या प्रश्नास उत्तर देताना ग्रामविकास मंत्री शिवाजीराव देशमुख यांनी सांगितले की, परभणी जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यात उर्ध्व पैनगंगा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन कामामध्ये गैरव्यवहार झालेला आहे. जबाबदार अधिकाऱ्यांना काही शिक्षा दिल्या आहेत.
(दै. लोकमत; नागपूर दि. ६ एप्रिल ८९)

## आदिवासींचा घांस ओढणारी गिधाडे

महाराष्ट्र शासन आपल्या राज्यातील आदीवासी, अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या विकासासाठी लाखो करोडो ची योजना हाती घेवून त्या राबविण्याचा प्रयत्न शासन करीत असते परंतू ह्या सर्व प्रकारच्या योजना राबविणारी यन्त्रणा जर भ्रष्ट असली तर त्या योजनांची कडे नजर ठेवून प्रचन्ड लूट कशी करण्यात येते हे बागलाण, कळवण, इगतपूरी तालुक्यात चक्कर मारल्यावर एक एक किस्सा समोर येईल.

एप्रिल मे १९८६ मध्ये जिल्हा आदिवासी उपाय योजणे अन्तर्गत अल्पभूधारक शेतकऱ्यांना मोफत निविष्ठा (खते आणि बी - बियाणें) बैल जोडया व गाडया साठी तशीच शेतीची अवजारे पण ५० टक्के अनूदान व जास्तीत जास्त रूपये २००० पर्यन्त अनूदान देण्यासाठी प्रत्येक तालुक्याला किमान १५ ते १६ लाख रूपयें वाटण्यांत आले आहेत अल्पभूधारक आदिवासी शेतकऱ्यांना मोफत निविष्ठा व बैल जोडयासाठी पात्र असलेल्या शेतकऱ्यांच्या अर्जाची एकत्रीत यादी गट विकास अधिकाऱ्यांच्या अखत्यारीत काम करणाऱ्या विस्तार अधिकारी कृषी यांनी गटविकास अधिकाऱ्या मार्फत जिल्ह्याच्या कृषी विकास अधिकाऱ्यांकडे पाठवून कृषी विकास अधिकाऱ्यांनी त्यांची छाननी करून योग्य त्या पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या यादीला मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नासिक यांची मंजूरी घेवून ती यादी कृषी विकास अधिकाऱ्यांनी संबंधित गटविकास अधिकाऱ्यांना पाठविली पाहीजे. संबंधीत गटविकास अधिकाऱ्यांनी त्या यादीनूसार शेतकी अधिकांऱ्या मार्फत यादीतील लाभार्थींना लाभ दिला पाहिजे हा झाला साधा आणि सरळ नियम परंतु ह्या ठिकाणची यन्त्रणा स्वार्थाकडे नजर ठेवूनच काम करीत असल्याने संबंधीत लाभार्थींना या योजनेंचा फायदा मिळू शकत नाही. आता प्रत्येक जिल्ह्याला मिळालेले हे १५ - १६ लाख रूपयाचे वाटप जिल्हा कृषी विकास अधिकाऱ्यांनी बागलाण, कळवण, इगतपुरी, नासिक एवढंच नाही तर जवळ जवळ सर्वच तालुक्यामध्ये दोन अडीच लाख रूपयाचे अशिक्षित अज्ञानी शेतकऱ्यांना मिळाले नाहीत या योजनेंची ही माहिती तेथील अज्ञान व अशिक्षित आदिवासींना नाही आणि खरी माहिती त्या शेतकऱ्यांना होवू नये याचीही खबरदारी ह्या लुच्च्या अधिकाऱ्यांनी घेतली आहे. तेथील कृषी विकास अधिकारी अत्यंत चाणाक्ष आहेत त्यांनी अतिशय चलाख पद्धतीने खोटी कागदपत्रे तयार करून कागदोपत्री बोगस अन्गठे व सह्या करून बिनडोक अधिकाऱ्यांनी करून स्वत:च्या खिशात हजारो रूपये टाकले शेकडो बोगस नावे दाखवून खोटया सह्या करून रेकॉर्ड तयार करण्यात आले आहे. याबाबत इगतपुरी तालुक्यातील कळवण बागलाण तालुक्यातील बोगस नांवे आम्ही मागे जाहीर केली होती अनेक शेतकऱ्यांच्या नावाने बोगस रेकॉर्ड तयार करून प्रचंड लूट करण्यांत आली आहे. यात कळवण तालुक्यातील गटविकास

अधिकारी इगतपुरी तालुक्याचे सूरगाणा पेठ तालुक्यातील गटविकास अधिकारी तसेच पंचायत समितिच्या काही कारकुनांचा देखील यात सहभाग असुन बि. डी. ओ. ची पंचायत समितीतले काही कारकुन उगाचच हूजरेगिरी करत असतात व त्यांना खूष ठेवण्याचा प्रयत्न करित असतात म्हणून अशी बनावट प्रकरणे करून आदिवसी शेतकऱ्यांची फसवणूक करून त्यांच्या घशातून घास काढण्याचा निच प्रकार येथील यन्त्रणेने केला आहे. या बाबत जिल्ह्याचे कृषी विकास अधिकाऱ्यांनी देखील काहीही तपासणी केल्याचे दिसून येत नाही. या बाबत अत्यंत कठोरपणे पाऊल उचलणें भाग आहे. असे प्रकार थोडयाफार प्रमाणात सर्वच तालुक्यात सर्रासपणे झाले आहेत त्यांची अत्यंत खोलवर चौकशी करून संबंधित लाभार्थींच्या पत्त्यावर जावुन त्यांचे जबाब घेणे आवश्यक आहे म्हणजे सत्य परिस्थिती काय आहे ती उजेडात आल्या वाचून रहाणार नाही तालुक्यातील पंचायत समिति मध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बिल न बुद्धीपु स्कर विलम्ब करून तेथल्या कर्मचाऱ्यांचे आर्थिक दमन करण्यात येते हा विलम्ब कशासाठी असावा बरं? तर समजलं ना! दामकरी काम ह्या मंत्र्याच्या प्रभावाने त्यांना एवढं मंत्रमूग्ध केले आहे कि त्या शिवाय तेथे कोणतेच काम होत नाही तेथले बि. डी. ओ. फक्त ठराविक कर्मचाऱ्यांना हाताशी धरून व्यवस्थापनात गुंग असल्याची जोरदार चर्चा या परीसरात आहे. म्हणूनच तर बियाणे खते बैल - जोडया आदि क्षेत्रातल्या भ्रष्टाचाराशिवाय आदिवासींच्या घरात लाईट शेतीची अवजारे आदि क्षेत्रातला भ्रष्टाचार करण्यात आला खरीप आणि रब्बी १९८५ - ८६ मध्ये पिकांचे नूकसान झालेल्या अल्प अत्यंत भूधारक शेतकऱ्यांना खरीप ८६ मध्ये पिके घेण्यासाठी मदत म्हणून मोफत बियाणे खते पुरविण्याची योजना शासनाने हाती घेतली या योजनेनूसार बियाण्याची पिशवी न फोडता बियाण्याचे मोफत वाटप करावयाचे असून एका शेतकऱ्यास एकाच प्रकारचे बियाणे दिले गेले पाहिजे हे बियाणे बियाणे महामंडळाकडून घेवून ५ जुलै ८६ च्या आत कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांना वाटलेच गेले पाहिजे होते. असे शासनाकडून कळविण्यात आले! होते त्याप्रमाणे जिल्ह्यातील तालुक्यांना बाजरी; ज्वारी; भात, हरबरा, इत्यादी शासनाकडून पुरविण्यात आले ह्या बियाणें खरेदीत ही फार मोठा घोळ झाल्याचेही वृत्त आहे. त्या वाटपातही दाम करी काम पद्धतीने वाटप केले आहे. अशा तक्रारी आमच्याकडे आल्या आहेत जिल्ह्याच्या कृषी विकास अधिकाऱ्यांनी याबाबत दखल घ्यावी अन्यथा ह्या भोंगळ कारभाराचा साग्र संगित तमाशा म. संचालक कृषी विभाग पुणे यांच्या पुढे सादर करावा लागेल.

(सा.पोलखोल दि. १०-८-८८)

## आदिवासींसाठीची आर्थिक तरतूद वाढविण्याचा विचार

नासिक, दि. ३१ - आदिवासींच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने आदिवासी विभागातील विकास कामे व कल्याणकारी योजनांवरील आर्थिक तरतूद वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे महाराष्ट्राचे मुख्य सचिव द. म. सुकथनकर यांनी येथे सांगितले.

नासिक महसूल विभागातील विभागीय पातळीवरील अधिकाऱ्यांच्या बैठकीत वीस कलमी कार्यक्रम, वनीकरण, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, आरोग्य, ग्रामीण विद्युतपुरवठा, आदिवासी विकास, कायदा व सुव्यवस्था, आगामी कुंभमेळा आदी महत्वाच्या कामांचा आढावा घेण्यासाठी भरलेल्या बैठकीत त्यांनी ही माहिति दिली.

राज्याच्या आर्थिक तरतुदीपैकी केवळ नऊ टक्के रकम आदिवासी विकासावर खर्च होते. ती रकम वाढविण्यासाठी शासन पुढाकार घेईल, असे श्री. सुकथनकर यांनी आश्वासन दिले.

(महाराष्ट्र टाईम्स, २ एप्रिल १९८९)

# साद - प्रतिसाद

## सवलती अपहरण अंकाचे स्वागत व अभि:नंदन

स्वातंत्र्या मिळाल्यावर पाव शतक उलटल्यावर घटना ·संसदेने मागास व अनुसूचित जमातींसाठी राखून ठेवलेल्या राखीव जागा, प्रतिनिधित्व वगैरे सवलती ४० वर्षानंतर संपुष्टात याव्या अशी त्यावेळची परिस्थिती होती. परंतु निरक्षरता आणि स्वार्थी नेतृत्व यामुळे चाळीस वर्षाची मुदत तर अत्यंत अपुरी वाटू लागली आहे. एवढेच नव्हे तर स्वातंत्र्यपूर्व कालीन जागृती व एकी यांचे दृष्टीने विचार करता, त्याही काळाच्या मागे आपण जाऊन ठेपलोत की काय अशीच दाट शंका वाटू लागल्यास नवल नाही.

अशा परिस्थितीत तातडीने आणि ठामपणे पाउले उचलणे भाग आहे, अशा जाणिवेने नवीन तरतूदी कायद्यात करण्याची स्तुत्य वाटचाल सुरू झाली. पण अशा तऱ्हेच्या सवलती आदिम जातींसाठी उपलब्ध होताच एक विचित्र परिस्थिती निर्माण झाली. पूर्वी एखाद्याला तू मागासलेला आहेस अस म्हटल्यास आपल्याला शिवी दिल्यासारखे त्या व्यक्तिला वाटे व आपण कसे सुधारलेलो, पुढारलेलो आहोत हे दाखविण्याचा त्याचा प्रयत्न सुरू होई. आता उलट मागास म्हणून घेण्याचे फायदे नजरेसमोर आल्याबरोबर इतरांपेक्षा आपण कसे जास्त मागासलेलो आहोत हे दाखविण्याची स्पर्धा सुरू झाली. अशा विचित्र स्पर्धेचा फटका खऱ्या आदिवासींना बसत आहे. तेंव्हा त्यांच्यात परिस्थितीची जाणीव निर्माण करून देण्याचे कार्य हाकाराने ( जानेवारी - मार्च १९८८ च्या सवलती अपहरण अकांने ) केले आहे. सवलती अपहरणाविरूद्धची मोहीम योग्य मार्गाने होण्यासाठी, खऱ्या आदिवासीत आत्मविश्वास निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्या संदर्भात या अंकाचे स्वागत होणे आवश्यक आहे.

कोणत्याही अडचणी व अन्याय दूर होण्यासाठी आपल्याला [illegible] व कायदा याबाबतीत काय संरक्षण म[illegible] माहिती आवश्यक आहे. या अकांत [illegible]चे निर्णय यांची व्यवस्थित [illegible] माहितीचा उपयोग आदिवासी व्यक्तिंना व त्यांना मदत करणाऱ्या कार्यकर्त्यांना जरूर होईल. विशिष्ट जमातींसाठी असलेल्या सवलतींचा फायदा उठविण्यासाठी स्वार्थी लोकांकडून जो भ्रष्टाचाराचा अवलंब केला जातो व बोगस प्रमाणपत्रे कशी तयार होतात, त्यात दबाव यंत्र व राजकीय शक्ती यांचा कसा हातभार लागतो, याची कार्यकर्त्यांना असलेली जाणीव 'बनावट आदिवासी व बोगस प्रमाणपत्रे' आणि 'सवलती लाटणाऱ्या टोळ्या ' या लेखांवरून लक्षांत येते. या सर्व प्रकारांची शासनाने अत्यंत गंभीरपणे दखल घेऊन कडक कारवाई करण्याचे धाडस ( कोणत्याही दबावाला बळी न पडता ) केल्याखेरीज सवलतींचा फायदा भलत्याच लोकांना होण्याचा धोका आहे.

ग्रामीण व आदिवासी विश्वाची बोली, चालीरीती, कला, साहित्य यांचाही परिचय सातत्याने करून देण्याचा हाकाराचा मानस अभिनंदनीय आहे. राजी किरात ही जमात नष्ट होण्याच्या मार्गात असल्याचा इशारा प्रा. मानस स्वामी यांनी दिला आहे. हा एक विशेष महत्वाचा व चर्चेचा मुद्दा आहे. राजी किरातांची वैशिष्टयपूर्ण अशी संस्कृती, साहित्य, कला यांचे योग्य प्रकारे जतन करण्याचे प्रयत्न नष्ट होऊ पाहणाऱ्या पशुप्राण्यांचे जतन एखाद्या प्राणीसंग्रहालयात करावे त्याप्रमाणे न करता त्या अलिप्ततेतून त्यांना दूर करून आधुनिक जगाच्या मोठया प्रवाहात सामावून घेतले पाहिजे. त्या सुविधांपासून त्यांना वंचित ठेवता कामा नये.

याच अकांतील साहित्यीक भागातील " नर्मदेशी बातचित' आणि प्रत्यक्ष घटनेतून उगम पावलेल्या वाहत्या पाण्याचा " दाहक अनुभव हा केवळ नागरी जीवनाचाच परिचय असणाऱ्यांना वेगळ्या वास्तवाची तीव्रपणे जाणीव करून देणारा ठरेल.

सामाजिक जाणिव नवीन पिढीत निर्माण करणे व कार्यकर्त्यांचा गट तयार करणे, त्यांना मार्गदर्शन करणे, वैचारीक देवाण घेवाण करणे अशा सर्व गोष्टी प्रत्यक्षात आणण्यासाठी सुद्धा 'हाकारा' व 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' फार मोठा हातभार लावील अशी खात्री हाकाराचे या अकांने दिली आहे. परिषदेच्या सर्व कार्यकर्त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

प्रा. सौ. नलिनीताई तारळेकर
( संस्थापिका अध्यक्ष, पुणे विद्यापीठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना. )

# साहाय्यासाठी सामाजिक संस्थेची विनंती

स्वांतत्र्योत्तर कालावधीत भारताने अनेक क्षेत्रात ' अग्री - झेप ' घेतली असली तरी आदिवासींसारख्या अविकसित व उपेक्षित समाजाचे संदर्भात आणि पिण्याचे पाण्यासारख्या मुलभूत गरजांचे संदर्भात अद्यापही बरेच कार्य करण्याची आवश्यकता आहे. १९४७ चे आधी सर्व दोषांचे खापर ब्रिटिश राजवटीवर फोडण्यात येत असे. या सवयीचाच विस्तार म्हणून आजही प्रत्येक बाबतीत शासनाचे तोंडाकडे पाहण्याची प्रवृत्ती निर्माण झालेली दिसते. समाजातील व्यक्तिंचे बुद्धिमान जीवन, जिद्दीने केलेले सांघीक प्रयत्न आणि त्यांचा उत्साहपूर्ण सहभाग यावरच समाजाची चौफेर प्रगती अवलंबून असते. सातत्याने दुसऱ्याच्या मेहेरबानीवर अवलंबून राहील्याने व शासकीय मदतीकडे आशाळभूतपणे पाहील्याने शेवटी शैथील्य, क्रियाशून्यता आणि परिस्थिती शरणता निर्माण होते. याउलट स्वत:च्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये कार्यक्षमतेने पूर्ण करण्यातूनच विकसीत व जबाबदार नागरिकत्व निर्माण होईल.

या क्रियाशील सहभागीत्वाच्या जबाबदारीचे जाणीवेतून आणि एक स्वस्थ, आत्मनिर्भर समाज निर्माण करण्याच्या ईच्छेने ह्युमन रिसोर्सेस ॲन्ड रूरल डेव्हलपमेन्ट सेन्टरची स्थापना झाली आहे. सेन्टरच्या कार्यकर्त्यांनी गेली तीन वर्षे अल्प प्रमाणात आदिवासी व ग्रामिण जनसमूहांसाठी मुलभूत गरजांची पूर्ती करण्याचे कामास प्रारंभ केला आहे. सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट व ट्रस्ट ॲक्टनूसार सेन्टरला रजिस्टर्ड संस्थेची शासकीय प्रमाणता प्राप्त केली आहेच. वडगांव मावळ ( पुणे ) आणि कर्जत व खालापूर ( जिल्हा - रायगड ) या भागात सेन्टरने अपंग - मेळावे, बालवाडी शिक्षिकांचे प्रशिक्षण, व्यवसाय - शिक्षण, स्त्रीयांना - बालकांना वैद्यकीय साहाय्यता, पौढ शिक्षण अशा विविध कामांना प्रारंभ केला आहे. आपल्या जिद्दीने तरूण कार्यकर्त्यांनी स्थानिक लोकांचा विश्वास संपादन करून जिव्हाळ्याचे संबंध निर्माण केले आहेत.

तरूणांचाही हार्ड सेन्टरच्या कामाला उत्तम प्रतिसाद मिळत असून त्यांचा क्रियाशील गट स्थापन करणे शक्य झाले आहे. पण त्यांना सतत कार्यरत राखण्यासाठी एका सुव्यवस्थित कार्यालयाची व काही किमान साधनांची ( उदा : सायकली ) गरज निर्माण झाली आहे. जे ग्रामीण तरूण या कामांसाठी पूर्ण समय देतात, त्यांच्या उदरनिर्वाहाची किमान सोय करणे जरूरीचे झाले आहे. त्याशिवाय काम करणे त्यांना अशक्य होईल. म्हणून या साठी काही प्रमाणात आस्थापना - निधी उभारण्याची गरज आहे.

या कामाचे महत्व समजू शकणाऱ्या आपणासारख्या सामाजिक जाणिव असलेल्या सुशिक्षित व्यक्ति आर्थिक साहाय्यासाठी व हरतऱ्हेचे पाठबळ देण्यासाठी पुढे येतील, अशी आशा आम्ही बाळगून आहोत. उपेक्षित समाजात व दुर्गम क्षेत्रांत चालणाऱ्या या कामासाठी प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष संबंधित असणाऱ्या व्यक्तिंची संख्या जेवढी जास्त, तेवढा सहभागीत्वाचा दर्जा उंचावेल व कार्याचे रिझल्टस्ही अधिक फलदायी असणार आहे. यासाठी सेन्टरचे कामाला आपण साहाय्यभूत व्हावे अशी आपणांस तळमळीची विनंती आहे.

आर्थिक साहाय्याप्रमाणेच आपण थोडा समय देऊ शकलात आणि प्रत्यक्ष फिल्ड - वर्कमध्येही आपल्या सक्षमतेचा लाभ दिलात तर संस्था आपली ऋणी राहील.

कृपया निधी व सपर्कासाठी पुढील पत्त्याचा उपयोग करावा.

हार्ड सेन्टर. द्वारा :- प्रा. तारळेकर. सरस्वती सोसायटी, म्हसोबा गेटजवळ, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४.

(पान २७ वरून)

भाषा, संस्कृती, कूळ, गण, सगा, देवदैवते गोंडांचीच आहेत. बडादेव, बुरादेव, माता ही त्यांची दैवते आहेत. गोंड माना जमातीची भाषा गोंडी आहे.

गोंड माना या जमातीच्या नावावर माना, मानी, माने (कुणबी) बडवाईक माना, खाद माना, क्षत्रिय माना, कुणबाऊ जातीचे लोक जातीची प्रमाणपत्रे मिळवितात.

माना ही शेतीप्रधान स्वतंत्र जात आहे. ही जात चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, जिल्ह्यात प्रामुख्याने आढळते. विदर्भातील अन्य जिल्ह्यातही ती अल्पशी आढळते. गोंडाचे राज्य येण्यापूर्वी माना लोकांनी दोन शतके राज्य केले. ह्या लोकांचा मुख्य धंदा शेती व शेतमजुरी हा आहे. पूर्वीच्या काळी ते पिकांचे संरक्षण करणे, ग्रामसंरक्षण करणे, ही कामे करीत असत. सुराजगड व माणिकगड पहाडी भागांत त्यांची राज्ये होती. पुढे गोंड राजांनी त्यांचा पराभव केल्यानंतर अनेक माना लोक गोंड राजांच्या सैन्यात दाखल झाले. माना राजांची **माणक्य देवी** ही कुलदैवता होती माना जातीला, मानी, माने ही समान अर्थी नावे आहेत. त्यांच्यात **बडकई** माना, खादमाना हे दोन मुख्य भेद आहेत. त्यांच्यातील काही लोक क्षत्रिय परंपरेने क्षत्रिय माना, तर काही शेतीपरंपरेमुळे कुणबी माना म्हणवून घेतात माना जातीत गोत्र नाहीत. माणका देवी, नारायण देव, डोंगरदेवी ही त्यांची दैवते आहेत. माना पंचायतीच्या प्रमुखांना शेंडे असे म्हणतात. माना जात मराठी भाषिक आहे. गोंड माना ही अनुसूचित जमात व माना ही जात, हे सामाजिक दृष्टया वेगळे गट आहेत.

# जमिनीचा ताबा मागणाऱ्या आदिवासी महिलांवर अत्याचार

**धुळे** : (आमच्या वार्ताहराकडून) - जमिनीच्या ताब्यासंबंधी न्यायालयाने आदिवासींच्या बाजूने निकाल दिल्या नंतर जमिनीचा ताबा घेण्यासाठी गेलेल्या महिलांवर पोलिसांनी अत्याचार केल्याची तक्रार करण्यात आली आहे. सामाजिक कार्यकर्त्यांच्या एका शिष्टमंडळाने जिल्हा पोलिस अधिक्षक श्री. पवार यांना लेखी निवेदन सादर करून आदिवासी स्त्रीयांची नांवे, विंटबना करणाऱ्यांची नांवे व घटनांचा तपशील सादर केला आहे. या प्रकरणी अक्कलकुआ येथील पोलिस सब-इन्स्पेक्टर व त्यांचे, साथीदारांना निलंबित करून त्यांचेवर खटला भरण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणी दोषी व्यक्तींवर कारवाई करण्याचे आश्वासन पोलीस अधिक्षकांनी दिले.

(महाराष्ट्र टाईम्स. मुंबई. दिनांक १७ जुलै १९८९.)



# योजनेच्या लाभासाठी संपर्क कुठे साधाल ?

शासनातर्फे आदिवासींसाठी विविध योजना राबविल्या जातात. तथापि बऱ्याच वेळी आदिवासींना याबाबत कोठे संपर्क साधावा याची माहिती नसते. आदिवासींनी विविध योजनांसंबंधी कोणाशी संपर्क साधावा याची माहिती पुढे दिली आहे.

| अनुक्रमांक | योजनेचे नांव | संबंधित कार्यालय |
|---|---|---|
| १. | शासकीय आदिवासी-वसतीगृहात प्रवेश | जिल्हा आदिवासी विकास अधिकारी |
| २. | भारत सरकारच्या माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षोत्तर शिष्यवृत्त्या. (महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्त्या) | जिल्हा आदिवासी विकास अधिकारी |
| ३. | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतने. | समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद. |
| ४. | विद्यार्थ्यांना वित्तीय सहाय्य<br>वैद्यकीय विद्यार्थ्यांना सहाय्य | संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ |
| ५. | शिक्षण फी, परीक्षा फी, व अन्य शिष्यवृत्त्या | समाजकल्याण अधिकारी. जिल्हा परिषद. |
| ६. | वसतिगृहासाठी स्वंयस्फूर्त संस्थांना वित्तीय सहाय्य | समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद. |
| ७. | शासकीय आश्रमशाळेत प्रवेश मिळविणे. | आदिवासी विकास अधिकारी व आश्रमशाळा प्रमुखांकडे अर्ज करणे जरूरीचे आहे. |
| ८. | आदिवासी भागातील व अन्य आय. टी. आय. मध्ये प्रवेश. | औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे प्राचार्य. जाहीर केलेल्या मुदतीत अर्ज करावा लागतो. |
| ९. | शासकीय व खाजगी आश्रमशाळा उघडणे | संचालक, आदिवासी विकास आदिवासी विकास भवन. महाराष्ट्र राज्य. नाशिक. |
| १०. | स्वंयस्फूर्त खाजगी आश्रमशाळांना अनुदान देणे | संचालक आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य. नासिक. |
| ११. | पुस्तकपेढी व शैक्षणीक शिष्यवृत्ती | शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद. |

| | | |
|---|---|---|
| १२. | सैनिकी शाळांमधे प्रवेश, फी माफी व शिष्यवृत्ती. | प्राचार्य, सैनिकी शाळा, सातारा, पुणे, नाशिक. |
| १३. | नोकरीसाठी नांवनोंदणी | जिल्हा सेवायोजन कार्यालय व आदिवासी विकास अधिकारी, उप-प्रादेशिक अधिकारी, आदिवासी विकास महामंडळ, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, संचालक, समाजकल्याण. पुणे. |
| १४. | फक्त आदिवासींना विद्युतपंप-संच | आदिवासी विकास अधिकारी. |
| १५. | खावटी कर्ज पुरवठा | आदिवासी सहकारी सोसायटी व आदिवासी विकास महामंडळाचे कार्यालय. |
| १६. | तेल इंजिनाचा संच पुरविणे | आदिवासी विकास अधिकारी. |
| १७. | जोड व्यवसाय, उद्योगधंदे व उद्योगधंद्याना मदत | प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प व जिल्हा प्रकल्प अधिकारी, एकात्मीक ग्रामीण विकास प्रकल्प. |
| १८. | न्युक्लिअस बजेटखालील योजना | प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी व उप-प्रादेशीक अधिकारी, आदिवासी विकास महामंडळ. |
| १९. | वीज पुरवठा | महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची शाखा. |
| २०. | गोबर-गॅस | गटविकास अधिकारी, पंचायत समिती. आणि खादी ग्रामोद्योग मंडळ. |
| २१. | ग्रामीण विकास बँक कर्जासाठी अर्ज- | बँकेंची संबंधित जिल्हा किंवा तालुका शाखा. |

# सूची


| | |
|---|---|
| अंक पहिला : जानेवारी-मार्च | १९८० - जबरन जोत जंगल जमीन |
| अंक दुसरा : एप्रिल-जून | १९८० - आदिवासी व शिक्षण |
| अंक तिसरा : जुलै-संप्टेबर | १९८० - आदिवासी व वनसंवर्धन |
| अंक चौथा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८० - आदिवासी साहित्य व कला |
| अंक पाचवा : जानेवारी-मार्च | १९८१ - दलितांना सवलती व राखीव जागा माहिती |
| अंक सहावा : एप्रिल-जून | १९८१ - आदिवासी व आरोग्य |
| अंक सातवा : जुलै-सप्टेंबर | १९८१ - वनशेती व संवर्धन |
| अंक आठवा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८१ - रोजगार हमी योजना |
| अंक नववा : जानेवारी-मार्च | १९८२ - उत्तरा खंड अभ्यास मोहीम |
| अंक दहावा : एप्रिल-जून | १९८२ - धरणे व विकास |
| अंक अकरा-बारा : जुलै-डिसेंबर | १९८२ - जंगल व्यवस्थापन |
| अंक तेरावा : जानेवारी-मार्च | १९८३ - आदिवासी व दारू |
| अंक चौदावा : एप्रिल-जून | १९८३ - आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी |
| अंक पंधरावा : जुलै-सप्टेंबर | १९८३ - प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य |
| अंक सोळावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८३ - आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न |
| अंक सतरा-अठरा : जानेवारी-जून | १९८४ - आदिवासीमधील स्वंयसेवी कार्य |
| अंक एकोणिसावा : जुलै-सप्टेंबर | १९८४ - आदिवासी स्त्री |
| अंक विसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८४ - आदिवासींचे आरोग्य व शिक्षण |
| अंक एकविसावा : जानेवारी-मार्च | १९८५ - आदिवासी संघटन |
| अंक बाविसावा : एप्रिल-जून | १९८५ - जमीन हस्तांतर |
| अंक तेविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८५ - आदिवासी महिला |
| अंक चोविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८५ - आदिवासी व सरकार |
| अंक पंचविसावा : जानेवारी-मार्च | १९८६ - जंगल व धरण |
| अंक सव्विसावा : एप्रिल-जून | १९८६ - आदिवासी कला |
| अंक सत्ताविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८६ - आदिवासी व वेठबिगारी |
| अंक अठ्ठाविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८६ - आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय |
| अंक एकोणतिसावा : जानेवारी-मार्च | १९८७ - भटक्याविमुक्त जमातीचे प्रश्न |
| अंक तिसावा : एप्रिल-जून | १९८७ - आदिवासी आणि सांस्कृतिक बदल |
| | १९८७ राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न |
| | १९८८ सवलती अपहरणाची समस्या |

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद**

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन.

कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंताना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाने मूर्त स्वरूप म्हणून 'हा का रा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

**मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व**

| | |
|---|---|
| आजीव सभासद | २०० रूपये |
| परिषद वार्षिक सभासद | २० रूपये |
| आदिवासी कार्यकर्ते सभासद | १५ रूपये |

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो.

आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (द महाराष्ट्र असोशिएशन ऑफ अँथ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे पाठवावी. चेक पाठविल्यास अधिक दोन रूपयांची वटणावळ पाठवावी. मनीआर्डर पाठविल्यास फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

रा. के. मुटाटकर सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औन्ध, पुणे ४११ ००७

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**